राजर्षी शाहू महाराजांनी समाजासाठी जे आर्थिक कार्य केले त्या कार्यामुळे त्यांना अर्थतज्ञ म्हणूनही ओळखले जाते. देशाला आर्थिक विकासाची चलना देण्याची ताकद त्यांच्याकडे होती. शाहु महाराजांच्या काळात महाराष्ट्राचीच नाही तर सगळ्या देशाची आर्थिक स्थिती बिकट होती. ही स्थिती सुधारण्यासाठी प्रथम त्यांनी शेती सुधारणेला प्राधान्य दिले. शेतीचा विकस साधण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब केला. छोटी छोटी तलाव बांधले, वेगवेगळी पिके लावण्याचा उपक्रम केला. नविन खते अवजारे शेतकऱ्यांना दिली. यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली गेली.

शेती बरोबर छोटे मोठे उद्योग धंदे केले पाहिजे असे शाहु महाराजांना वाटत असे. व्यापार वाढला पाहिजे त्यामुळे देशाची उन्नती होते. यामुळे व्यापारपेठेचे जनक ही महाराजांना मनले जाते. व्यापर करण्यासाठी रस्ते हे खुप महत्वाचे असतात. रस्त्यामुळे दळणवळण चांगले होते हे महाराजांना चागले माहित होते. गादिवर आले की, महाराजांनी रस्त्याची कामे हाती घेतली. प्रजेच्या कल्यानासाठी महाराजांनी जेवढी धोरणे आखली होती तेवढी पुर्ण केली.

'राजर्षी शाहु महाराजांनी १८९२ पासून कोल्हापूर संस्थानाचा आर्थिक व औद्योगीक विकास करण्याचा प्रयत्न केला.' महाराज गादिवर आले तेव्हा महाराजांनी संपुर्ण राज्याची पाहणी केली नव्हती. पण राज्याची सामाजिक, आर्थिक स्थीती बिकटच होती. महाराजांचे वडील, आजोबा, पंजोबा हे शेतकरीच होते. महाराजांच्या काळात शेती हे पारंपारीक पध्दतीने केली जात होती. ती आधुनिक पद्धतीने कसी करता येईल यासाठी महाराज प्रयत्न करीत होते.

शेती विषयक सुधारणा

महाराजांनी राजपदाची सुत्र हाती घेतल्यापासून शेवटपर्यंत त्यांनी शेती मध्ये विविध प्रकारच्या सुधारणा केल्या.

शेतीचा विकास व्हावा म्हणून महाराजांनी १८९२ पासूनच सुरवात केली. कोल्हापूर संस्थानाचे बहुसंख्य लोक शेतीवर आपला उदरनिर्वाह करीत होते. ८ नोव्हेंबर १९१७ च्या शेतीविषयक आपल्या भाषणात या प्रश्नाचे विवेचन केले आहे. शेतकऱ्यांच्या काम करण्याच्या मार्गात काही अथडळे आहेत. हे अथडळे एकून चार प्रकारचे आहेत. १ शेतीचा लहान आकार २. भांडवलशाही कमतरता ३. शेतऱ्यांचे आज्ञान त्यांचा अशिक्षितपणा ४. शेतमाल विकण्याबाबत संघटणेचा अभाव. महाराज म्हणतात 'शेतकरी सुखी तर देश सुखी' हे सुत्र महाराजांनी नेमके ओळखले होते. ब्रिटीश काळात ईतर संस्थानीक इंग्रजांचे मांडलिकत्व स्विकारून चंगळवादी जिवन जगत होते. पण शाहु महाराज स्वत:ला महाराज म्हणून घेण्यापेक्षा मी एक शेतकरीच आहे असे त्यांचे विचार त्यांच्या भाषणातून

स्पष्ट होतात. 'शिपाई, शेतरी किवा मजूर म्हणून घेण्यात मला अभिमान वाटतो. राजे होण्यापुर्वी माझे वडील शेतकरीच होते. माझ्या जनक आईचे मुधोळचे घोरपडे घराणे, माझ्या दत्तक वडीलाचे भोसले घराणे हे सर्व शेतकरीच होते. मी ज्या वर्गातून जन्मलो आहे. त्यांच्याविषयी प्रेम माझ्यात मुळचेच असून शिपाई आणि शेतरी यांचे रक्त माझ्या धमण्यात खेळत आहे.'

म्हाराजांना प्रजेविषयी आदर होता. शेतकऱ्यांविषयी कळवळा होता. त्या काळात त्यांनी शेती पाहणी दैरा करत असता उस गाळत असताना हात घाण्यात अडकलेला एक शेतकरी दिसला. ते पाहून त्यांचे हृदय द्रावले त्यांनी लगेच शाषकीय आदेश काढला 'घाण्यामध्ये हात सापडणार नाही अगर सापडल्यास त्यास इजा होणार नाही अशा तऱ्हेची यांत्रिक युक्ती सोपी थोडक्यात खर्चात होणारी व पसंत अशी ठरेल त्यास चांगले बक्षिस देण्यात येईल.' यावरुन महाराज सामांन्य शेतऱ्यांच्या दु:खात महाराज किती समरस होते यावरून पटते. शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करणे आवश्यक ठरते. याची जाणीव महाराजांना होती. म्हणून ते एका भाषणात म्हणतात, 'आपल्या देशातील लोकांनी जुन्या शेती पद्धती ऐवजी सुधारलेल्या शेती शास्त्राचा आणि आवजारांचा अवलेब केला पाहिजे. सुधारलेले तंत्रज्ञान विकासाच्या दृष्टीने कारागीरांना पुढे आणले पाहिजे. सुधारलेल्या अवजारांची फार जरुरी आहे. आपले लक्ष ईकडे आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. नांगर व विहिरीचे पाणि काढण्यासाठी मोट याची सुधारणाही आमच्या प्रत्याक शेतऱ्याच्या हिताची ठरणार आहे. प्रयत्न यशस्वी होण्याचे कामी माझ्याकडून योग्य ती मदत मिळेल यात शंका नको.' महाराजांनी शेतऱ्यांना विविध समस्सेतून मुक्त करण्यासाठी 'शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यासाठी १९०४ मध्ये व्हिक्टोरीया मेमोरीयल फंड पुढे द किंग एडवर्ड फंडाची स्थापना केली.' शेतकऱ्यांना कर्ज दिल्यामुळे शेतकरी चांगल्या प्रकारे शेती करु लागले.

३. बादशहा एडवर्ड शेतकी संस्था :

१९११साली सातवा एडवर्ड बादशहा मृत्य पावल्यानंतर कोल्हापुर मध्ये त्यांचे चिरस्थाई स्मारक व्हावे म्हणून टाऊन हॉलमध्ये सभा भरली. महाराज स्त: या सभेला हजर होते. सभेत ठरल्याप्रमाणे कोल्हापुर मधील जहागिरदार पासून ते सामान्य रयतेपर्यंत वर्गणी गोळा केली व 'बादशहा एडवर्ड षेतकरी संस्था' १९ एप्रिल १९१२ रोजी या शेतकरी संस्थेची स्थापना करण्यात आली. या सभेचा उद्देश शेती संबधी नविन प्रयोग करण्याचा नव्हता. या संस्थेने फक्त मुंबई सरकारच्या शेतीखात्याने ज्या सुधारणा यशस्वी रितीने ठरविल्या आहेत किंवा केल्या आहेत त्या विषयी लोकांना माहिती करुन द्यावी हा उद्देश या संस्थेचा होता.

या संस्थेने षेतीसाठी वापरले जाणारे काही आऊते मुंबईहून मागविली होती. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष ही आउते पाहता यावित हा संस्थेचा मुख्ये उद्देश होता. यापैकी नांगर, कोळपे, वगैरे गडहिंग्लज या भागात याचा प्रत्यक्ष वापर करुन दाखवला होता. ज्या शेतकऱ्यांना ही आऊते विकत घेता येणार नाहित अशा शेतकऱ्यांना ही आउते भाड्याने दिली जात. षिराळे व कोल्हापूर भागात या संस्थेने नांगर दिले. पिकांसाठी वापरली जाणारी बि बियाने पारंपारीक पद्धतीची आसल्याने पिक चांगले येत नसे म्हणून संस्थेने 'हुरड्याचे एक नविन बी दवासहुन आणण्याचे ठरविले' हे बी दिवानसाहेब यांनी पाठविले होते. याच संस्थेने कोल्हापूत भागातील उसासाठी लागणारी 'नेटिव्ह ऑफ टाईम' नावचे खत एक पीप आणून वीस षेतकऱ्यांना दिले होते. जून १९१४ साली महाराजांनी शेती उपयुक्त प्रदर्शन भरविले होते. या प्रदर्शनाच्या वेळी मदत करण्यासाठी कमिटीचे डेमन्स्टेटर यांना बोलावले होते. सुधारलेली शेती सार्वत्रिक होण्यासाठी दोन गोष्टि कारणीभून होत्या त्या गाष्टि म्हणजे शेतकऱ्यांचे आज्ञान व आडाणीपणा या दोन

गोष्टिमुळे शेती मध्ये सुधारणा होत नव्हत्या. दरिद्र्य दुर करायचे असेल तर सहकारी पतपेढ्या काढल्याने शेतीमध्ये सुधारणा होतील असा महाराजांचा विश्वास होता.

४. षेती उपयुक्त औजारे आणि यंत्र :

शाहु महाराजांना नेहमी वाटे की, आपल्या देशातील लोकांनी सुधारलेल्या शेती औजारांचा वापर करावा. कारागीरांनी नविन तंत्रज्ञान शिकले पाहिजे. नविन प्रयोग केले पाहिजेत. आज या नविन तंत्रज्ञानाची व औजारांची खुप आवश्यकता आहे. असे महाराजांना वाटत असे. महाराज परदेशात दौरा करत असताना तेथिल शेती तंत्रज्ञान पाहत असे व त्याचे अनुकरण करत असे.

शेती मध्ये वापरले जाणारे महत्वाचे औजार म्हणजे लाकडी नांगर हा पारंपारीक पद्धतीचाच होता. असे दिसून येते. 'निपाणी व गडइंग्लज या भागात लोखंडी नांगर चालवून ते लाकडी नांगरापेक्षा जांस्त फायद्याचे आहे असे सिद्ध करून दाखविले.' शेतऱ्यांसाठी 'रॅनसम' कंपणीचा नांगर शेतऱ्यासाठी दिला होता. या नांगरासाठी ८ ते १० बैलाची आवश्यकता असे. महाराजांनी दामाजी इंगळे या शेतंऱ्यासाठी अर्लिगटन कंपणीचा नांगर उपलब्ध करून दिला होता. याचप्रमाणे महाराजांनी शेतकऱ्यांसाठी 'हातकोळपे,' कडबा कापण्याचे यंत्र महत्वाचे होते ज्या शेतकऱ्याकडे १० ते १२ जनावरे असे त्याला किर्लोस्कर कंपणीचे १० रूपय किंमतीचे यंत्र फायदेशीर ठरे पण ज्याच्याकडे जस्त जनावरे असे त्याला ४५ रूपये किंमतीचे यंत्र फायदेशीर ठरे, मका सोलण्याचे यंत्र याची किंमत ८ते १० रूपये होती. असे आधुनिक पद्धतीचे यंत्रे शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिले होते.

५. कोल्हापुर संस्थानात घेतली जानारी पिके :

नैसर्गिक दृष्ट्या कोल्हापुर जिल्ह्यात उत्तम, सुपीक जमिन व तसेच हवामान उत्तम आहे. कोल्हापुर परिसरातून नऊ नद्या वाहतात. या सगळ्या देणगीचा परिनाम लोकांच्या दृष्टिकोणावर झालेला आहे. जुलै ते ऑक्टोंबर या पावसाच्या मोसमात ३० ते ३५ इंच पाउस पडतो. याचा फायदा कोल्हापून संस्थानातील शेतकऱ्यांना निश्चितच झाला. महाराज हे विदेश दौऱ्यावर असताना तेथिल शेती, कारखाणे, छोटी–मठी उद्योग या गोष्टिचे ते निरिक्षण करत असत. पारंपरीक पिके घेण्याऐजी चहा, कॉफी, वेलदोडे, रबर यानसारखी नविन पिके ही घेतली तर संस्थानातील शेतीचा कायापालट होउन जाईल. असे महाराजांना वाटत होते.

महाराजांनी आपले स्वप्न पुर्ण करण्याचा प्रयत्न केला. ते लवकरच प्रत्येक्षात उतरले. त्यांनी संस्थानातील पश्चिम भागात मुबलक पर्जमान असणाऱ्या सह्याद्रीच्या रांगात उतार जमिनीवर त्यांनी चहा, कॉफी, रबर यांचे मळे तयार केले. कोरफड, वेदोडे, कोको, ताग. अंबांडी, बेळगावची बटाटी, लाख, शिगाडे, टॅपिओका त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा झाला. पन्हाळा

६. तलावांची निर्मिती :

प्राचीन काळापासून उन्हाळा पावसाळा हिवाळा हे तीन ऋतु महत्वाचे आहेत. याप्रमाणे पावसाळा चांगल्या प्रमाणे होतो. कोल्हापूर परिसरातही पावसाचे प्रमाण जास्त आहे. पडणारे पावसाचे पाणि समुद्राला जाऊन मिळते. पुर्वी असे काही धरणे बांधलेली नव्हती. साधरणत: २० छोट–मोठी तळी बांधलेली होती. महाराज नेहमी युरोपच्या दौऱ्यावर जात असत त्यांनी तेथील लोकांचे बारकाईने निरिक्षण केले असता असे त्यांच्या असे लक्षात आले की, हे लोक नैसर्गिक साधण संपत्तीचा कसा उपयोग कररुन घेतात. हे पाहुन महाराज प्रभावीत झाले व आपणही तसे अनुकरण केले पाहिजे. कोल्हापूर संस्थानात पंचगंगा, वारणा, दुधगंगा, वेधगंगा, तुलशी, कुंभी, कासारी, भागावती, हिरण्यकशी अशा छोट्या मोठया नद्या आहेत. या नद्याकाठची जमिन फुललेली असायची या सर्व नद्यांचे पाणि

वाहून जात असे. या नद्यापैकी कोणत्यातरी नदीवर धरण बांधावे अशी महाराजांची इच्छा होती. शेवटी भोगावती नदिवर धरण बांधण्याचे ठरले. 'भोगावती नदिवर सुमारे ३० लाख रूपय खर्च करुन 'भोगावती नदिवर फेजिवडे गावच्या हद्दीत २६०० फुट लांब व ११० फुठ उंच एवढे धरण बांधले. या धरणामुळे २० अधिक जमिन पाण्याखाली आली. या धरणचे नोव्हेंबर १९०९ ला काम सुरू झाले, १९१४ साली पहिल्या महायुद्धाची सुरवात झाली तरिही धरणाचे काम चालुच ठेवले. १९१४ मध्ये ७६१००० घनफुट बांधकाम झाले तर एकुन खर्च ९ लाखापर्यंत होता. १९१७–१८ साली हा खर्च १३ लाखापर्यंत झाला. या धरणाच्या पाण्यातून शाहु महाराजांना 'हरितक्रांती' घडून आणण्याचे भव्य स्वप्न हेते. पूढे धरणासाठी लागणारी साधण सामग्री कमी पडु लागली म्हणून काम बंद ठेवावे लागले. याचे महाराजांना दु:ख वाटत होते पुढे आपल्या पित्याचे अर्धवट राहिलेले काम राजाराम महाराजांनी पुर्ण केले. हे धरण आजही चांगल्या स्थितीत आहे.

७. संस्थानातील उद्योग व सहकार तत्व :

भारत हा शेती प्रधान देश आहे. शेतीबरोबर व्यापारही महत्वाचा आहे. कोल्हापूर संस्थान हे इंग्रजांच्या आधिपत्याखाली होते. ब्रिटीश भारतात व्यापार करण्साठीच आले होत. हळुहळू संपुर्ण भारत अपल्या ताब्यात घेतला व व्यापारावर ताबा मिळवला. भारतात त्यांनी उद्योगांना मोठे प्रोत्सान दिले नाही. परंतु शाहु महाराजांना आपल्या कोल्हापूर

संस्थानात उद्योगांचा विकास व्होवा अशी त्यांची खुपइच्छा होती. म्हणून १९१७ साली खांबगाव येथे भरलेल्या 'अखिल भारतीय मराठा परिषदेच्या' अधिवशनाच्या अध्यक्षीय पदावरू बोलताना महाराज म्हणतात की, 'आम्ही शेतकरी किंवा सैनिक म्हणूनच राहवे ही स्थिती आम्हास समाघानकारक वाटत नाही.' यामुळे ते अभिमानाने सांगतात की, 'मी माझ्या दोन मुलांना व्यापारात घातले आहे.' कोल्हापूरात मोठी बाजारपेठ नव्हती. त्यामुळे कोल्हापूरात उत्पादित होणारा गुळ कोकणात जात असे तेथुन मुंबईला जात असे. तो गुळ राजापूरी गुळ म्हणून ओळखला जात असे. ही परिस्थिती महाराजांनी बदलून टाकली. कोल्हापूरात शाहुपुरी नवी व्यापारी पेठ वसवली. 'कोल्हापूर, निपाणी, कागल येथिल व्यापारी वर्गास खास सौलती देउन त्यांना वखारी घालण्यास प्रोत्साहन देण्यात आले. अवघ्या ५ – ७ वर्षात ही नवी बाजारपेठ जोमाने उभी राहिले'. या बाजारपेठेतून दरवर्षी २० लाखाचा भूईमुग तर ५० लाखाचा गुळ निर्यात होत असे. जपानमध्ये प्रशिक्षण झालेल्या डी. एस. शाळीग्रम नावाच्या रसायनशास्त्रज्ञ व्यक्तीची नेमणुक आपल्या संस्थानात 'इंडस्टियल इंस्पेक्टर' म्हणुन केली होती. शाळीग्रामने सुगंधी औषधी तेल उद्योग व काष्टकाचे यशस्वी तेल उद्योग या क्षेत्रात प्रायोगिक तत्वावर काही वनऔषधी तेलाचे व काष्ठर्क तेल उद्योग अशा यशस्वी झालेल्या तीन सुगंधी औषधी तेलाचे नमुणे पाठवण्यात आले. 'विशेष म्हणजे हे कोल्हापूरी तेल तज्ञांच्या प्रशसनास पात्र ठरून कोल्हापूर संस्थानास चांदिचे पदक बहाल करण्यात आले.

याशिवाय महाराजांनी सहकार तत्वाला ही खुप महत्व दिले. म्हणून महाराजांनी १९१२ साली आपल्या राज्यात सहकारी संस्थाविषयक कायदा को–ऑपरेटिव आसोसिएटीज ॲक्ट' जारी केला. कामगारांना पगार कमी असल्यामुळे त्यांना सावकारांचे कर्ज काढावे लागते. घेतलेल्या कर्जातून कामगार मुक्त होउ शकत नाही. म्हणून कामगारांच्या हितासाठी महाराजांच्या मध्येस्तीने भास्कररराव जाधव यांनी '१९१४ साली अर्बन को–ऑ सोसायटीची स्थापना केली.' महाराष्टात त्यावेळची पहिली सहकारी पतपढी होती. श्रीनतीराव शिंदे यांनी १९०५ साली बलभिम सोसायटीची स्थापना केली. या माध्यमातुन सहकार चळवळ संस्थानात चालु केली. '१९१२ पासुन सहकारी पतसंस्था, सहकारी साखर कारखाणे, मोठ्याप्रमाणात सुरी करण्यात आले.' कोल्हापूर संस्थानात १९२१ पर्यंत

सहकारी संस्थांची संख्या ३७ होती. महाराजांच्या सहका–यामुळे सहकारी संस्थांच्या माध्यमातून कोल्हापूर संस्थानाचा कायापालट केला.

७.समारोह :

भारताचा प्राचीन काळापासून शेती हा मूख्य व्यावसाय आहे. प्राचीन काळी भारत सुवर्ण भूमिचा देशम्हणून ओळखला जातो. आणि आजही भाराताचा व्यावसाय शेती आहे. ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत भारतीयांचा मुख्य व्यावसाय शेती हाच होता. त्यांनी स्वत:च्या फायद्याचेच बघितले. भारतात उद्योग धंद्यास चलना दिली नाही. भारतीयांच्या आडाणीपणाचा व दुबळेपणाचा फायदा ब्रिटिंशी घेतला. शाहू महाराजांनी संस्थानाचा पदभार स्विकारल्या नंतर त्यांनी संस्थामध्ये सुधारणा करण्यास सुरवात केली. संस्थानात नविन आधुनिकीकरणाचा प्रयोग करून. विविध व्यावसाय व उद्यागाची सुरवात करून दिली. शेती संशोधणाला चलना दिली. विविध प्रकारचे खते, बी–बियाणे शेतक–यांना उपलब्ध करुन दिले. नविन पिकांच्या लागवडीचे प्रयोग केले, शेतीविषयक प्रदर्शन भारवले, मोठ–मोठे तलाव बांधले. कोल्हापूरच्या संस्थानात हरित क्रांतीचे बिज छं. शाहू महाराजांनी रोवले.

संस्थानातील शेतक–यांनी शेतीबरोबर जोड व्यावसाय करावा.निरनिराळे उद्योग करावेत असे महाराजांना वाटे. जे कोणी व्यावसाय करण्यास पुढे येत महाराज त्यांना बिनव्याजी कर्ज देत. त्यांनी लघु उद्योग, सहकार क्षेत्रातील उद्योग, यांना महाराजांनी सहाय्य केले. शेतक–यांच्या अडचणी सोडवण्यासाठी पतपेढ्या, बॅका काढल्या. नवनविन पक्क्या रस्त्यांची निर्मिती केली. यामुळे व्यापारात खुप मोठा फायदा झाला. कोल्हापूर जिल्ह्याची जी भरभराट झालेली दिसते या भरभराटीचे पुर्ण श्रेय हे महाराजांना जाते.

संदर्भ ग्रंथ :

१) वाघ जितेंद्र शंकरराव, राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्यांच्या संदर्भातील कार्य (शोध निबंध संग्रह) यशवंराव चव्हाण महाराष्ट मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००९, पृ. ७५.
२) साळुंखे पी. बी., (संपा) राजर्षी शाहू, गौरव ग्रंथ, महाराष्ट राज्य शिक्षण विभाग, मुंबई, आवृत्ती १९८८, पृ. १६९.
३) राठोड. आर. डी., राजर्षी शाहू महाराज, सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती, अरुणा प्रकाशन लातूर, आवृत्ती मार्च २०१७, पृ १३६.
४) करवीर सरकारचे गॅझेट, कित्ता, पृ. २२६.
५) करवीर सरकारचे गॅझेट, कित्ता, पृ. २२८.
६) करवीर सरकारचे गॅझेट, कित्ता, पृ. २२९.
७) पाटील निता पांडुरंग, कोल्हापूर शहरातील निवडक ग्रंथालयातील दूर्मिळ साहित्याचे जतन व व्यवस्थापन : एक अभ्यास (शोधनिबंध) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २०१२, पृ. ५०.
८) जाधव रमेश, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, प्रकाशक महाराष्ट राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई, आवृत्ती तिसरी, २०१६ पृ. १५९.
९) जाधव रमेश, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, अपरोक्त, क्र. २. पृ. १६०.
१०) जाधव रमेश, लोकराजा, शाहू छत्रपती, शैलेंद्र प्रकाशन, शुक्रवार पेठ, पुणे, २००५, पृ.३१३.
११) जाधव रमेश, लोकराजा शाहू छत्रपती, कित्ता, पृ. ३१५.
१२) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, संचालक महाराष्ट्र इतिहास प्रभोधनी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००१, पृ.२०३.
१३) पवार जससिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कित्ता, पृ. २०४.
१४) संगवे विलास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कार्य व प्रभाव, एक्सप्रस पब्लिकेशन हाऊस कोल्हापूर, आवृत्ती दुसरी २००३, पृ. ४८.
१५) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कित्ता, पृत्र २०९.
१६) साळुंखे हिंदुराव, छत्रपती शाहू महाराज यांच्या आठवणी व कोल्हापूरचे ऐतिहासिक वैभाव, पृ. ३७.
१७) पाणसरे गोविंद, राजर्षी शाहू वसा आणि वारसा, पुर्वोक्त क्र.६. ३९.

भारतातील गरीबी व दूष्काळ एक चिंतन

संशोधक

अमोल अशोक हिवराळे (पीएच.डी.)

पालि आणि बुध्दिझम विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रस्तावना

आपला भारत हा एक देश कृषी प्रधान देश आहे. आजही भारतातील 70 लोक हे खेडयात राहुन शेतीवरच आपला उदरनिर्वाह करतात भारताला एक प्रगत व विकसित राष्ट्र निर्माण करण्यासाठी आपण अहोरात्र झटत आहोत परंतु हे सर्व करत असताना त्यामध्ये अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. अनंत अडचणींचा सामना करत असतांना विकासासाठी ज्या काही समस्या समोर येतात त्यामध्ये प्रामुख्याने एक समस्या समोर येते ती म्हणजे भारतातील गरिबी गरिबी हे भारतातील भयाण वास्तव आहे. गरिब म्हणजे नेमके कोण?भारतात गरिब नेमके कोणाला म्हणायाचे कारण देशपरत्वे गरिबीची परिभाषा हि वेगवेगळी दिसून येते

अन्न व पाणी यांची तीव्र टंचाई म्हणजे दुष्काळ असे सर्वसाधरणपणे संबोधले जाते. मात्र सद्यस्थिती दुष्काळाचा संबंध पाण्याच्या कमतरतेशी निगडीत असल्याचे जाणवते. पाणी हा घटक जीवसृष्टीचा आत्मा आहे. जलचक्रांच्या माध्यामतून तो पृथ्वीवर उपलब्ध होतो. वातवरणतील व हवामानातील बदलाचा परिणाम जलचक्रांवर होत असतो. वातावरण व हवामानविषयक घटकाद्वारे उद्भवणारी आपत्ती म्हणून दुष्काळ या संक्लपनेचा भूगोलशास्त्रज्ञ प्रामुख्याने विचार करतात जनमानसात हा शब्द पीक न येणे, कामधंदा न मिळणे,जीवनसृष्टी व प्राणीसृष्टीचे या काळात वाईट हाल होत असल्याकारणाने दुष्काळ म्हणजे वाईट काळ अशा अर्थाने प्रचलित आहे. सरासरीपेक्षा पर्जन्यमान कमी होऊन भूपृष्टीवरील व भूगर्भातील पाणीपातळी कमी होणे, पाणी टंचाई निर्माण होणे, जमिनीतील ओलावा कमी अथवा नष्ट होणे, जमीन कोरडी पडणे, तापमान वाढणे, बाष्पोत्सर्जनासाठी पाण्याची कमतरता निर्माण होणे,म्हणजे दुष्काळ समजल्या जातो. थोडक्यात दुष्काळ म्हणजे वातावरणातील कोरडया हवामानाचा दीर्घकालीन अविष्कार असून जीवसृष्टीला अथवा सजीवसृष्टीला विस्कळित करणारी आपत्ती होय. मध्ये आत्यंतिक आणि सर्वसाधारण अन्नटंचाई म्हणजे दुष्काळ होय.

संशोधन पध्दती

सदरील शोधनिबंधामध्ये दुष्काळा ची कारणे,परिणाम व उपाय या घटकावर भर दिलेला आहे. यासाठी दुय्यम साधनाचा वापर केलेला आहे. दुष्काळ या संदर्भातील भारतात झालेले विविध अभ्यास व त्यांचे अहवाल,पाणी प्रश्नावर काम करीत असलेल्या विविध संघटना, व त्यांचे संशोधन विविध अभ्यासकाचे अभ्यासपूर्ण लेख, ग्रंथ इत्यादींचा संशोधकाने आधार घेतलेला आहे.

दुष्काळाचे परिणाम

दुष्काळामुळे सजीव सृष्टीला विविध समस्यांचा सामना करावा लागतो. पाणी टंचाईमुळे जन-जीवन विस्कळीत होते. पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न गंभीर बनता. सर्वसामान्याना पाणी मिळविण्यासठी मोठी

कसरत करावी लागते. शासनाचा प्रंचड पैसा पाणी उपलब्ध करण्यास्तव खर्च होतो. जनसामान्याचे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. शेतकज्यांच्या उत्पन्नात घट होते. शेती तोतटयात जाते. शेतीवर अवलंबून असणारे हतबल होतात. बाजारातील गर्दी कमी होते.व्यवहार ठप्प बनतात. अन्नधान्य चाज्याचा गंभीर प्रश्न उभा राहतो. भूकबळी व उपासमारीचा सामाना करावा लागतो. अशुध्द पाण्याच्यावापरामुळे गॅस्ट्रो,कावीळ,हगवण,पोटाचे विकार निर्माण होतात. रोगाच्या साथी निर्माण होतात. उष्माघात या सारख्या आजाराचा सामना करावा लागतो. ज्या भुप्रदेशात दुष्काळ पडतो त्या भूप्रदेशामध्ये लोकांच्या गरजा पूर्ण न झाल्यामूळे लोक अन्न, पाणी यांचया शोधर्थ स्थलांतर करतात. त्यामूळे जलसाठयाच्या ठिकाणी नागरीवस्तीचे केंद्रिकरण होते. त्यामुळे अशा ठिकाणी नागरी समस्याची निर्मीती होते. लोकसंख्याचे विशिष्ठ भू-भागावर मर्यादीपेक्षा अधिक प्रमाण वाढत जाते.

भारतातील गरीबीची कारणे: भारतामध्ये मोठया प्रमाणात गरिबी दिसून येते त्याची अनेक कारणे आहेत.

1.लोकसंख्या-

भारतातील वाढती लोकसंख्या हे गरिबीचे प्रमुख कारण आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे मोठया प्रमाणात अडथळे निर्माण होतात. वाढत्या लोकसंख्येमुळे सर्वाना काम,नौकरी मिळू शकत नाही. सर्व जनतेला वैद्यकीयसेवा पुरविण्यात अडचणी निर्मान होतात. ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढते त्या प्रमाणात सरकारचे उत्पन्न वाढतांना दिसुन येत नाही.परिणामी सरकार सर्व जनतेला नागरी सुविधा पुरविण्यात अकार्यक्षम ठरते. लोकसंख्या वाढीमुळे बेरोजगारी वाढते व हीच बेरोजगारी गरीबीमध्ये परावर्तीत होते. व गरिबीची समस्या अधिकीच जटील होत जाते.

2.बेरोजगारी –

गरिबी निर्माण होण्यात बेरोजगारीचा फार मोठा हात आहे. ग्रांमीण भागात प्रमुख व्यवसाय शेती असुन शेती हा हंगामी स्वरुपाचा व्यवसाय असल्याने वर्षातील 5ते6 महीनेच रोजगार मिळत असतो. ग्रामीण भागातील पांरपारिक हस्तउद्योग व कुटीरउद्योग बंद पडल्याने बेरोजगारीत भर पडली आहे. रोजगाराच्या मर्यादीत उपलब्धतेमुळे ग्रामीण लोक कमालीच्या गरिबीमध्ये जिवन जगत असुन कामासाठी ते शहराकडे स्थलांतर करत असतात. शहरात आगोदरचेच बेराजगार कामाच्या शोधात असताना त्यात नविन ग्रामिण बेरोजगाराची अवाक वाढल्याने सर्वाना बेरोजगारीचा सामना करत असताना कमालीच्या गरीब परिस्थीतीला तोंड द्यावे लागते.

3.भूमीहीनता –

ग्रामीण भारतात भूमहिन शेतमजूराचा वर्ग फार मोठा आहे.अशा लोंकाना मालकीची भूमी नसल्यामूळे त्यांना भूमिहीन शेतमजूर म्हटल्या जाते शेतीचा हंगाम ओसरल्यावर शेतमजूर अनेक महीने बेकारीस तोंड द्यावे लागते त्यातून मिळणारे वेतन कमी असल्यामुळे त्यांचे जिवनमन निकृश्ठ दर्जाचे होते. त्यांच्या मिळकतीत किमान गरजांची पुर्तीता होत नाही. अत्यल्प मजूरीमुळे त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत भयानयक स्वरुपाची होऊन तो दारीद्रायाकडे ओढला जातो.

उपाययोजना

जनजागृती व जलसाक्षरता पाण्याचे महत्व पटवून देण्यासाठी लोकामंध्ये जनजागृती लोकांमध्ये जनजागृती आवश्यक आहे. पाणी वापरण्याविषयीच्या अज्ञांनामुळे लोक पाण्याची नासाडी करीत असतात. आवश्यकता नसतांना पिकांना अतिरिक्त पाणी वापरण्याचे नियोजन नसणे हे केवळ अज्ञानामुळे निर्माण झालेले आहे. त्यामुळे लोकांमध्ये जनजागृती करुन त्यांना जलसाक्षर करावे.

जलसंवर्धन-

भूपृष्ठावरील व भूगर्भातीलजलसाठे वाढविण्यासाच्या दृष्टीने जलंसंर्वधन करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक पावसाचा थेंब जमिनीमध्ये जिरविणे आवश्यक आहे. वाहते पाणी लहान तलावामध्ये, शेततळयामध्ये साठविण्यात यावे. यामुळे पाणीपातळी वाढ होऊन गरज पडल्यास ते उपयोगात आणत येऊ शकेल.

वृक्षारोपन व सवंर्धन –

नवीन वृक्ष लागवडी बरोबरच त्या वृक्षांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. वृक्षतोडीवर कडक निर्बध प्रत्येक घ्रासमोर, प्रत्येक रस्त्याच्या दुतर्फा तसेच पडीक,गायरान जमिनीवर वृक्षलागवढ करणे आवश्यक आहे. तसचे पर्जन्यवृष्टीसाठी आवश्यक हवामान तयार करण्यासाठी मदत होईल.

आधुनिक सिंचन पध्दतीचा वापर –

कृषीसाठी पाणी वापरताना तुषार सिंचन,ठिंबक या आधुनिक पध्दतीचा वापर करावा. पाण्याची वाफ होऊ नये म्हणून ओल्या जागेवर आच्छादन पसरावे कमी पाण्यावर येणा–या पिकांच्या जाती संशोधीत कराव्यात.

सारांश:

थोडक्यात गरिबीचा अभ्यास करतांना हे लक्षात येते की, भारतातील गरिबी ही समस्या नवीन नसुन फार जुनी समस्या आहे. ही समस्या मानवी जिवनाच्या विकास अवस्थेपासून सु डिग्री झालेली असुन आजतागायत टिकुन आहे. भारतातील गरीबी हि विविध कारणांमुळे निर्माण झालेली आहे. त्या कारणांचा शोध घेऊन त्यावरील उपाय शोधून गरिबी दूर केली जाउ शकते. त्यासाठी सरकार सोबतच विविध क्षेत्रातील सामाजिक संस्थास, सरकारी संस्था व समाजातील विविध क्षेत्रातील ट्रस्ट,कंपन्याव एन.जी.ओ यांनी उपयोजनात्मक कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. सरकारने सुध्दा गरिबी निर्मूलन कार्यक्रमांत विधायक स्वरूपाचे बदल घडवुन आणावेत सरकारी धोरणांची कडक अमलंबजावणी करुन प्रत्यक्ष व्यक्तीला त्याचा लाभ मिळणे गरजेचे आहे.

संदर्भ

1.हेळंबे,हणमंत (2012),आपत्ती व्यवस्थापन,अरुणा प्रकाशन लातूर.

2.हुसैन,मझुप्पर(2005),नैसर्गिक आपत्ती आणि मनुष्यापुढचे आव्हान,केसरी,दिनांक 11/02/2005.

3.वांगीकर बी.पी (2004) पर्यावरणशास्त्र,कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद.

4.शेटे एस.वइतर (1999) पर्यावरण भूगोल, अभिजीत पब्लिकेशन लातूर.

5.घारपूरे,विठठल (2004) पर्यावरण भूगोलशास्त्र, पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

6. www.unipune.ac.in

7. ब्रम्हे,सुलभा,(1987) दुष्काळ:लोकवैज्ञानिक नियोजनाचा,लोकविज्ञान प्रकाशन, पुणे.

शाश्वत विकासाच्या संदर्भात महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता

अमोल भा. सातपुते

सहाय्यक प्राध्यापक ,राज्यशास्त्र विभाग, एस. एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया (महाराष्ट्र)

गोषवारा:

वर्तमान काळखंडामध्ये पर्यावरणीय सुरक्षा आणि शाश्वत विकास या संकल्पना जागतिक चर्चाविश्वाच्या केंद्रस्थानी आल्याचे दिसते. मानव जातीच्या शांततापूर्ण आणि सर्वांगीन, शाश्वत, टिकाऊ व चिरकाल विकासाठी पर्यावरण संरक्षणाची अत्यंत गरज आहे. शाश्वत विकास ही बहुआयामी व परस्परावलम्बी संकल्पना आहे. या संकल्पनेत वर्तमान पिढीबरोबरच भविष्यातील पिढीचा विचार केला जातो. ही संकल्पना नैसर्गिक साधनसंपत्तीचा विवेक बुद्धीने व दूरदृष्टीने वापर करण्यावर भर देते. महात्मा गांधीनी आपल्या हयातीत शाश्वत विकास ही संकल्पना वापरात आणल्याचे दिसून येत नसले तरी त्यांच्या विचारांमध्ये मानव जातीची जी जीवनशैली रेखाटली आहे त्यामध्ये पर्यावरणपूरक जीवनशैली, पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकासाला पूरक धारणा दिसून येतात. या शोधलेखामध्ये शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन यासाठी गांधीच्या विचारांच्या योगदानाचा उहापोह करण्यात आलेला आहे, गांधींच्या विचारांची मिमांसा केलेली आहे. पर्यावरण प्रदुषण, निसर्गसौंदर्याची अवनती व हानी, वाढत जाणारी लोकसंख्या व त्यामुळे उर्जास्त्रोतांची उणीव, जीवसृष्टीतील प्राणी व वनस्पतींच्या जातींच्या नाश पर्यायाने पर्यावरणाचा विनाश या समस्यांवरील गांधींची भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न या शोधलेखाच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे.

बीजशब्द: शाश्वत विकास, पर्यावरण ऱ्हास, रचनात्मक कार्यक्रम.

प्रस्तावना:

वर्तमान काळात शाश्वत विकास ही संकल्पना विशेष लोकप्रिय झाली असून विकास व पर्यावरण यासंबंधीच्या अभ्यासात तिची मोठ्या प्रमाणात चर्चा होताना दिसते. शाश्वत विकास ही संकल्पना तशी नवीन नाही. जगातील अनेक परंपरागत रूढिप्रिय समाजातील लोकांना शाश्वत विकासाची जाणीव असल्याचे दिसून येते. तथापि आर्थिक, सामाजिक विकासाचा ध्यास घेतलेल्या व आधुनिक म्हणविल्या जाणाऱ्या समाजातील लोकांना मात्र आर्थिक लाभाच्या हव्यासापोटी या संकल्पनेचे भान राहिलेले नाही. विकासाच्या अव्याहत चाललेल्या या जागतिक उपक्रमात पर्यावरणाचा ऱ्हास होऊन सम्पूर्ण जीवसृष्टीच्या आस्तित्वाचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. या संकटावर मात करण्याच्या विचारातून व प्रयत्नातून शाश्वत विकास या संकल्पनेचे आज महत्व दिवसेंदिवस वाढत असल्याचे दृष्टिक्षेपास पडते.

इतर प्राण्यांप्रमाणे मनुष्यदेखील आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी नैसर्गिक साधनसम्पत्तीवर अवलंबून असतो. पूर्वीच्या काळात मानवी लोकसंख्या व मानवी गरजा या मर्यादित होत्या. त्यांच्या तुलनेत नैसर्गिक साधनसम्पत्ती मात्र विपुल प्रमाणात उपलब्ध होती. त्यामुळे नैसर्गिक साधनसम्पत्तीची टंचाई भासणे, पर्यावरणाचा ऱ्हास होणे अशा समस्या भेडसावत नव्हत्या. आधुनिक काळात मात्र मानवी लोकसंख्या, मानवी गरज, मानवाची उपभोग वृत्ती किंवा लालसा व हव्यास इत्यादी गोष्टी प्रचंड प्रमाणात वाढल्याचे दिसते. जगातील

बहुतेक समाजात विकासाचे कार्यक्रम सूरू झाले. विकासाच्या नावाखाली लोक स्वार्थी किंवा लोभी वृत्तीने नैसर्गिक साधनसम्पत्तीचा अविवेकी व अतिरेकी स्वरूपात वापर करू लागले. वसाहती, इमारती, रस्ते, लोहमार्ग, उद्योगधंदे, खाणी इत्यादीच्या उभारणीसाठी व शेती करण्यासाठी लोकांनी प्रचंड वृक्षतोड सूरू केली. अव्याहत विकासाच्या परिणामस्वरूप वाळवंटीकरण होणे, जैवविविधतेचा ऱ्हास होणे, हवा-जल-वायू प्रदूषण, जागतिक तापमान वृद्धी, समुद्राच्या पाण्याची पातळी उंचावणे, जंगले नष्ट होणे, परिणामी तेथील सजीवांचा अधिवास धोक्यात येणे अश्या समस्या तीव्र झाल्या. यामुळे नैसर्गिक समतोल ढासळू लागला. यालाच पर्यावरणाची अवनती वा ऱ्हास असे म्हणतात. या धोक्याची जाणीव जागतीक संस्था, संघटना, राज्यकर्ते, प्रशासक, विचारवंत, पर्यावरण प्रेमीमंडळी इत्यादींना झाली. या जाणिवेतूनच मानवी गरजांची पूर्तता करताना व विकास करताना पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन केले पाहिजे. नैसर्गिक साधनसंपत्ती पुढील पिढ्यांसाठी टिकून राहिली पाहिजे, विकास हा पर्यावरणाचा ऱ्हास करणारा नसावा, तर तो सर्वांचे कल्याण करणारा व पिढ्यानपिढ्या टिकून राहणारा असावा अश्याप्रकारे विचार मांडले जाऊ लागले. या विचारातूनच शाश्वत विकासाची संकल्पना पुढे आली. शाश्वत राहाणे म्हणजे सतत सूरू राहाणे किंवा टिकून राहाणे असा अर्थ आहे. त्यानुसार शाश्वत विकास म्हणजे सतत सूरू राहणारा किंवा टिकून राहणारा विकास होय. जे सूरू राहू शकत नाही म्हणजेच खंडीत होते ते अशाश्वत होय. याउलट जे सुरू राहू शकते म्हणजे अखंडित राहाते ते शाश्वत होय. शाश्वत विकास म्हणजे अखंडपणे सुरू राहणारा वा टिकून राहणारा विकास होय.

महात्मा गांधी व शाश्वत विकास

महात्मा गांधींच्या काळात शाश्वत विकासासबंधीच्या समस्या अस्तित्वात नसताना सुद्धा त्यांच्या यासंबंधीच्या कल्पना महत्वाच्या होत्या आणि आजही त्या तितक्याच महत्वाच्या आहेत. गांधींनी कधीही शाश्वत विकासाचा कोणताही परिपक्व सिद्धांत मांडला नाही. गांधींच्या अनेक लेखननोंदी, भाषणे आणि विचारमंथनातून त्यांच्या कल्पनेतील शाश्वत विकासाची तात्विक-सैद्धांतिक मांडणी समजून घेणे आवश्यक आहे. गांधीप्रणीत शाश्वत विकासामध्ये गांधींची समग्रतामूलक दृष्टी, स्वयंपूर्णता, आत्मनिर्भरता, स्व-नियंत्रण, स्वाधिनता आणि सर्वोदय या बाबी समाविष्ट आहेत. गांधींच्या लेखी शाश्वत विकास म्हणजे व्यक्तिचा शारीरिक, मानसिक आणि आत्मिक विकास म्हणजेच संतुलित विकास होय. हे संतुलन धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांतील संतुलन आहे असे गांधी म्हणत. मानवाने कामवासना, भावनिक अतिरेक आणि लालसेवर नियंत्रण ठेवल्यास ते पर्यावरणाच्या शाश्वत विकासाठी महत्वाचे ठरते असे गांधी म्हणतात.[1] गांधींच्या मते शाश्वत विकासाचा संबंध परिस्थितिकी-पर्यावरण संतुलनाशी आहे. या अनुषंगाने माणसाने शाकाहारी असावे ही गांधीची सूचना अत्यंत महत्वपूर्ण आहे. शाकाहार हा परिस्थितिकी- पर्यावरण संतूलन कायम राखण्याचा महत्वाचा मार्ग ते मानतात.[2] निकोप मानवी सहअस्तित्व आणि प्रजाती व पशूंच्या अस्तित्वाच्या हेतूने मानवाने सजीवांचे आणि निसर्गाचे संरक्षण करणे आवश्यक आहे असे गांधींचे मत होते. गांधीप्रणित शाश्वत विकास केवळ पर्यावरण विकासाशी संबंधित नाही तर यामध्ये सर्वसाधारण आर्थिक- सामाजिक विकास आणि नैतिक मूल्ये व नीतितत्वांशी संबंधित मानव विकास अंर्तभूत आहे.

मानवी स्वार्थ, अहंकार, लालसा आणि प्रत्येक परिस्थितीत अधिकाधिक लाभाचा विचार करणे हे पर्यावरण अवनतीचे प्रमुख कारण होय. भांडवलवाद आधारित विकास प्रक्रियेत मानव स्वार्थी झाले तरी निसर्गत: प्रत्येक मानव सदाचरणी आणि काही प्रमाणात नैतिक देखील असतो. गांधींच्या मते शाश्वत विकास म्हणजे

सर्वकष विकास होय. यामध्ये मानवी जीवन आणि मानव-निसर्ग परस्परसंबंध यांबाबत अनेक पैलू समाविष्ट आहेत.

शाश्वत विकासाच्या संदर्भात गांधींची समग्रतामूलक दृष्टी:

महात्मा गांधी यांच्याकडे कोणती पर्यावरण दृष्टी होती का? किंवा महात्मा गांधींनी पर्यावरणाकडे बघण्याची कोणता दृष्टीकोण आत्मसात केलेला होता? या आधारावरच गांधींच्या पर्यावरण व तद्नुषंगाने शाश्वत विकासासंबंधीची धारणा स्पष्ट होऊ शकते. गांधींचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्याकडे असलेली 'समग्रतामूलक दृष्टी' (Integrated Approach). त्यांच्यासाठी जीवन म्हणजे एकप्रकारची समग्रता होय.[3] जीवनाचा आधार व त्या जीवनाचे नियमन करणारे तत्व एकच आहे अशी गांधींची धारणा होती. ते मानव व मानवेतर जगताकडे एकत्वाच्या दृष्टीने बघायचे. ते मनुष्याला प्रकृतीचा स्वामी न मानता, प्रकृतीचा एक अंग समजायचे. त्यामुळेच त्यांच्यासाठी निसर्ग हा उपभोगाचे साधन म्हणून कदापिही नव्हते. गांधी मनुष्य व मनुष्येतर जगताच्या समान अधिकारांचा सहर्ष स्विकार करून म्हणतात की, " मी हे अवश्य मान्य करतो की या ईश्वराच्या सृष्टीमध्ये जगण्याचा जेवढा हक्क आम्हाला आहे तेवढाच हक्क अन्य प्राणीमात्रांसुद्धा आहे"[4] यावरून असे लक्षात येते की गांधींना ही सृष्टी सर्व प्राणीमात्रांसाठीची असून प्रत्येकाला जगण्यात समान हक्क आहे. त्यामुळे मनुष्याला असा कुठलाही अधिकार प्राप्त होत नाही की त्याने या सृष्टीवर अधिकार गाजवावा. हा एक महत्वपूर्ण पर्यावरणीय दृष्टीकोण आहे, जो गांधींनी आम्हाला दिला. मनुष्य सृष्टी, जीवसृष्टी, निसर्ग, समाज आणि विवेकक्षम मणूस ही एक परस्परसंबंधित व्यवस्था आहे या धारणेतून गांधींनी मानवी व्यवहारांचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला.

हिंद स्वराज व गांधींची शाश्वत विकासाची धारणा:

गांधीजींचे शाश्वत विकासासंदर्भातील विचार त्यांच्या हिंद स्वराज या पुस्तकातून व विकेंद्रीकरण, रचनात्मक कार्यक्रम, ग्रामोद्योग, खादी आणि स्वदेशीचा वापर तसेच अहिंसक समाजरचनेच्या आराखड्यातून दिसून येतो. गांधीजींनी शाश्वत विकास या शब्दांचा कुठेही वापर केल्याचे दिसत येत नसले तरी त्यांच्या विचारांमध्ये शाश्वत विकास संकल्पनेला पूरक विचार जागोजागी आढळतात. त्यांनी मानव जातीची जी जीवनशैली रेखाटली, एक आदर्श राज्यव्यवस्था वा अहिंसक समाजव्यवस्था कशी असावी यासंदर्भात जी मांडणी केली तसेच पाश्यात्य सभ्यतेची जी कठोर चिकित्सा केली त्यामध्ये पर्यावरणपूरक जीवनशैली, पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकासाला पूरक धारणा दिसून येतात. महात्मा गांधींनी लिहलेल्या हिंद स्वराज्य या छोटेखानी पुस्तिकमध्ये गांधींनी पाश्चिमात्य सभ्यतेवर, युरोपिय जीवनशैलीवर कडाडून टिका केल्याचे आढळते. 'हिंद स्वराज्य' चे मूळ लेखन गांधींनी नोव्हेम्बर 13 ते 22 दरम्यान इंग्लंडहून दक्षिण आफ्रिकेला येणाऱ्या 'किल्डोनन कासल' या आगबोटीवर गुजरातीत केले. ते डिसेम्बर 1909 मध्ये 'इंडियन ओपिनियन' च्या दोन अंका प्रसिद्ध झाले. हे पुस्तक खासकरून संवादशैलीमध्ये लिहलेले आहे. सम्पादक व वाचक यामधील तो संवाद आहे. पाश्चात्य सभ्यतेच्या विकासात विनाशाजी बीजे आहेत अशी गांधींची धारणा असल्याचे दिसते. गांधी युरोपीय सभ्यतेवर कडाडून हल्ला करतात ते याच धारणेतून. युरोपीय भांडवली विकास हा निसर्गाच्या अपरिमित नुकसानीतून उभा राहिलेला असून हा विकास सम्पूर्ण मानवजातीला विनाशाकडे घेऊन जाईल असे त्यांचे त्याविषयीचे मत असल्याचे दिसते.

गांधींचा रचनात्मक कार्यक्रम व शाश्वत विकासाचे तत्व:

गांधीचा रचनात्मक कार्यक्रम ही छोटेखानी पुस्तिका लिहलेली होती. 1941 साली युद्धकालीन कॉग्रेसची रणनीती काय असावी हे ठरविण्यासाठी कॉन्ग्रेस वर्किंग कमिटीची बैठक निमंत्रित करण्यात आली होती. या बैठकिला उपस्थित राहण्यासाठी गांधी बार्डोलीला निघाले असता प्रवासादरम्यान ही पुस्तिका रचल्या गेली. त्यात त्यांनी साम्प्रदायिक व जातीय ऐक्य, शिक्षण, आरोग्य, स्वास्थ्य, ग्रामोद्योग, ग्रामिण विकास, सांडपाण्यची व्यवस्था या मूलभूत बाबींचा उहापोह केला. रचनात्मक कार्यक्रमांमूळे व्यक्ती समाजाच्या व्यापक व मूलगामी प्रश्नांशी जोडला जातो. गांधींचा रचनात्मक कार्यक्रम हा नागरी समाजाच्या क्षेत्रामध्ये विशिष्ट राजकीय दृष्टी, दिशा व मूल्यव्यवस्था घेऊन केलेला जाणीवपूर्वक हस्तक्षेप होता असे यशवंत सुमंत लिहितात.[5]

गांधींनी आपल्या रचनात्मक कार्यक्रमामध्ये शाश्वत विकासाच्या संदर्भात खालील मुद्द्यांवर अधिक भर दिल्याचे दिसते.

1. विधायक कार्यक्रम: आर्थिक दृष्टी:

निसर्गोपचार, स्वास्थ, आहारशास्त्रातील त्यांचे प्रयोग शाश्वत विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे मानल्या गेले पाहिजेत असे आहेत. निसर्गोपचार, आहारशास्त्र याबाबतचे गांधींनी जे प्रयोग केले त्यातून ती आधुनिक वैद्यक, आहारपद्धती, आरोग्यसेवा याविषयी काही मूलभूत प्रश्न उपस्थित करतात.[6] डॉक्टरांनी घेतलेल्या शुल्कावर कुठलेच निर्बंध का नसावे? ते माणसाच्या एकूण स्वास्थाविषयीचे सम्पूर्ण मार्गदर्शन का करीत नाहीत? आरोग्य, औषधोपचार, व स्वास्थाच्या सामाजिक आयामांचा विसर का पडतो? उत्तम आरोग्य सेवा गरीबातल्या गरीब माणसाला का उपलब्ध होत नाही? मूळात हा त्यांच्या पेश्यावरील टिका नाही. तर अनुत्पादक सेवांमधून प्राप्त होणाऱ्या मिळकतीची कमाल मर्यादा किती असावी, याचा कधीतरी विवेकी विचार माणूस करेल का असा प्रश्न ते विचारू पाहात आहे. गांधींनी कमीतकमी खर्चाचा पण आरोग्यदायी आहार काय असतो याचा बारबारकाईने विचार केलेला दिसतो. आहारामध्ये साखरेपेक्षा गूळ, लिम्बापेक्षा चिंच, कोंड्यासहित गव्हाचे पिठ, हातसडीचे तांदळ यांच्या वापराबाबत ते आग्रही आहेत. गांधी यातून गरीबानूकूल सत्वयुक्त आहाराचे अर्थशास्त्रच सांगत आहे.[7]

2. शाश्वत विकासामध्ये उत्पादनसंबंधीच्या ग्रामीण पुनर्रचनेची भुमिका:

ग्रामीण पुनर्रचनेकडे गांधी लोकशाही विकेंद्राकरणाच्या दृष्टीकोणातून बघतात. कम्युनिटी लाईफचे आकर्षण म्हणूनही आपण त्यांच्या या विचारांकडे पाहिले पाहिजे. वास्तविक गांधींचा ग्रामीण पुनर्रचनेचा कार्यक्रम हा उत्पादनसंबंधीची फेररचना करण्याचा क्रांतीकारी कार्यक्रम म्हटल्या गेले पाहिजे.[8] गांधींच्या ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमात जमिनीवर आधारीत उत्पादसंबंधीची पुनर्रचना, ग्रामीण उद्योग व ग्रामीण रोजगार. आरोग्य, शेतीनिष्ठ अर्थकारण, श्रमप्रधान उत्पादन या सर्वांचा विचार केला. गांधीचा ग्रामीण पुनर्रचनेचा कार्यक्रम पर्यावरणकेंद्री मानल्या गेला पाहिजे.

3. शाश्वत विकास व ग्रामोद्योग संकल्पना:

गांधीच्या मते, शाश्वत विकासाच्या संदर्भात स्थिर प्रगती आवश्यक मानतात. अशी स्थिर प्रगती कशी साध्य करता येईल? तर ग्राम व कुटीरउद्योगच्या माध्यमातून विकास हेच त्याचे उत्तर राहिल असे ते म्हणतात. लाभाचे प्रमाण वाढवणे हे कुटीरउद्योगाचा उद्देश्य नसतो. असे उद्योग आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य नसले तरी सामाजिक दृष्ट्या व्यवहार्य आहे. कारण याद्वारे कमी प्रमाणात का होईना पण समाजातील श्रमिकांना सतत रोजगार उपलब्ध होत असतो. अशा स्थानिक पातळीवरील देशी उद्योगांच्या विकासामुळे नफ्याचे प्रामाण जरी

वाढले नसले तरी रोजगाराचे प्रमाण वाढेल. विकास शाश्वत होण्यासाठी लोकांना किमान मूलभूत गरजांची पूर्तता करण्याइतका रोजगार मिळावा अधी गांधींची अपेक्षा होती.

"दळणे, कांडणे, साबण, कागद व आगपेट्या तयार करणे, कातडी कमावणे, तेल काढणे इत्यादि ग्रामोद्योगाशिवाय खेड्याचे अर्थकारण सम्पूर्ण होणार नाही. खेड्यात बनलेल्या वस्तूंना मागणी उत्पन्न झाली तर आपल्या बहुतेक गरजा आपली खेडेच भागवतील यांत काही संशय नाही आपली मनोवृत्ती ग्रामोन्मुख झाली पाहिजे म्हणजे पश्चात्यांचा नकलेच्या किंवा यंत्रांनी बनवलेल्या वस्तु हव्याश्या वाटणार नाही."[9] असे गांधी रचनात्मक कार्यक्रमावर भाष्य करताना म्हणतात.

4. स्वच्छता व शाश्वत विकासाचा सहसंबंध:

गांधींसाठी स्वच्छतेचे स्थान सर्वोच्च आहे. आपल्याला खेड्यांना सर्व प्रकारच्या स्वच्छतेचे आदर्श नमूने बनविता आले पाहिजे असे गांधी म्हणत. राष्ट्रीय किंवा सामाजिक स्वच्छ्तेची जाणीव असणे हा आमच्यातला असणारा आवश्याक सदगुण मानला गेला पाहिजे. आपण कश्या तरी प्रकारचे स्नान करतो खरे परंतू ज्या विहिरीत, तलावांत किंवा नदीत किंवा ज्यांच्या काठी आपण स्नान वा धार्मिक विधि करतो ती घाण झाली तर आपल्याला त्याची पर्वा नसते. हा एक मोठा दुर्गुण मानल्या गेला पाहिजे. केवळ ग्रामसफाईचा उल्लेख केल्याने त्यांत आरोग्य व स्वच्छतेचा समावेश होऊ शकत नाही. स्वत:च्या आरोग्याचे रक्षण करण्याची कला आणि स्वछतेचे ज्ञान हा एक स्वतंत्र अभ्यासचा विषय आहे. मनुष्यजातीला जे अनेक व्याधींनी ग्रासलेलेले आहे त्यात आरोग्य व स्वच्छतेच्या नियमांचे पालन करणे हे एक मुख्य कारण होय. आपली मने जर निरोगी झाली तर आपण सर्व प्रकारच्या हिंसेचा त्याग करू आणि मग स्वाभाविकपणेच आरोग्याच्या नियमांचे पालन करू म्हणजे आपली शरीरे अनायासे निरोगी होतील. तुमचे पाणी, अन्न आणि हवा ही सर्व स्वच्छ व शुद्ध असली पाहिजेत आणि केवळ स्वत:पुरतीच स्वच्छता बाळगून समाधान न मानता जी त्रिविध स्वच्छ्ता तुम्हाला स्वत:च्या बाबतीत पालावीशी वाटेल त्याच त्रिविध स्वच्छतेचा प्रचार आपल्या भोवताली लोकांनी करावे असे गांधी सांगतात.

5. शाश्वत विकासासाठी खादीच्या वापरावर भर:

गांधीच्या मते, खादी ही देशातील सर्व जनतेच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या व समतेच्या प्रारंभीची सूचक आहे. गांधी गरीबीच्या प्रश्नावरचा उतारा म्हणून खादी वर भर देतात. खादी म्हणजे सर्वव्यापी स्वदेशी मनोवृत्ती, जीवनाच्या सर्व गरजा भारतातूनच आणि त्याही खेड्यातील लोकांच्या श्रम आणि बुद्धीचा उपयोग करून भागविण्याचा कृतनिश्चय होय. शहरे खेड्यांचे शोषण व विनाश करतात असा त्यांचा समज होता. खादीच्या वापरामुळे खेडी बव्हंशी स्वावलंबी व स्वयंपूर्ण होतील आणि स्वेच्छेने दोन्ही पक्षांना लाभदायक होईल अश्या तऱ्हेने भारतातील शहरांच्या आणि बाहेरील जगाच्याही उपयोगी पडतील. खादी मनोवृत्ती म्हणजे जीवनाला आवश्यक अशा वस्तूंच्या उत्पादनाचे व विभागणीचे विकेंद्रीकरण होय. खादीच्या उत्पादनात कापसाची लागवड करणे, कापूस वेचणे, कापूस रेचणे, तो साफ करणे, पिंजणे, पेळू करणे, कातणे खळ देणे किंवा पाजणी करणे, रंगवणे, ताणावाणा करणे, विणणे आणि घूणे इतक्या गोष्टीचा समावेश होतो.[10] यातील एकूण एक क्रिया खेड्यात उत्तम तऱ्हेने होऊ शकते व यातून ग्रामीण भागात प्रत्येकाच्या हाताला रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

6. अहिंसा व प्राणीमात्रांच्या प्रति सहवेदना:

गाधींच्या मते, मनुष्याला निसर्गाचे वरदान प्राप्त झालेले आहे. परंतू निसर्गाला हानी पोहचविण्याचा कुठलाही अधिकर मनुष्यजातीला नाही. अहिंसा व सहवेदना केवळ जीवित प्राण्यांबद्दलच नव्हे तर जे निर्जीव व

मृत पदार्थ आहेत त्यांच्या बद्दल सुद्धा ती सहवेदना असायला हवी असे गांधी सांगतात. भांडवली विकासासाठी नैसर्गिक साधनसम्पत्तीचा जो अपार वापर माणूस करतोय त्यामुळे जैववैविधता व पर्यावरणाची अपरिमित हानी होत आहे. त्यामुळे ही सहवेदना प्राणीमात्रांसोबतच निर्जीव वस्तुंप्रती सुद्धा असायला हवी असे गांधी सुचवितात.

निष्कर्ष:

विकासाच्या संदर्भात गांधी सजग व सतर्क असल्याचे दिसून येते. भांडवलवादी विकासाच्या अंदाधुंद स्पर्धेमुळे अनेक समस्या निर्माण होऊ शकते याची त्यांना सखोल जाणीव होती. विकासाचे वर्तमान प्रारूप अनेक समस्यांना जन्म देईल असा त्यांचा दृष्तीकोण होता. त्यांनी म्हटल्याप्रमाणे, 'विकासाच्या अनुषंगाने युरोपीय लोकांनी बाळगलेल्या विकास प्रारूपाचा पुनर्विचार व्हायला हवा. युरोपीय पश्चिमी सभ्यतेने माणसाला माणासूपासून दूर केल्याचे गांधी नमूद करतात.' यावर उपाय म्हणून स्वत:च्या गराजांवर नियंत्रण ठेवून त्या मर्यादित करणे हाच एकमेव उपाय गांधी सुचवितात. मनुष्य आपल्या गरजा ज्या प्रमाणात वाढवितात तितक्याच प्रमाणात माणूस दुसऱ्यांवर हक्क बजाविण्याचा प्रयत्न करतो. दुसऱ्या6चा हक्क याचा अर्थ शेवटच्या माणसाला दूर सारणे होय ज्यांचा सर्वाधिक अश्या संसाधनांची गरज आहे. गांधींचा पर्यावरणवाद नैतिक सिद्धांतावर आधारलेला होता. गांधींचे आपल्या शरीर व बुद्धीवर पुर्ण नियंत्रण होते. त्यांनी असा कोणताही संदेश दिलेला नाही जो त्यांनी आपल्या प्रत्यक्ष जीवनात अंमलात आणलेला नाही. 21 व्या शतकात गांधीजींनी सांगितलेल्या मार्गांचे अनुसरण केल्यास शाश्वत विकासाच्या धारणेला अधिक बळकटी प्राप्त होऊ शकते. गरीब व श्रीमंत यांच्यामधील दरी नष्ट होऊ शकते. तसेच सर्वांना सम्मानजनक जीवनयापनाची साधने उपलब्ध होऊन येणाऱ्या पिढ्यांसाठी भविष्यात ही संसाधने कायम ठेवू शकू.

संदर्भ-ग्रंथ:

1. घोष, बी. एन., (2019), गांधीप्रणीत अर्थशास्त्राच्या पलीकडे, सेज प्रकाशन, न्यू दिल्ली.
2. उपरोक्त.
3. पांडेय, संदिप (2020), पर्यावरणीय अवक्रमण एवं गांधींजी का पर्यावरण चिंतन, Research Review International Journal of Multidisciplinary, Volume-5, issue-02
4. उपरोक्त.
5. सुमंत, यशवंत (2016), महात्मा गांधींची विचारसृष्टी: काही अलक्षित पैलू, साधना प्रकाशन, पुणे.
6. उपरोक्त.
7. उपरोक्त.
8. उपरोक्त.
9. गांधी, मोहनदास (1946), विधायक कार्यक्रम: त्याचे रहस्य व स्थान, नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद
10. . उपरोक्त.

भारतीय कीर्तन परंपरेचा विचार

श्री ह.भ.प.वसुदेव पाटलोबा मुंडे
एम.ए.संस्कृत, नेट, सेट उत्तीर्ण
रा. लिंबोटा, पांगरी ता. परळी–वै. जि.बीड

कीर्तन परंपरा ही भारताची बहुमूल्य पारंपारिक, सांस्कृतिक वारसा आहे. या भारतीय कीर्तन परंपरेचा उदय हा तत्त्वज्ञान, शास्त्रे, संत वाङ्मय, संत साहित्य, संगीत, वक्तृत्व, भक्तिभाव, आत्मोध्दार, धर्मवृध्दी, जनप्रबोधन, लोकसंघटन, राष्ट्रसंघटन, संस्कृतीकरण या सर्व बहुविध संघटकांच्या मधुन या भारतीय कीर्तन परंपरा या पुरुषाचा उदय झाला. या कीर्तनामध्ये (कीर्तनकारांमध्ये) समाज परिवर्तन करण्याचे सामर्थ्य या कीर्तनामध्ये असते, जे राजसत्ता, मोठमोठया चळवळी, समाजसंघटना किंवा प्रसार माध्यमांना जे शक्य झाले नाही म्हणजे परिवर्तन करु शकले नाहीत ते परिवर्तन केवळ मात्र कीर्तनकारांने आपल्या कीर्तनातून करणे शक्य असते. आदरणीय वै.श्री.ह.भ.प. धुंडा महाराज देगलुरकर म्हणायचे, 'कीर्तनकारच समाज तारील' कारण आजच्या काळात विचार करायचा झााला तर आपल्या देशावर सर्वात आलेले मोठे संकट ते म्हणजे 'कोरोना' यावर सुध्दा आज कीर्तनाद्वारेसमाज जागृती कीर्तनातून केली जाते. आज आपल्या देशावर अनेक समस्या निराकरणासाठी शासन आज कीर्तनाचाच आश्रय घेत आहे. टी.व्ही. या माध्यमाच्या द्वारे कीर्तनातून उपदेश केला जातो. रेडिओ, मोबाईल यांच्याद्वारे समाजातील ज्या समस्या आहेत की, ज्या दारुबंदी, गोहत्या, लोकसंख्या, कुटुंब नियोजन, साक्षरता, प्रदुषण, बेटी वाचवा, झाडे लावा इत्यादी समस्यांचे निराकरण शासन आज कीर्तनाद्वारे करत आहे.

भारतीय कीर्तन परंपरेचे आद्यजनक व प्राचीनता :–

भारतातील भारतीय कीर्तनपरंरेचा आणि कीर्तन परंपरेच्या संस्थेचा उदय मात्र फारपूर्वी प्राचीन काळी झााला आहे आणि या कीर्तन परंपरेचे पहिले कीर्तनकार (आद्यजनक) म्हणून ब्रम्हदेवाचे माणसपुत्र महर्षी श्री नारद महाराज हे होते. या संदर्भाचे सर्व पुरावे आपणास प्राचीन ग्रंथ व साहित्यात आढळतात. इ.स.पू.1500 प्राचीन वेदकाळात वैदिक वाङ्मयाचा वैदिक देवतांचा, ध्यान, नामस्मरण, यज्ञायाग आणि वेदांत पठाण इत्याादी या उपासना मार्गांचा उदय हा वैदिक काळातच झाला. याचे संदर्भ म्हणून विष्णुपुराणात केलेले आहे.

ध्यायन्कृते यजन्यज्ञैस्त्रेतायां द्वापरिर्चयन।
यदाप्नोती तदाप्नोती कली संकीर्त्य केशवम् ।।विष्णुपुराण।।

कृतयुगात देवाची प्राप्ती ध्यानाने होत होती. त्रेतायुगात भगवंताची प्राप्ती यज्ञाने होत होती. द्वापारयुगात ईश्वराची प्राप्ती पुजेने होत होती. तसेच कलयुगात मात्र केशवाच्या संकीर्तनाने प्राप्ती होते. तसेच 18 पुराणांपैकी एक पुराण त्या पुराणाचे नाव श्रीमद्भाागवत पुराणामध्ये भक्तिमहिमा, भक्तिप्रकार, भक्तिस्वरुप आणि कीर्तनभक्तीची यथार्थपणे म्हणजे विस्ताराने चर्चा केलेली आहे.

श्रवणं कीर्तनं विष्णो स्मरणं पादसेवनम् ।
आर्चनं वदनं दास्य सख्यमात्मनिवेदनम् ।।भा.7/5/23।।

श्रवणभक्ति, कीर्तनभक्ति, स्मरणभक्ति, पादसेवनभक्ति, अर्चन (पूजा) भक्ति, वंदनभक्ति, दास्यभक्ति, संख्यभक्ति आणि आत्मनिवेदनभक्ति या नऊ प्रकारच्या भक्ति आहेत आणि याचा विस्तार भागवतात केलेला आहे. मात्र यातील आठ भक्ति ह्या वैयक्तिक आहेत. केवळ आणि केवळ कीर्तन भक्ति ही एकमेव

प्रकार सामुहिक स्वरुपाचा आहे. भारतातील भक्तिसांप्रदायामध्ये कीर्तनाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झााले आहे. कारण महर्षी नारद महाराज यांनी आरंभ केलेली कीर्तनभक्ती ही वेगवेगळ्या प्रांतामध्ये विस्तारलेली आहे. उत्तरप्रदेश, बंगाल, गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडु, पंजाब आणि महाराष्ट्र इत्यादी राज्यांमध्ये कीर्तनभक्तीचा विस्तार झालेला आहे. तसेच व्यास महर्षी पुत्र श्री शुक्राचार्य हे पण कीर्तन करत होते असा उल्लेख आणि संदर्भ आपल्या वेगवेगळया वैदिक वाङ्मयात आढळतात.

प्रल्हादस्तालधारी तरलगतितया ह्युध्दवः कास्यधारी
वीणाधारी सुरर्षिः स्वरकुशलतया रागकर्ताजुनोऽभूत्।
इंद्रोऽवादीन्मृंदग्रे जयजयसुकराः कीर्तने ते कुमारा
यत्राये भाववक्ता सरसंरचनया व्यासपुत्रो बभूव।।पद्म.भा.पुराण।।

श्री शुक्राचार्य महाराज कीर्तन (निरुपण) करत असतांना संगीत साथ संगत करणारे मंडळी प्रल्हाद ताळ धरणारे होते. उध्दव झांज वाजविणारे होते. सुरर्षी नारद महाराज वीणा वाजवीत होते. मृदंग इंद्र वाजवीत होते. सनकादी चारही भाऊ हे कीर्तनात जयजयकार करीत होते. आणि भाववक्ता व्यासपुत्र श्री शुक्राचार्य महाराज निरुपण (कीर्तन) करीत होते. तसेच याच संदर्भाचा एक अभंगात उल्लेख संत एकनाथ महाराजांच्या साहित्यामध्ये आढळतात. या अभंगामध्ये प्राचीन कीर्तनकारांचा उल्लेख आहे.

नारद प्रल्हाद अंबरीश। विनिटला कीर्तनासी।
व्यास शुक नामदेव। धरिती भाव कीर्तनी।।एकनाथ म.।।

या अभंगात नारद महाराज, प्रल्हाद महाराज, व्यास महाराज, शुक महाराज आणि नामदेव महाराज इत्यादी प्राचीन कीर्तनकार यांचा उल्लेख या अभंगाद्वारे केला गेला आहे. त्यामध्ये अनेक संत महापुरुषांचे (कीर्तनकारांचे) योगदान यामध्ये आहे. तसेच अनेक वेगवेगळी सांप्रदाय यामध्ये आहेत. जैन संप्रदाय, बौध्द संप्रदाय, वैष्णव संप्रदाय, शाक्त संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, लिंगायत संप्रदाय, नाथ संप्रदाय, दत्त संप्रदाय, वारकरी संप्रदाय, सुफी संप्रदाय इत्यादी संप्रदाय आहेत. त्यामधील वेगवेगळी परंपरेतील कीर्तनकार आहेत. गुरुगोविंदसिंह महाराज, मुकुंदराज स्वामी महाराज, चक्रधर स्वामी महाराज, ज्ञानेश्वर महाराज, दासोपंत महाराज, एकनाथ महाराज, मुक्तेश्वर महाराज, नामदेव महाराज, मुक्ताबाई, बहिणाबाई, तुकाराम महाराज, स्वामी रामदास महाराज, स्वामी अमृतराय महाराज, वामन पंडित,मोरोपंत महाराज, शेख मोहंमद महाराज, चोखोबाराय महाराज, गोरोबा काका महाराज, गुंडा महाराज, वीरनाथ महाराज, लक्ष्मण महाराज, मल्लाप्पा वासकर महाराज, सद्गुरु जोग महाराज, बंकट स्वामी महाराज, रंगनाथ महाराज, धंडा महाराज, विठ्ठलशास्त्री महाराज, दासगुण महाराज, वामनभाऊ महाराज, भगवानबाबा महाराज, जगमित्र नागो महाराज, इत्यादी सत्पुरुष कीर्तनकार महाराज मंडळींनी कीर्तन भक्तीचा सर्वत्र प्रसार–प्रचार करीत होते. आणि कीर्तन महिमा यांनी आपल्या वचनातून प्रगट केला गेला. संत ज्ञानेश्वर महाराज यांनी कीर्तन महिमा आपल्या ज्ञानेश्वरीतील ओव्याद्वारे केला गेला.

कीर्तनाचेनि नट नाचे। नाशिले व्यवसाय प्राश्चिताचे।
जे नामाचे नाही पापाचे। ऐसे केले ।।ज्ञानेश्वरी।।

संत नामदेव महाराज यांनी कीर्तनाचा महिमा आपल्या वचनातून गायला गेला.

नाचु कीर्तनाचे रंगी। ज्ञानदिप लावू जगी।।
सर्व सांडोनि माझााई। वाचे विठ्ठल रखुमाई।।ना.म.।।

संत तुकाराम महाराज यांनी कथा, नाम आणि कीर्तन चा उल्लेख आपल्या वचनातून केला गेला.

नाम संकीर्तन साधन पै सोपै।जळतील पापे जन्मांतरीची।।तु.म.।।

कथा त्रिवेणी संगम। देवभक्त आणि नाम।
तेथेचि उत्तम। चरण रज वंदिती।।तु.म.।।

म.स्वामी रामदास महाराज आपल्या वचनातून कीर्तनाची परिभाषा करतात.

सगुण हरिकथा या नाव कीर्तन। अध्दैत म्हणजे निरुपण।।
सगुणे रक्षोण निर्गुण। बोलत जावे।।स.स्वा.रामदास।।

शिख गुरु नानक पण कीर्तनाची व्याख्या आपल्या वचनातून करतात.

कलियुग में कीर्तन प्रधान। गुरु मुखजपिये लाय ते तेहना।।गु.ना.।।

संत तुळशीदास महाराज पण आपल्या साहित्य रचनेतून कीर्तन महिमेचे यथार्थ वर्णन करतात.

भवसागर यह पार जो पावा। रामकथा ताकंह दृढ नामा।।
कहो कहालगी नाम बढाई।
रामु न सकही नामु गुण गाई।।तुळशीदास।।

संत नरसी मेहता महाराजयांनी पण आपली कीर्तनमहिमा गायला गेला.

संतो अमेरे वेहपारिया श्रीरामनामना ।।नरसी मेहता।।

संत पुरंदरदास महाराज यांनी पण कीर्तनाचा महिमा वर्णन केला गेलेला आहे.

स्मरणे वोंदु सालंदे गोविंदन नाम वोंदु सालंदे।
वेंदे नामदले डगिदवो,आनंददिंद सुरुव अखिलवेदगळु।।पुरंदरदास।।

संत शंकरदेव यांनी पण आपल्या भाषेत कीर्तनाची व्याख्या केली गेली.

हरिगुणनाम श्रवण कीर्तने, करये चित्त निर्मळ।।

कृष्णोपासक संत चैतन्यप्रभूजी महाराज यांनी आपल्या वाणीतून कीर्तनाचा महिमा वर्णन केलेला आहे.

चेत्तो दर्पण मार्जनं भवमहादावाग्नि निर्वापणं।
सर्वात्मस्नपनं परंम विजयते श्रीकृश्ण संकीर्तनम्।।चैतन्य प्रभूजी।।

इत्यादी अनेक थोर पुरुष, साक्षात्कारी संत यांनी आपापल्या वचनातून, साहित्यातून, काव्यातून, दोह्यातून, श्लोकातून, कीर्तनाचा महिमा यथार्थपणे वर्णन केला गेला आणि आज यायुगात जर विचार केला तर चार युंगामध्ये आयुष्य मर्यादा आणि साधन पण वेगवेगळ्या सांगितल्या गेलेल्या आहेत. पण कलियुगात मात्र कीर्तनास फार मोठे महत्त्व दिले गेले आहे. असे अनेक संदर्भ आपल्या संस्कृत आणि मराठी संत वाङ्मयात आपल्याला प्रामुख्याने आढळतात. कारण कलियुगात नामानेचदेव प्राप्ती होते असे शास्त्र सांगते.

कृते यद् ध्यायतो विष्णूं त्रेतायां यजतो मखैः।
द्वापारे परिचर्यानाम कलौ तद्हरि कीर्तनात ।।भागवत।।

या श्लोकामध्ये ग्रंथकार चारयुगाची साधना म्हणजे ईश्वरप्राप्ती कशाने होते ते सांगता कृतयुगात देवाची प्राप्ती ध्यानाने होते. त्रेतायुगात भगवंताची प्राप्ती यज्ञामुळे होते. द्वापार युगात ईश्वराची प्राप्ती पुजेने होते. आणि कलियुगात फक्त कीर्तनातूनच (नामाने) देव प्राप्ती होते. असाच एक संत वचन या संदर्भाचे पाहायला मिळतात. तो अशा अभंगाद्वारे...

युक्ताहार न लगे आणिक साधने। अल्प नारायणे दाखविले।।1।।
कलियुगामांजी करावे कीर्तन।तेणे नारायण देईल भेटी।।धृ।।तु.म.।।

अथवा

सकळांसी येथे आहे अधिकार। कलियुगी उध्दार हरिच्या नामे।।तु.म.।।

या कलियुगात सर्व वर्णांना नाम घेण्याचा अधिकार दिला गेला आहे कारण आयुष्य हे अल्प आहे. त्यामुळे साधन हे नाम निवडले गेले आहे. कारण कृतयुगात आयुष्य 1लाख वर्ष होते. त्रेतायुगात 10 हजार वर्ष होते. द्वापार युगात 1 हजार वर्ष आयुष्य होते आणि कलियुगात मात्र 100 वर्ष आयुष्य दिले गेले आहे. म्हणून या युगात साधना पण ही कीर्तन (नाम) दिली आहे. कीर्तनाचे सहा प्रकार (विषये) असतात.

1.स्वरुप कीर्तन :– या स्वरुप कीर्तनामध्ये जीव ब्रम्हौक्य विचार, तत्त्वज्ञान विचार, वेदांत विषयी विचार असे अनेक वेगवेगळ्या विषयाचे तात्विक विचार यामध्ये सांगितले (वर्णन) केले जातात.

2. गुणकीर्तन :– या कीर्तनामध्ये देवाच्या गुणाचे वर्णन केले गेले आहे. देवाचे अनेक गुण आहेत, त्यापैकी मुख्य सहा गुण आहेत याचे वर्णन या गुण कीर्तनात वर्णिले जातात.

ओवी – **1) ऐका यश श्री औदार्य। ज्ञान वैराग्य ऐश्वर्य।**
हे साही गुणवर्य। वसती जेथ।।ज्ञानेश्वरी।।
2) म्हणेनि तो भगवंतु।
3) षड्गुण ऐश्वर्य संपन्न। एक भगवंताची जाण।।तु.म.।।
करावे कीर्तन। मुखी गावे हरिचे गुण ।।तु.म.।।
4) 'गुण' गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी।।तु.म.।।

3. धर्मकीर्तन :– या कीर्तनामध्ये धर्माचे महत्त्व काय ? धर्म म्हणजे काय ? धर्माची लक्षणे कोणती ? इत्यादी विषय यामध्ये असतात.

किंबहुना तुमचे केले। धर्मकीर्तन हे सिध्दी नेले।
तेथ माझे जी उरले। पायीकपण।। ज्ञानेश्वरी।।
धर्माचे पालन। करो पाखंड खंडन।।तु.म.।।
धारयति इति धर्मः।।निरुक्त।।
यत्र यत्र धर्मो तत्र तत्र जयाः।।

यास धर्म कीर्तन असे म्हणतात.

4. लिला कीर्तन :– ज्या कीर्तनामध्ये भगवान श्रीकृष्णाच्या लिला वर्णन करतात, त्यास लिला कीर्तन असे म्हणतात.

गाईने ते लिला चरित्र पवाडे। राखिले सवंगडे सहित गाई।।तु.म.।।

5. नामसंकीर्तन :–या कीर्तनात नामस्मरण, नामाचे महत्त्व प्रतिपादन, नामाचे फायदे इत्यादी असे नामाविषयक विषयांचे वर्णन ज्यात केले जाते त्यास नामसंकीर्तन असे म्हणतात. आणि हे कीर्तन सर्वात सोपे आहे.

नामसंकीर्तन साधन पै सोपे। जळतील पापे जन्मांतरीची।।ज्ञा.म.।।
नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी।। पापे अनंत कोटी गेली त्याची।।तु.म.।।
तृण अग्नीमेळे समरस झाले। तैसे नाम केले जपताहरि।।ज्ञा.म.।।

6.संतकीर्तनः–ज्या कीर्तनामध्ये संत कार्याचे वर्णन असते, ज्यात संतमहिमा वर्णन केला जातो, ज्यात संतांची स्तुती केली जाते असे वर्णन ज्या कीर्तनात केली जातात, त्यास संतकीर्तन असे म्हणतात.

ये मे भक्तजनाः पार्थ न मे भक्ताश्च ते जनाः।
मद्भक्तानांच ये भक्तास्ते मे भक्तमता।।
तेही प्राणापरौते। आवडती हेनिरुते।

जे भक्तचरित्राते। प्रशंसती।।ज्ञानेश्वरी।।
जेणे करोनि मूर्ती अंतरी ठसावी श्रीहरीची।
ऐसी कीर्तन मर्यादा आहे संतांच्या घरची।।

अशा प्रकारे भारतीय कीर्तन परंपरेचा विचार थोडक्यात (संक्षिप्ताने) या ठिकाणी माझ्या अल्पशा मतीने मांडव्याचा पर्यंत केला गेला आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :–

1. कीर्तनरंग
2. नाचु कीर्तनाचे रंगी
3. तंजावरची मराठी कीर्तन परंपरा
4. ज्ञानेश्वरी
5. भजनी मालिका जोग महाराज वा.शि.संस्था
6. पंचरत्न हरिपाठ
7. तुकाराम महाराज गाथा प्रत

भारतात करण्यात आलेले खाजगीकरणाचे प्रयत्न व त्याच्या अडचणी

श्री पंकज पुरुषोत्तम मानकर

एम.कॉम, एम.फील, सेट, बि.एड

भारतीय अर्थव्यवस्था आज एका निर्णयात परिवर्तन प्रक्रियेतून वाटचाल करीत आहेसार्वजनिक क्षेत्र हे आर्थिक प्रगतीचे इंजिन बनेल अशी अपेक्षा होती परंतु 1970 च्या दशकाच्या माध्यमात पासून या अपेक्षांना तडे जायला लागले. 1988 मध्ये प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी सार्वजनिक क्षेत्राच्या धोरणात बदल करण्याबाबत स्पष्टपणे सांगितले की" जेथे व्हावयास नको होतात तेथे ही सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार झालेला आहे जेथे खाजगी क्षेत्र कार्यक्रम ठरू शकत नाही अशाच ठिकाणी सार्वजनिक क्षेत्राचा विकास करावयाचा आहे परंतु खाजगी क्षेत्राकरिता अधिक क्षेत्रे उपलब्ध करून देऊन ह्यामुळे त्यांचा विकास होऊन अर्थव्यवस्थेची प्रगती अधिक मुक्तपणे होऊ शकेल"अर्थव्यवस्थेत असे काही बदल घडून आले की भारताला आपल्या आर्थिक धोरणांचे पुनर्गठन करणे भाग पडेल. निनियंत्रित, खाजगीकरण व बाजारयंत्रणा ह्यावर आधारित आर्थिक धोरण स्वीकारावे लागले. अशा प्रकारच्या सर्व परिवर्तनाच्या संचायीप्रभावामुळे' नवीन औद्योगिक नीति 1991' ची घोषणा करण्यात आली.

काँग्रेस सरकारचे पंतप्रधान श्री नरसिंहराव यांनी 24 जुलै 1991 ला नवीन औद्योगिक धोरणाची घोषणा केली. या नवीन औद्योगिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेला नोकरशाहीच्या अनावश्यक जोखडातून मुक्त करणे भारतीय अर्थव्यवस्थेत उदारीकरण आणून तिला जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडण्याचे दृष्टीने आवश्यक असे उदार धोरण स्वीकारणे हे होय. हे नवीन धोरण अमलात आणण्याच्या दृष्टीने सरकारने पुढील क्षेत्रातील धोरणात आवश्यक त्या सुधारणा केल्या आहे 1) औद्योगिक परवाने 2) विदेशी गुंतवणूक 3) विदेशी तंत्रज्ञान 4) सार्वजनिक क्षेत्र 5) मक्तेदारी आणि व्यापार प्रतिबंधक प्रथांचा कायदा

1) **नवे औद्योगिक परवाना धोरण 1991**:-

या धोरणाचा प्रमुख उद्देश हा खाजगी मक्तेदारीचा उद्भव आणि थोड्या व्यक्तीच्या हातात आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊ न देणे हा होता.या धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे होती.

(अ) सुरक्षा आणि राष्ट्रीय महत्त्वाचे आठ प्रकारचे उद्योग उदा.(i) दारूगोळा व शस्त्रास्त्रे आणि संरक्षण विषयक उपकरणे (ii) अनुशक्ती (iii) कोळसावलिंगाईट (iv) खनिजतेल (v) सोने, हिरे, क्रोमइत्यादीखनिजांच्याखाणी (vi) अणुशक्तीसाठीलागणारीखनिजे (vii) रेल्वे वाहतूक (viii) तांबे, जस्त, झिंक, टिन, मोलिडेनम व बोल प्रामाच्या खाणी.

(ब) अनुसूची II मध्ये नमूद केलेले 18 प्रकारचे उद्योग सोडले तर इतर सर्व उद्योगांसाठी परवान्याची आवश्यकता राहणार नाही. कोळसा,दारूचीपेये, साखर, सिगारेट,चामडी, कागद, औद्योगिक स्फोटक, औषधी वस्तू, रंगी टेलीविजन, व्ही.सी.आर, टेपरेकॉर्डर इत्यादी करमणुकीच्या इलेक्ट्रॉनिक वस्तू इत्यादींचा समावेश या 18 वस्तूमध्ये आहे.या वस्तू करिता परवाना आवश्यक आहे. यापैकी कोणताही उद्योग छोट्या प्रमाणावर

काढण्यासाठी परवाना लागणार नाही. ज्या प्रकल्पांमध्ये आयात केलेल्या भांडवली वस्तूंची आवश्यकता आहे अशा प्रकल्पांना आपोआप मंजुरी मिळेल.

(क) 10 लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या गावांमध्ये उद्योग धंदा काढण्यासाठी केंद्र सरकारच्या संमतीची गरज जाणार नाही

(ड) अस्तित्वात असणाऱ्या उद्योगांना विस्तार करण्याकरिता परवान्याची गरज लागणार नाही

2) **विदेशी गुंतवणूक**:-

विशेष अग्रक्रम असणाऱ्या आणि मोठी गुंतवणूक व प्रगत तंत्रज्ञान असणाऱ्या उद्योगांमध्ये विदेशी गुंतवणुकीला आकर्षित करण्यासाठी प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक 51% समता भांडवलापर्यंत करण्याची संमती देण्यात येईल.

जागतिक बाजारपेठांमध्ये भारतीय मालाची निर्यात वाढविण्याकरिता विदेशी व्यापारी कंपन्यांनी निर्यातकांना सहाय्य करावे याकरिता उत्तेजन देण्यात येईल. एक विशेष मंडळ स्थापन करून त्याद्वारे विदेशातील मोठ्या व्यापारी पेढ्यांची गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाचा विकास याबाबतची वाटाघाटी करण्यात येतील.

2) **विदेशी तंत्रज्ञान**:-

विदेशातून तंत्रविद्येची व तांत्रिकतेची आयात करण्याकरिता बरेचसे उपाय योजण्यात आलेले आहेत. निर्धारित सीमांच्या अंतर्गत, उच्च प्राथमिकता असलेल्या उद्योगांमध्ये तंत्रविद्येच्या आयातीकरिता कोणतीही अट न घालता परवानगी देण्यात येईल. विदेशी विनिमयाचा खर्च ज्यात करावा लागणार नाही अशा उद्योगांनाही वरिल सवलती राहतील. परिशिष्ट II मधील 34 उद्योगांकरिता विदेशी तांत्रिक आयातीबाबत सरकारी परवानगी गरज राहणार नाही. परिशिष्ट II मध्ये नसलेल्या उद्योगांकरिता सुद्धा स्वय अनुमतीची सवलत राहील. परंतु या करिता विदेशी विनिमय खर्च होऊ नये अशी अट आहे. इतर बाबतीत सरकारी परवाना आवश्यक राहील. विदेशी तज्ञांची मदत व सेवा प्राप्त करण्याकरिता किंवा विदेशी तांत्रिक ज्ञानाच्या सहाय्याबाबत परवानगीची गरज राहणार नाही.

4) **सार्वजनिक क्षेत्राबाबत धोरण**:- सार्वजनिक उपक्रमांचासरकारी तिजोरीवर पडणारा भार दूर करण्यासाठी अत्यल्प नफा देणारे तसेच तोट्यात चालणारे सार्वजनिक उद्योग क्रमशः बंद करण्याचा सरकारचा विचार आहे. आज जरी तोट्यात चालणारे परंतु मूलतः सक्षम असणाऱ्या सार्वजनिक उपक्रमांची पुनर्रचना करण्यात येईल.भविष्यकाळातील सार्वजनिक उपक्रमांच्या विकासाच्या दृष्टीने पुढील प्रमाणे अग्रक्रम ठरवण्यात आलेत

(i) आधारभूत संरचनेसाठी आवश्यक अशा वस्तू व सेवा

(ii) तेल आणि खनिज द्रव्यांचा शोध आणि उत्पादन

(iii) खाजगी गुंतवणूक अपुरी असणारे व ज्या क्षेत्रात दीर्घकालीन विकासाच्यादृष्टीने तांत्रिक वृद्धी व कारखानी क्षमता निर्माण करणे आवश्यक आहे असे उद्योग.

(iv) देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक अशा वस्तूंचे उत्पादन उदा संरक्षणविषयक साधन सामुग्री

अग्रक्रम असलेले तसेच योग्य नफ्यात चालत असणाऱ्या सार्वजनिक उद्योगांना सुदृढ करण्याचे सरकारचे धोरण राहील व अशा उद्योगांना व्यवस्थापनेच्याबाबतीत पुरेशी स्वायत्तता देण्यात येईल. निवडक सार्वजनिक उपक्रमांचे समता भांडवल काही प्रमाणात बाजारात विकण्यात येईल. जे सार्वजनिक उद्योग

खाजगी क्षेत्राकडे सोपविण्यात येतील त्या उद्योगातील कामगारांचे हित संरक्षण करण्यासाठी एक सामाजिक सुरक्षा यंत्रणा स्थापन करण्यात येईल. काही निवडक क्षेत्रे पूर्णतः खाजगी क्षेत्रासाठी खुली करण्यात येऊन जी क्षेत्रे सार्वजनिक क्षेत्रासाठीराखून ठेवली नाहीत अशा क्षेत्रांमध्ये सार्वजनिक उपक्रमांना शिरण्याची परवानगी राहील.

सार्वजनिक क्षेत्राच्या विरुद्ध घेण्यात येणारे आक्षेप:-

सार्वजनिक क्षेत्र विरुद्ध घेण्यात येणारे प्रमुख आक्षेप म्हणजे गुंतवणुकीवर मिळणारा प्रत्याय दर कमी असणे, राष्ट्रीय बचतीत होत जाणारी घट,उत्पादन क्षमतेचा पर्याप्त वापर न होणे, आवश्यकतेपेक्षा जास्त कामगार भरती व नोकरशाही लालफित ह्यामुळे निर्णय घेण्यात व अंमलबजावणी करण्यात होणारीअक्षम्य दिरंगाई व दुर्मिळ अशा संसाधनाचा अपव्यय असेआहेत. खाजगीकरणाबाबतजरी मोठमोठ्या घोषणा करण्यात येत असल्या तरी त्या घोषणांना प्रत्यक्षात अमलात आणणे कठीण आहे.

खाजगीकरणात येणाऱ्या अडचणी:-

1) भारतातील श्रमिक संघटना ह्याविकसित व संघटित असल्यामुळे उद्योगांचे अराष्ट्रीयीकरण करून खाजगीकरण करण्यास ह्या संघटनांचा जबरदस्त विरोध आहे. राष्ट्रीय काँग्रेसची शाखा असलेली मजूर संघटना इंडियन नॅशनल, ट्रेड युनियन काँग्रेस(INTUC) ला सुद्धा इतर श्रमिक संघटनांना साथ देऊनअराष्ट्रीयकरणालासतत विरोध करावा लागत आहे.ह्यामुळेखाजगीकरणाबाबतभारतसरकारलाही प्रत्येकवेळी विचार करावा लागतो.
2) भारतात लोकशाही आहे. लोकशाही अर्थव्यवस्थेत श्रमिकांच्या हिताकडे दुर्लक्ष करून खाजगीकरण करणे अत्यंत कठीण आहे
3) खाजगीकरणाला विरोध असण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे ह्यात'कामगार कपात'सहजपणे केली जाते. सार्वजनिक उद्योगात 25 ते 30 टक्के अतिरिक्त कामगार आहेत. त्यामुळे खाजगीकरणातपहिली गोष्ट म्हणजे अतिरिक्त कामगारांना काढून टाकण्यात येते व त्यामुळे असंतोष निर्माण होतो.
4) खाजगीकरणामुळे कामगार कपात करावयाची झाल्यास त्यांना नुकसान भरपाई किंवा क्षतीपूर्तीम्हणून मोठी रक्कम द्यावी लागते व हा भुर्दंड सहन करावयाची उद्योगपतींची तयारी नसते.
5) क्षतीपूर्तीचीकिंवा नुकसान भरपाईची रक्कम देण्याची टाळाटाळ कापड उद्योगातील कामगारांना ह्या नुकसान भरपाईच्या रकमेतबद्दल अत्यंत कटू अनुभव आला आहे. ह्याबाबतसनतमेहताम्हणतात, "कारखानेबंदझाल्यामुळेज्याश्रमिकांचीनोकरीसुटलीत्यांच्याजवळउपजीविकेचे करिता काहीच नव्हते व त्यांना कायद्याने मिळणारी रक्कमही पूर्णपणे मिळाली नाही. काही बाबतीत ही रक्कम मिळण्यास बेकार कामगारांना 2 वर्षापासून ते 4 वर्षेपावेतो वाट पाहावी लागते.
6) विकसित देशांमध्ये ज्याप्रमाणे सुसंघटित अशा सामाजिक सुरक्षा प्रणाली असतात तशा भारतासारख्या विकसनशील देशात नसतात.ह्यामुळेखाजगीकरणाला विरोध होतो. सामाजिक सुरक्षा प्रणालीच्या अभावामुळे कपात किंवा स्वेच्छापूर्ण सेवानिवृत्ती ह्या योजनांना विरोध होत असतो.
7) मालक वर्ग श्रमिकांना द्याव्या लागणाऱ्या नुकसानभरपाईला एक फार मोठे ओझे मानतो व त्यामुळे मालक लोक शक्य तितक्या कायदेशीर व कायदेशीर व गैरकायदेशीर मार्गांचा अवलंब करून ती नुकसान भरपाई टाळण्याचा किंवा शक्य तितक्या उशिरा देण्याचा प्रयत्न करीत असतात. मालक

वर्गांची ही प्रवृत्ती व सरकारी मालकीच्या उद्योगांमधील दप्तरशाही दिरंगाईह्यामुळेआपणाला रक्कम लवकर मिळेल व ती एकाच वेळी मिळेल यावर कामगारांचा विश्वास नाही.

वरील विविध कारणांमुळे खाजगीकरणाला विरोध होत असला तरीही सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील काही उद्योग खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरित केले आहे. उदा.आंध्रप्रदेशातील सार्वजनिक क्षेत्रातीलआलविन निसार हिचे महेंद्रा कंपनीकडे हस्तांतरण, कर्नाटक सरकार चालवित असलेल्या ' मंगलोर केमिकल्स व फर्टीलायझर'चेयु.बी.ग्रुप कडे हस्तांतरण, महाराष्ट्र सरकारच्या अधिपत्याखाली स्कूटर्स उद्योगांचे बजाज ऑटो कडे हस्तांतरण, भारतात ॲल्युमिनियम कंपनी (BALCO)ची550 कोटी रु ला खाजगी उद्योगपतीला विक्री विशेष म्हणजे हा सार्वजनिक उद्योग नफ्यात चालत होता.

श्री. राजीव गांधी यांच्या शासन काळात आर्थिक सुधारणा :

1985 मध्ये पंतप्रधान झाल्यावर लवकरच नवीन आर्थिक धोरणांची रूपरेषा मांडली. उत्पादकतेत सुधारणा, आधुनिक तंत्रविज्ञानाचा वापर, उपलब्ध क्षमतेचा राष्ट्रीय पातळीवर महत्तम उपयोग करणे इत्यादी बाबी प्रामुख्याने त्यांनी मांडल्या. खाजगी क्षेत्राकडे अधिक कार्यभाग सोपविणे हे नवीन आर्थिक नीतीचे मुख्य अंग आहे. खासगीकरणाकरिता अधिक विस्तारित क्षेत्रे उपलब्ध व्हावी म्हणून धोरणात्मक बदल करण्यात आले. या परिवर्तनात औद्योगिक परवाना धोरण निर्यात- आयात धोरण, तांत्रिक विज्ञानाची प्रगती, निर्बंध हटविणे, वित्तीय व प्रशासकीय नियंत्रण पद्धती सोपी व सरळ करणे इत्यादींचा समावेश होता. अर्थव्यवस्थेत आधुनिकीकरण करण्याकरिता खाजगी क्षेत्रातून येणाऱ्या गुंतवणुकीला शक्यतो जास्तीत जास्त उत्तेजक मिळावे हा अशा परिवर्तन मार्गातील हेतू होता.

श्री. पी. व्ही. नरसिंहराव सरकारच्या अंतर्गत आर्थिक सुधारणा :

आर्थिक सुधारणांना श्री. राजीव गांधीच्या राजवटीत सुरुवात झाली असली तरी त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. व्यापारातील तूट बरीच वाढली. परिणामतः भारताच्या शोधनशेषात गंभीर समस्या निर्माण झाली. या गंभीर समस्येला तोंड देण्याकरिता भारताने जागतिक अधिकोष व आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष याकडे 7 अब्ज डॉलरचे कर्ज मागितले. या दोन संस्थांनी आर्थिक मदत देण्याचे कबूल केले परंतु भारताने आपल्या अर्थव्यवस्थेत स्थैर्य आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशी अट घातली.

स्त्रोत:-

1) सूक्ष्म अर्थशास्त्र 2002,2003 डॉ .जी. एन. झामरे
2) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र 1999 डॉ.जी.एन.झामरे
3) भारतीय औद्योगिक अर्थव्यवस्था 1988 मुतालिक देसाई, श्री भालेराव निर्मल
4) औद्योगिक घडण व धोरण प्रा. की. रा. छापखाने

माणगाव परिषद 20 मार्च 1920 ते 20 मार्च 2020 शताब्दी वर्ष

डॉ. विलास भारतराव बनसोडे
सहयोगी प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग, दादापाटील राजळे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, आदिनाथ नगर, ता. पाथर्डी, जिल्हा, अहमदनगर

म. फुल्यांनी शुद्रातिशुद्र हा शब्द प्रयोग करुन ज्यांच्ये धर्माच्या नावाने शोषण करण्यात येत आहे. अशा लोकांचा एक वर्गच कल्पिला. या वर्गाने विशेषेतः धर्माच्या क्षेत्रात उठाव करुन भटा ब्राम्हणांचे धार्मिक वर्चस्व झुगारून द्यावे. या साठीचे त्यांचे प्रत्यन होते. ब्राम्हणांना धर्मामुळे प्राप्त झालेले पावित्र्यावरुनच हे एक प्रकारचे संरक्षण कवचच होते. ते भेदले की, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इतकेच नव्हे तर आर्थिक क्षेत्रात प्रवेश करणे शुद्रातिशुद्रांना शक्य होईल, या हेतूने त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या माध्यमांतून शूद्रातिशूद्रांची संवाद साधीत त्यांची अस्मिता जागरूक केली. म. फुल्यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून बुध्दांनी मुहुर्त मेढ रोवलेली सामाजिक अभिसरणांची परंपरां जतन करण्याचे महान कार्य केले.

म. गौतम बुध्दांनंतर सामाजिक अभिसरणांच्या प्रयोगात अनेकांनी आपले योगदान दिलेले आहे. त्यात कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांनी ही परंपरा मोठया कोशिशिने जीवंत ठेवण्याचे काम केले आहे. राजर्षी शाहू महाराज यांनी तर सामाजिक अभियांत्रिकीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागच नव्हे तर; सर्वशक्ती पणाला लावून ही प्रक्रियातेवत ठेवली.[1]

फुल्यांची सत्यशोधक समाजाची चळवळ क्षीण होऊ लागली होती. नेता राजर्षी शाहूंनी संजीवनी दिली. दिं. 31 डिसेंबर 1919 ते जानेवारी 1920 अशी दोन दिवसीय सत्यशोधक समाजाची 9 वी परिषद क-हाड या ठिकाणी दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचे अध्यक्षे खाली घेण्याचे निश्चित झाले. ही परिषद भरविण्यास तत्कालीन कर्मठांनी खूप मोठा विरोध केला. त्यांचे नेतृत्व क-हाडच्या अळतेकरांनी केली. क-हाडच्या उच्चवर्णीय मामले दाराने 144 कलम जारी करून सभेच्या मनाई केली होती. शेवटी सत्यशोधक समाजाने अधिका-यांची परवानगी घेऊन अधिवेशन पारपडले यासाठी कोल्हापूरचे छत्रपती शाहुंनी फार महत्वाचे सहकार्य मिळाले.. या परिषदेत शांहुनी मुंकुंदराव पाटील यांचा यथोचित गौरव करुन त्यांना वस्त्राअविष्कार व मानाचा फेटा बांधून सत्यशोधक चळवळीला उत्तेजन दिले.[2]

छत्रपती शाहु महाराजाच्या आयुष्याला कलाटणी देणारी घटना म्हणजे वेदोक्त प्रकरण. वेदोक्त प्रकरणातील अनुभवावरुन भिक्षुक शाहीच्या जाळयातून मुक्त झाल्या शिवाय उच्चवर्णी यांची धार्मिक व सामाजिक मक्तेदारी नष्ट होणार नाही. अशी शाहू महाराजांची धारणा होती. परिणामी ते महत्मा ज्योतीराव फुलेंच्या सत्यशोधक विचाार सरणीकडे आकृष्ट झाले. राजर्षी शाहुंच्या प्रोत्साहनामुळे महराष्ट्रात सत्यशोधक चळवळीचे पुनरुज्जीवन झाले.

पारंपरिक प्रतिगाम्याच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी शांहुनी अनेक उपक्रम हाती घेतले. 1902 साली ब्राम्हणेतरांना 50 टक्के आरक्षण देण्याचा कायदा, कोल्हापूरात ब्राम्हणेतर पुरोहितांची निर्मिती करण्यासाठी श्री. शिवाजी वैदिक स्कूलची स्थापना, मराठयांसाठी स्वतंत्र क्षात्र जगतगुरु पद निर्माण करुन सदाशिवराव पाटील या उच्चविद्या विभूशितास त्यापदावर नेमले. शिक्षणा शिवाय तरणोपाय नाही म्हणून कोल्हापूर संस्थांनात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. प्रत्येक खेडयात शाळा सुरु केली. अस्पृश्यता कायदयाने प्रतिबंधित केली, गुन्हेगार मानल्या गेलेल्या

जातींची हजेरी पध्दतीतून मुक्तता केली. भटक्या जातींना जवळ करुन त्यांचे जीवन स्थिर केले. 1918 मध्ये ग्रामीण भागातील बलुतेदारीतून मूक्त करुन त्यांना समाजातील सर्व उघोगधंदे खुले केले. 1920 साली जोगिणी–देवदासी प्रथा कायदयाने बंद केली. त्यावेळी सामाजिक सुधारणेच्या चळवळीत इतर बरेच सुधारक सहभागी होते. मात्र कार्यपध्दताच्या बाबतीत त्यांच्यात मत भिन्नता दिसून येते. या मत भिन्नतेचा वैचारिक आधार कोणता होता. हे येथे जाणून घेणे आवश्यक आहे.

सामाजिक सुधारणांची विशाल स्वप्न दृष्टी असणारे कृतिशील सुधारक महर्षी विट्ठलरामजी शिंदे. भारतीय समाजातील अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा सखोल व शास्त्रीय अभ्यास करणारे ते भारतातील आद्य व श्रेष्ठ संशोधक होते. न्या. रानडे, भांडारकरांच्या प्रार्थना समाजाच्या विचारांशी हे जरा अंतर ठेवून होते. 1903 ते 1910 पर्यंत महर्षि शिंदे यांच्या कामाच्या धडाक्याने प्रार्थना समाजाचा मुंबई–पुण्या बाहेर मोठा विस्तार झाला. लोक सहभाग वाढला. समावेशकता वाढली तरी, अस्पृश्यता निवारणाचे काम प्रार्थना समाजाने अंगावर घ्यावे. यासाठी शिंदे यांच्या आग्रहामुळे त्यांच्यात मतभेद झाले.

अस्पृश्यांच्या प्रश्नांवर काम करण्याच्या त्यांच्या ध्येयासाठी मातृ संस्था सोडण्याची मोठी किंमत त्यांना चुकवावी लागली. 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना करुन पर्याय निर्माण केला. मिशनच्या कामासाठी स्वतः शिंदे, त्यांचे आई–वडील व बहीण जनाक्का अस्पृश्य वस्तीत जाऊन राहिले. जनाक्का पनवेलला एका शाळेत मुख्याध्यापिका होत्या. त्या आपली नोकरी सोडून मिशनच्या कामासाठी मुंबईत आल्या.

मिशनच्या माध्यमातून शिंदेनी मोफत शाळा, वाचनालय, धर्मार्थ दवाखाना, ग्रंथालय, महिलांसाठी शिक्षण वर्ग, धर्मशिक्षण व नीतिशिक्षण देण्याचा, रविवारच्या शाळा, आजा-यांची शुश्रुशा, बाळंतपणात मदत, व्यवसायिक शिक्षण असे अनेक अभिनव उपक्रम त्याकाळात सुरु केले. त्याकामी बडोधाचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचे सहकार्य घेतले. महर्शि शिंदे यांचे कार्यही समाजिक अभिसरणाच्या संदर्भात उल्लेखणीय स्वरुपाचे आहे.[3]

म. फुल्यांनी सत्यशोधक चळवळ पुढे नेत असताना राजाराम शास्त्री भागवतांनी जे की, लोकहितवादींचा परंपरेतील म्हणता येतील. त्यांनी फुले ज्यांना शुद्रातिशुद्र म्हणत त्यांच्या साठी राजाराम शास्त्रींनी 'ब्राम्हणेतर' या शब्दाची योजना केली. शाहुंच्या कालावधीत ब्राम्हण व ब्राम्हणेतर वाद दिसून येतो. महर्शि शिंदेनी प्रचलीत राजकीय परिभाषेत प्रमाणक परिवर्तन घडवून आणणारी बहुजनही संकल्पना मांडून ब्राम्हण–ब्राम्हाणेतर वादाला त्यांनी सर्जनशील पर्याय दिला.

1918 साली जेव्हा भारतात साऊथ ब्युरो कमिशन आले. तेव्हा राजर्षि छत्रपती शाहुंनी भास्कराव जाधवांना प्रतिनिधित्वाची (मराठा) मागणी करावयास सांगितली. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात पर्याप्त प्रतिनिधित्व मिळावे. अशी कमिशन पुढे मागणी केली.[4]

डिप्रेस्ड क्लासच्या वतीने महर्शि वि. रा. शिंदे यांनी अस्पृश्यांचे प्रतिनिधी हे कायदे मंडळाने निवडावे अशी भूमिका घेतली होती. त्यावेळी डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, वरिष्ठ हिंदू हे अस्पृश्यांवर राष्ट्रीय गुलामगिरी लादू पाहत आहेत. पण अस्पृष्य लोक त्यांचे प्रयत्न हाणून पाडतील. या संदर्भात टाईम्स ऑफ इंडियाच्या 16 जानेवारी 1919 च्या अंकात महार हे टोपण नाव वापरुन डॉ. आंबेडकर यांनी 'अ महार ऑन होमरुल' हे पत्र लिहुन"स्वातंत्र्य मिळविणे हा टिळकांचाच नव्हे, तर महारांचा देखील जन्म सिध्द हक्क आहे." असे स्पष्ट केले होते. हा जातिसंस्थेने अस्पृश्य ठरविलेल्या समाजाचा हा स्वाभिमानाचा हुंकार होता.[5]

27 जानेवारी 1919 रोजी डॉ. आंबेडकरांनी साऊथ ब्युरो कमिशन ला साक्ष दिली. सर्व भारतीयांना मानवाधिकार मिळाला पाहिजे. अशी ऐतिहासिक मागणी केली. या क्रांतीकारक मागणीला

वर्तमानपत्रांनी प्रसिध्दी दिली नाही. आपले स्वतःचे वर्तमापनत्र असावे म्हणून 31 जाने 1920 रोजी त्यांनी 'मूकनायक' वर्तमानपत्र सुरु केले. त्यास राजर्षि शांहूनी आर्थिक पाठबळ दिले.

महर्शि शिंदे अस्पृश्यतेच्या प्रश्नांवर शास्त्रीय निकषांचा अभ्यास करणारे संशोधक म्हणून ओळखले जात. अस्पृश्यतेचा प्रश्न कसा सोडवायचा याबाबत महर्षि शिंदे व डॉ. आंबेडकर या दोघांच्या दृष्टीकोनात मूलभूत फरक होता. शिंदे हे न्या. रानडे, भांडारकर यांच्या विचाार विश्वातले उत्क्रांतीवादी होते. डॉ. आंबेडकरांनी धार्मिक–सामाजिक क्रांती शिवाय हा प्रश्न सुटणार नाही. असे ढामपणे वाटत होते. शेवटी डिप्रेस्ड क्लासेस मिशन चा शिंदेना 1923 मध्ये त्याग करावा लागला.

प्रबोधनाच्या काळात न्या. रानडे, आगरकर, राजाराम शास्त्री भागवत या प्रभुतींनी सामाजिक सुधारणेच्या संदर्भात महत्वाचे कार्य केलेले आहे. यात दुमत नाही.

माणगाव परिशदेतील महत्वाचे ठरावः

माणगाव दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद स्वागताध्यक्ष दादासाहेब इनामदार, अध्यक्षस्थानी आंबेडकरांची निवड करण्यात आली. भीमराव भारताचे नेते होतील. असे भाकित या परिषदेत शाहुंनी केले होते. याच परिषदेत आंबेडकरांना पंडित ही पदवी देण्यात आली. या परिषदेत अस्पृश्यांसाठी राजकीय प्रतिनिधित्वाची मागणी करण्यात आली. स्वतंत्र मतदार संघ मिळाले पाहिजेत. हीच मागणी त्यांनी पुढे 13 वर्ष लावून धरली. छत्रपती शाहूंचा वाढदिवस सणा प्रमाणे साजरा करण्याचा निर्णय परिषदेत घेण्यात आला. धार्मिक कार्य करण्याचा अधिकार त्या–त्या जातीतील सुशिक्षितांना मिळावा हा ठराव करण्यात आला. म. फुले 1880 मध्ये सार्वजनिक शिवजयंती उत्सव सुरु केला होता. ठीक 40 वर्षांनी 1920 मध्ये बाबासाहेबांनी शाहू जयंती साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

गुणवत्ताही संधी मिळाल्यावर अवलंबून असते. ती जन्मजात मिळत नाही. संधी मिळाल्यावर ती अवलंबून असते. अस्पृश्यांना व ब्राम्हणेतरांना कायम संधी नाकारुन उच्चवर्णीयांनी आपली तथाकथित गुणवत्ता संपादन केली आहे. असे खडेबोल माणगाव परिषदेत डॉ. आंबेडकरांनी दिली. ज्यांना पिढयांनपिढया संधी नाकारली गेली. त्यांना विशेष संधी, हे तत्वज्ञान महाराजांनी संस्थांनात 1902 रोजी स्वीकारले.

योग्य नेता असेल तर समाजाची प्रगती होते. असे मत शाहूनी मांडले. माणगाव परिषदेत अस्पृश्य व ब्राम्हणेतर यांच्या सहकार्यांच्या वाटचालीला सुरुवात झाली. ही एका नव्या राजकीय प्रवासाची सुरुवात होती. ही एका अभिनव सामाजिक अभियांत्रिकीच्या राजकारणाची पायाभरणी होती. ती काळात टिकली असती तर ..... जातीवादाचा पराभव अटळ होता.[6]

संदर्भ

1. डॉ. सदानंद मोरे, यशवंतरावांच्या बहुजनवादाची वैचारिक जडणघडण, डॉ. कुंभार नागोराव, विचारशलाका, ऑक्टो 2012 ते जुलै 2013 यशवंतराव चव्हण विचार विश्व विषेशांक,
2. माधवराव पाटील संपा, सत्यवेध, प्रकाशक, दीनमित्रकार मुंकुंदराव पाटील स्मारक समिती, अहमदनगर पृ. क्रं. 10
3. दै. लोकसत्ता, लोकरंग, रविवार, दि. 15 मार्च, 2020, पृ.क्रं.4, सदाडुम्बरे,महर्षिशिंदे यांच्यावैचारिक योगदानाची मांडणी
4. https:m.facebook.com.South buro commission
5. दै. लोकसत्ता, रविवार, दिं. 15 मार्च 2020, माणगावपरिषद, प्रा. विजय मोहिते, पृ. क्रं. 6
6. दै. पुढारी, प्रा. हरीनरके, संपादकीय पृष्ठ, शनिवार, दिं. 21 मार्च 2020

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या प्रेरणादायी विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास

डॉ. संभाजी संतोष पाटील

राज्यशास्त्र विभाज, श्री.शि.वि.प्र.संस्थेचे भाऊसाहेब -ना.स.पाटील साहित्य आजि मु.फि.मु.अ.वाजिज्य महाविद्यालय, धुळे (महाराष्ट्र)

प्रस्तावना -

स्वामी दयानंद सरस्वतींच्या विचारांपासून भारतीय राजकीय विचारांचा प्रबोधनाचे नवे युग सुरु झाले. त्यांच्या विचारातुन खऱ्या अर्थाने भारतीय राजकीय विचारांच्या उदारमतवादी धोरणाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. भारतीयांना जौरवशाली, विज्ञानाचा वारसा सांगुन त्यांना जागृत करण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी स्विकारलेल्या प्रबोधनाचा मार्ज इतर प्रबोध-नज्ञारापेजा पुर्जतः भिन्न होता. त्यांच्या प्रबोध-नामध्ये राष्ट्रीयत्वाची महा-न भाव-ना होती, विवेज्ञ होता आजि त्यांचा आधारवेद होता. स्वामी दया-नंद सरस्वती हे वेदाचे जाढे अभ्यासज्ञ होते. त्यांच्या व्यक्तीमत्वाचे वैशिष्टये म्हजजे त्यां-नी भारतीय वैचारिक परंपरेचे प्रामुख्याने वेदाचे दाखले देत. मूर्तीपुजा,जातीव्यवस्था, अस्पृश्यता यांना विरोध केला. भारतीय धार्मिक राजकीय वसाहतवादाला विरोध करण्यासाठी त्यांनी भारतीय विज्ञानाचा आधार घेतलेला दिसून येतो. त्यांनी आर्यसमाजाची स्थापना केली. भारतामध्ये त्यांना नविन सामाजिक व्यवस्था परंपरागत सामाजिक, धार्मिक कर्मकांडा पासुन सुरु असेल. राजकीय वसाहत वादापासुन मुक्त असेल पण या मुक्ततेचा पाया आधार मात्र भारतीय तत्वज्ञान असेल. वेदातील विचारां-नी, तत्वज्ञा-ना-ने त्यां-ना प्रभावित ज्ञे ले होते. वेदाभ्यासा-नेच त्यांच्यात सामाजिज्ञ सुधारजा, राष्ट्रभक्ती व स्वातंत्र्याच्या ज्ञल्प-ना आल्या होत्या. त्यांचा विचारांचा स्त्रोत, वेद होता. दया-नंद योजी होते. समाजसुधारज्ञ होते. राष्ट्रभक्त होते. तत्वज्ञ होते. वर्तमान भारतीय समाजिक, राजकीय स्थिती लक्षात घेता त्यांच्या विचारांची प्रफुलता तीव्रतेने जाणवते. भारतीय सामाजिक, राजकीय प्रश्नांवर उत्तर भारतीय तत्वज्ञान व परंपरेचे उत्तरे शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आर्य समाजाच्या व्यासपिठावरुन त्यांनी हिंदुच्या प्रबोधनाचे कार्य केले. जग हे अंधश्रध्दा व अज्ञान यांनी व्यापले आहे. त्यांच्या जुलामजीरीतु-न जजाची सुटज्ञा ज्ञ रज्याचे ज्ञार्य माझ्यावर सोपवले आहे असे ते म्हजत. स-नात-नी हिंदूच्या प्रलोभ-नां-ना त्यां-नी थारा दिला -नाही. ख्रिश्चन मिश-नऱ्यांची अ-निष्ट तत्वे त्यां-नी उघड ज्ञे लीत. त्यांचे ज्ञार्य दुहेरी स्वरुपाचे होते. एज्ञा बाजुला अज्ञ ाान, अंधश्रध्दा, कर्मकांड यांच्या विरोधात क्रांती करणे, तर दुसऱ्या बाजुला वेदाचा प्रसार करुन वेदांवरील निष्ठा व श्रेष्ठत्व याविषयी लोकांमध्ये जाणिव वाढविणे आणि सर्वोच्च सत्ता जाणून घेण्यासाठी व्यक्ती स्वातंत्र्याला पुरस्कार करणे त्यांच्या या ज्ञार्यामुळे आणि आर्यसमाजाच्या उपक्रमामुळे समाजामध्ये नवचैतन्य उभारणे त्यांचा परिणाम लोक आपल्या स्वातंत्र्याबाबत सतर्ज्ञ झाले. १८७५ च्या वंजभंज चळवळीचा यातु-न पाया घातला जेला. भारतीय राष्ट्रवादाला स्वामी दया-नंद सरस्वती यां-नी मोलाची भर घातली त्यांचे कार्य फार मोलाचे व उपयुक्त आहे.

संशोधनाचा उद्देश :-

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या प्रेरणादायी विचारांचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा उद्देश आहे.

संशोध-नाची उद्दीष्टे :-

(१)स्वामी दयानंद सरस्वती यांच्या विचारांची माहिती अभ्यासणे.

(२)स्वामी दयानंद सरस्वती यांचे लोकशाही विषयी विचारांची माहीती जाणुन घेणे.

(३)स्वामी दयानंद सरस्वती यांचे राजकीय विषयी विचारांची माहिती जाणून घेणे.

(४)स्वामी दयानंद सरस्वती यांचे सामाजिक व शैक्षणिक विषयी विचारांची माहिती जाणुन घेणे.

विषयाचे महत्व :-

स्वामी दयानंद सरस्वती हे एक थोर विचारवंत व मार्गदर्शक होते. आचार व विचारात संमती असणारे विचारवंत होते असे म्हटले जाते. त्यांचा प्रत्यज ृ तीवर व ज ार्यावर भर होता ते समाजापुढील आदर्श होते. भारतीयां-ना त्यांच्या जौरवशाली, संपन्न ज्ञा-नविज्ञानाचा वारसा साधुन त्यांना जागृत करणारा विचारवंत म्हणून स्वामी दयानंद सरस्वती यांना गौरविले जाते. त्यांच्या प्रबोध-नात राष्ट्रीयता होती, भारतीय धार्मिज राजज ीय वसाहतवादास विरोध ज रज्यासाठी त्यां-नी भारतीय तत्वज्ञा-नाचा आधार घेतला. भारतीय प्रबोधनाच्या कार्याला जीवन आणि शक्ती स्वामी दयानंद सरस्वती यांनी मिळवून दिली. हे जग अज्ञान आणि अंधविश्वासाच्या शृखलांनी जखडलेले आहे. त्यातुनच जगाला मुक्त करण्यासाठीच माझा जन्म आहे असे ते म्हणत. वैदीक आदर्शवादाने ते प्रभावीत झाले होते आणि या आदर्शवादाने प्रेरीत होऊन त्यांनी आपल्या आयुष्याची चाळीस वर्ष त्यासाठी खर्च केल्याचे दिसून येते. स्वामी दयानंद सरस्वती रहस्यवादी श्रेष्ठ समाजसेवक आणि निर्भिड विचारवंत होते. वेदाच्या तत्वज्ञा-नावर आधारीत राष्ट्र व समाजाची नि-र्मिती हे त्यांचे ध्येय होते.

(१)**राजकीय विचार :-** स्वामी दयानंद सरस्वती हे राजकीय विचारवंत नव्हते. राजकीय सिध्दांतावर त्यांनी ग्रंथ लिहीला नाही. सज्रीय राजज ारजात त्यां-नी भाज घेतला -नव्हता. आदर्श वादा-ने त्यां-ना झपाटलेले होते. आपली वेजवजेळी भाषजे आजि त्यां-नी जे लेले लिजाज यातु-न त्यांचे राजज ीय विचार स्पष्ट झाले आहे. भारतीय राष्ट्रवादाच्या वाढीत त्यां-नी फार मोठे योजदा-न दिले आहे. आपज स-यासी आहोत. आर्य समाज ही धार्मिज व सामाजिज संघट-ना आहे. राजज ीय उध्दांष्टां-नी ती ज ार्य ज रीत -नाही असे स्पष्टीज रज त्यां-नी जे ले होते. आरंभी ब्रिटीश अधिज ाऱ्यां-ना स्वामी दया-नंद सरस्वती व त्यांची संघट-ना ही जुप्तरिती-ने राष्ट्रीय आंदोल-नात भाज घेते आजि ज टज ारस्था-ने ज रते असा संशय होता. मात्र त्यांचे ज ार्य हे धर्म सुधारजेचे व समाजसुधारजेचे आहे. या नि-र्ष्ज षात ते आले अर्थात ते सज्रीय राजज ारजात -नसले तरी त्यांचे देशावर प्रेम होते. ते उत्ज ृष्ट देशभक्त होते. भारताचे वर्णन ते आर्यवर्त असे करीत होते. ते केवळ वक्ते नव्हते तर आपले विचार व शिकवण यांचे आग्रही प्रचारज होते. त्यासाठी संघट-न बांधजी त्यां-नी जे ली. युवज ां-ना त्यांचे आज र्षज होते. त्यांच्या सार्वजनि-ज ज ार्याविषयज पुढाज ारातु-न राष्ट्रीय चळवळीत चैत-य नि-र्माज झाले. तिला दिशा प्राप्त झाली. ते समाजचिंतज होते. त्यातु-न त्यां-नी व्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्तीचे अधिकार यांची चर्चा केली. आर्य समाजाच्या रचनेच्या अनुषंगाने त्यांनी लोकशाही शास-न व्यवस्थेवर प्रज ाश टाज ला. प्राची-न आदर्श शास-नाची संज ल्प-ना विषद जे ली. ग्रामस्वराज्य, ग्रामीज शास-न यावर विचार मांडले. या त्यांच्या मांडजीतु-न त्यांच्या राष्ट्रवादातु-न स्वराज्य, लोज शाही शास-न व्यवस्था, स्वातंत्र्य, ज ायद्याचे जेष्ठत्व, विजें द्रीज रज अशा ज ाही संज ल्प-नांचा वेध घेता येतो. याशिवाय अहींसा, ज ायदेभंज यासारज्या तंत्राबाबतही त्यां-नी स्पष्टीज रज जे ले. भारतीय राजज ीय विचारवंत जे सार्वजनि-ज जीव-नात जी भूमिज ा बजावितात वेळोवेळी त्यांच्या ज ाळातील समस्यांवर प्रज ाश टाज तात. यासाठी जी सैध्दांतिक अपक्रम मांडतात यातुन त्यांच्या राजकीय चिंतनाचे दर्शन घडते. स्वामी दयानंद सरस्वती हया विचारवंतांच्या शृजंलेतील एज आर्धुनि-ज भारतीय, राजज ीय विचारवंत होते. भारतीय राष्ट्रवादाला त्यां-नी वैदिज तत्वज्ञा-न उपलब्ध ज रु-न दिले. वैदीज धर्म राष्ट्राचा आधार असे जेव्हा स्वामी दया-नंद सरस्वती म्हजतात तेव्हा त्यां-ना भेदभाव विरहीत न्याय व समानता बिंबविणारा विचार, ऊच्चार आणि कृती यातील सत्याची शिकवण देणारा धर्म अभिप्रेत आहे असा धर्म देवाची इच्छा असून वेदांचे मुर्त स्वरुप आहे असे ते म्हणतात त्यासाठी व्यक्तीचे नैतिक शुध्दीकरण आणि समाजाची पुर्नरचना यावर त्यांचा भर आहे. वैदीक प्रबोधनासाठी भारतीयांच्या नैतिक आणि सामाजिक उध्दाराचा कार्यक्रम स्वामी दया-नंद सरस्वती यां-नी हाती घेतला होता. नि-र्भयता या घटज ाला दया-नंदांच्या राष्ट्रवादात महत्वाचे स्था-न होते. जुलमी साम्राज्यशाहीच्या छळवजूज ी विरोधात नि-र्भयता हा राजज ीय शक्ती घटज तोंड देवू शज तो. असा त्यांचा विचार होता. त्यासाठी त्यां-नी विरपुरुष शब्दप्रयोग वापरला. निर्भय मनुष्य सत्याची व न्यायाची सिध्दता करु शकतो. त्यांच्या विरपुरुष संकल्पनेत राजकीय अनिष्ठ व जुलमाशी मुकाबला करण्याचा प्रत्यक्षपणे दिलेला संदेश होता. सेमेरिक संस्कृती आणि सभ्यता यांच्या आव्हाहनाला वैदीक

पु-नरुज्जीव-नच तोंड देवू शज ते असा त्यांचा आत्मविश्वास होता. त्यां-नी अशा पु-नरुजीव-नातु-न राष्ट्रीय स्वातंत्र्याला पाठींबा दिला. वैदीज आर्य संस्ज्ृ ती मुळ स्वरुपात प्रस्थापीत व्हावी असे त्यां-ना वाटत होते. त्यां-ना देशाबद्दल जूप प्रेम वाटत होते. भारताला ते आर्यवणे संबोधित. पारसमणी म्हणून गौरव करीत. सुवर्ण भूमी मानत. अखंड स्वतंत्र, स्वाधीन, निर्भय स्वरुपात भारत देश नसल्याचे त्यांनी दु:ख व्यक्त केले होते. भारताच्या गुलामगिरी स्थीतीवर त्यांनी शोक व्यक्त करुन भारताच्या स्वातंत्र्यासाठी देवाकडे त्यांनी साकडे घातले होते.प्रार्थना समाज व ब्राम्हो समाजाच्या दुर्बल देशभक्तीवर त्यांनी दु:ख व्यक्त जे ले होते.

(२)**लोकशाही विषयी विचार** :- स्वामी दयानंद सरस्वतींनी जरी प्राचीन भारतीय विचारांचे पुनरुज्जीवन व्हावे असा आग्रह धरला असला तरीही एकाधिकारशाहीच्या विरोधात होते. त्यांनी लोकशाही तत्वांचा अंगीकार केला होता. त्यांच्या जातीव्यवस्थेस असणारा विरोध अस्पृश्यतेच्या विरोधात अभियान, स्त्रियांना समाजामध्ये योग्य स्थान मिळावे म्हणून मांडलेली मते त्यासाठी केलेली चळवळ समाजहीतासाठी शासनाने काम ज रावे यासाठी मांडलेली मते दाखवितात की, समाजात बंधुभाव, स्त्री-पुरुष समानता न्याय ही मुल्ये त्यांचा आदर्श होती. त्यांच्या मते वैदीक काळात लोकशाही होती ते कायद्याच्या राज्याच्या कल्पनेने समर्पक होते. व्यक्ती नव्हे तर कायद्यावे श्रेष्ठत्व त्यांना हवे होते. व्यक्ती श्रेष्ठत्वाच्या ते विरोधात होते. कायद्यासमोर सर्व समान असावेत, कायद्याची अंमलबजावणी व्यक्तीनिरपेक्ष व्हावी. मोठया अधिका-यांनी कायद्याचा भंग जे ल्यास त्यांना शिक्षा दिली पाहीजे. राजा हा कायद्यापेक्षा श्रेष्ठ असता कामा नये तर कायदा हा राजापेक्षा श्रेष्ठ असावा. जनता व सत्ताधीश यांच्यात परस्पर आदर असावा. परस्परांनी जबाबदारी ओळखावी. शासकांनी जनतेस पुजेप्रमाणे तर जनतेने शासनास पित्यासमान वागणूक दिली पाहीजे. कामगार श्रमीक व शेतकरी राजाचे राजा आहेत हाच भाव सतत सत्ताधिशांचा जनतेविषयी असावा. जबाबदार शासनाची ते आवश्यकता प्रतिपादन करतात. लोकशाहीच्या प्रक्रियेद्वारे सत्तेवर यावेत. समाजातील बुध्दीवंतांना समाजाने विधीमंडळामध्ये पाठवावे. चारित्र्यसंपन्न व्यक्तीनाच प्रतिनिधी म्हणून निर्वाचीत करावे. अध्यक्षपद हे मोठया व्यक्तीकडे सोपवावे. समाज हीतासाठी कायदे केले पाहीजेत.समाजाच्या बाबतीत सर्वांनी एकमताने निर्णय घ्यावेत. त्यांनी तीन मंडळांचा पुरस्कार केला आहे. त्यानुसार शासनाची तीन अंगे असावी. या तीन अंगाकडुन शासनाची कार्य केली जावीत. धर्मसभा, विद्यासभा आणि राज्यसभा या तिनही संस्थांचे सभासद लोकांनी निवडुन द्यावे असा विचार ते मांडतात. परंतु कोणाकडुन या सभासदांची निवड व्हावी ते गुणवत्तेचा मुद्दा उपस्थित करतात. त्यांनी दिलेल्या योजनेप्रमाणे धर्माचरणाला वाहून घेतलेल्या सर्वाधिक एकनिष्ठांमधुन धर्मसभेचे सभासद निवडून द्यावे. सर्वाधिक विव्दानांची निवड करावी. राज्यसभेच्या सभासदांसाठी प्रशंसनीय कार्य करणा-या निस्पृह चारित्र्यवान लोक निवडावेत. राज्यसभेतील सर्वात चांगला, उत्कृष्ठ गुणांचा यशस्वी सभासद हा राज्यसभेचा प्रमुख असतो. या तिन्ही सभांनी एकजिन्सी स्वरुपाचे कार्य करावे. त्यांच्यात सुसंवाद असावा. चांगल्या कायद्याची निर्मीती करावी. सर्वानीच कायद्याचे पालन करावे. विशेषत: सर्वसाधारण कल्याणाच्या कायद्यांना प्राधान्य देण्यात यावे. व्यक्तीहीत बाजुला ठेऊन या कायदयातील लोकांनी आदर केला पाहीजे. त्यांच्या अधीन रहावे. व्यक्तीगत कल्याण, हित याबाबत व्यक्तींना मोकळीक असावी. स्वामी दया-नंद सरस्वती हे लोज शाहीचा सिध्दांत स्विज रतात. तसेच प्रत्यज व्यवहारात लोज शाही अवतीर्ज व्हावी म्हजू-न संरच-नात्मज चौज ट ही पुरवितात. विशेष म्हणजे त्यासाठी निर्वाचनाचे तत्व लागू करतात. वेदांमध्ये निर्वाचीत सभा आणि राजा यांचे सदंर्भ सापडतात त्याचा आधार त्यांनी घेतला. त्यांचा आर्य समाज खालून ते वरपर्यंत लोकशाही रचनेचा होता.

(३) **सामाजिक विचार**:- स्वामी दयानंद सरस्वती यांचे सामाजिक विचार हे त्यांच्या धर्मविषयक विचारातुन व पाश्चिमात्यकरणाच्या विरोधातुन पुढे आलेले आहेत. त्यांनी वेद काळातील आदर्श अशा प्रकारची समाजरचना निर्माज करावयाची होती. म्हणून त्यांनी हिंदू धर्मामध्ये असलेल्या जुन्या रुढी प्रथा या विरोधी आवाज उठविला. वेदांकडे दुर्लक्ष जे ल्यामुळे भारतीय समाजात विघट-न आजि वाद होऊ लाज्ले. मुर्तीपुजा, बालविवाह, अस्पश्यता, समाजातील स्त्रियांचे ज निष्ठ

स्थान, जातीव्यवस्थेवर असलेली ज्ञानार्जन घेण्याची बंधने इत्यादी अनिष्ठ प्रथांना वेदाची मुळीच मान्यता नाही. वर्णव्यवस्थेचा आधार जन्म हा नसुन गुण आहे. अशा प्रकारचे परिवर्तनवादी विचार त्यांनी प्रभावीपणे मांडले. त्यांना जातीव्यवस्था मान्य नव्हती. जाती प्रथा हा हिंदु समाजाला लागलेला तो एक कलंक आहे. हिंदु समाजास आलेली अवकळा जर आपणास मोडुन ज ाढावयाची असेल तर जातीव्यवस्थेचे जे अवडंबर समाजात आहे ते दुर केल्याशिवाय समाज सुधारण नाही याची जाणिव त्यांना होती. जातीव्यवस्थेने माणसामाणसात एक प्रकारची दरी निर्माण केली आहे.त्यामुळे आपला शैक्षणिक, सांस्कृतिक राष्ट्रीय विज ास जुंटला आहे. त्यामुळे त्यां-नी ंसर्वात जोरदार अस्पृश्यते विरोधात आंदोल-न जे ले. जाती व्यवस्थेमुळे हिंदु धर्मातील उच्च निच्च ते मुळे ज्यांनां खालचा दर्जा दिला जाई व त्यांना अपमानीत केले जाई ते सर्व लोक अपमान सहन ज रण्यापेक्षा आपण धर्मांतर करुन चांगले जीवन जगता येईल म्हणून हिंदू धर्माचा त्याग करुन इतर धर्माचा स्विकार करत होते. परिजामतः हिंदु धर्माचे फार मोठया प्रमाजात विघट-न होत होते. त्यामुळे या वर्जाला अ-य वर्जाच्या बरोबरीचे अधिज ार व वाजवुज देज्याची आवश्यज ता आहे. समाजीतल उच्च--नीच्च, स्पृश्य-अस्पृश्य, भेदभाव जर -नष्ट जे ले -नाहीत तर हिंदु समाज जास्त ज ाळ टिज जार -नाही असे दया-नंद सरस्वती यां-ना वाटत होते. मुर्तीपूजा आजि अंधश्रध्दा याला विरोध-मुर्तिपुजा ही समाज विघट-नास आजि जुलामजिरीस ज ारजीभूत आहे. जंजा स्ना-न, मुहूर्त पाहजे, पशुहत्या, -नरबळी अशी अ-नेज ज ारजे हिंदु समाजाच्या नाशाला कारणीभुत आहेत. त्यामुळे हिंदु समाजाचे अधःपतन झाले. त्याविरुध्द त्यांनी आंदोलन केले. हिंदु समाजाच्या ऐक्यासाठी आजि वाढीसाठी या सर्व अंधश्रध्दा -नष्ट ज रजे ही ज ाळाची जरज आहे म्हजू-न त्यां-नीं मुर्तीपूजा वअंधश्रध्दा यावर कठोर प्रहार केलेत. अस्पृश्यतेला त्यांनी कठोरपणे विरोध केला कारण अस्पृश्यतेस वैदीक धर्मात स्थान -नाही असे त्यांचे मत होते. हि अमा-नवीय प्रथा आहे. तेव्हा ती समाजाच्या ज ोजत्याच घटज ाला लाजू जे ली जाऊ -नये. अस्पृश्यतेचा संबंध स्वच्छतेशी असावा, जन्माशी नव्हे, घाणेरडी प्रवृत्ती, घाणेरडी रहाणी, अस्पृश्य असावी. स्वामी दया-नंद यांच्या काळात स्त्रियांची स्थिती अतिशय शोचनीय, दुय्यम स्वरुपाची होती. स्त्रियांना पडदा पध्दतीत रहावे लागत होते. बालविवाहाची पध्दती होती. बालविवाहांना पूर्ण आयुष्य वैधव्यात घालवावे लागत होते. त्यांना पुनर्विवाह करण्यास मज्जाव होता. त्यांनी व आर्य समाजाने स्त्रियांना शिक्षण घेण्याचा व वेदाचा अभ्यास करण्याचा अधिकार आहे. स्त्रियांना शिक्षणाच्या जेत्रात पुरुषाप्रमाणेच अधिकार असावेत तोच वेदाचा अर्थ होता. वेदकालीन समान अधिकारांचा दर्जा स्त्रियांना असावा या मताचे ते होते. स्त्री-पुरुषातील एज घटज -निरजर असेल तर घरात -नेहमीच जटजे उडतील. परस्परां-ना समजू-न घेज्यासाठी ते अपुरे असतील. घरात सुख व समाधान असणार नाही. महिलांनी अनिती, कुनिती, धर्मशास्त्रे, व्याकरण इत्यादी करण्याचे ज ौशल्य आत्मसात करावे. त्यांनी अनेक महिला महाविद्यालयाची स्थापना केली. बालविवाहास विरोध, विधवांचा पुर्नविवाहास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी आर्यसमाजाच्या माध्यमातुन अभियान चालविले.

(४)**शिक्षण विषयक विचार** :- दयानंद सरस्वती यांनी `सत्यार्थ प्रकाश` या पुस्तकामध्ये शिक्षणविषयक विचार मांडलेले आहेत. त्यांना शैक्षणिक प्रश्नात अधिक रस होता. शिक्षणाअभावी भारतीय लोकांचा विकास होणार नाही असा त्यांना विश्वास होता. त्यांच्या शिजजाबाबतचा दृष्टीज ो-न अधिज व्यापज होता. इंद्रिय साध-ना, बौध्दीज शक्तीचा विज ास आजि शारिरीज शिजज असा शिजजाचा अर्थ दया-नंद सरस्वती यां-ना अभिप्रेत होता. ब्रम्हचर्य हा शिजजाचा महत्वाचा घटज बनविण्यात यावा. शिक्षणाचे कार्य चारित्र्यवान, विद्ववानाकडेच सोपविले जावे. ५ ते ८ वर्षांच्या मुलामुलींसाठी शिक्षण सक्तीचे असले पाहीजे तसेच राज्य आणि समाजाने जनतेला अशी सक्ती केली पाहीजे की, त्यांनी आपली मूले पाचव्या किंवा आठव्या वर्षानंतर शाळेत पाठविली पाहीजेत. यानंतर जर मुलामूलींना शाळेत न पाठविले तर तो दंडपात्र गुन्हा समजण्यात यावा. सेवा-निवृत्त व्यक्तीं-नी समाजात शिजज प्रसाराचे ज ार्य ज रावे असे दया-नंद सरस्वती यां-ना वाटत होते. सर्व सुधारजां-ना मुळ शिक्षणातच असल्याने शिक्षणाचा हट्ट धरला होता. आई-वडील हे मुलांचे आद्य गुरु त्यांच्या शिक्षणाने मुलांचे जेवढे कल्याण होते तेवढे कुणीच करु शकत नाही. समाजात विद्यार्थी व विद्यार्थीनिंसाठी वेगवेगळया शाळा काढण्यात याव्यात.

तसेच यातील अभ्यासक्रमासाठी गरजेनुसार बदल करण्यात यावा.स्त्री शिक्षणाला त्यांनी कोणताच विरोध केला नाही. गुरुकूलाची स्थापना केली पाहीजे अशी शिफारस त्यांनी केली. जेथे ब्रम्हचारी तरुण गुरुंच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्जन करु शकले या गुरुकुलातील सर्व जाती आणि वर्णाच्या मुलांना क्षमतेनुसार प्रवेश देण्यात येऊन श्रीमंत व गरीब असा कोणताही भेदभाव ज रता ज ामा -नये. म्हजजेच संपूर्जत: राष्ट्रीय स्वरुप असलेल्या शिजज पध्दतीची शिफारस त्यां-नी जे ली. ज्याद्वारे समाजाप्रती कर्तव्याची जाणिव असणाऱ्या नागरिकांची निर्मिती होऊ शकेल. आपल्या शैक्षणिक विचारात दया-नंदा-नी इंग्रजीच्या शिक्षणालाही स्थान दिले होते. अभ्यासक्रमाच्या बाबतीत त्यांच्या मते भाषा विषय कला, विज्ञान व तंत्रज्ञानाचा समावेश असावा. मात्र नैतिक व धार्मिक प्रशिक्षणाद्वारे व्यक्तीमत्व विकासावर भर दिला जावा. ज्या व्यक्तीं-नी या विषयावर प्रभूत्व संपादन केलेले आहे जे चारित्र्यवान आहेत. सहृदयी आहेत. त्यांनाच शिक्षक म्हणून नियुक्त करण्यात यावे कारण शिक्षण घेतांनां ब्रम्हचारी असतात. विद्यार्थ्यांचे वय, संस्कारक्षम व संवेदनाक्षम असते. अशास्थितीत शिक्षक हा चारित्र्यसंपन्न व जुजवंत असजे आवश्यज आहे. शिजजविषयज दया-नंद सरस्वती यांचे विचार व प्लेटोच्या विचारात सारजेपजा दिसू-न येतो. मात्र प्लेटो फक्त श्रीमंतासाठीच शिजजाची संधी देतो. दया-नंद सरस्वती मात्र सर्वां-ना शिजज द्यावे असे विचार मांडतात.

मुल्यमाप-न :-स्वामी दयानंद सरस्वती यांनी विविध अंगांनी कामगिरी बजावली आहे. पुरोहीतशाहीवर प्रहार केलेत. अंधश्रध्दा व कालबाहय रुढी यांच्या विरोधात बंड पुकारले. थंडगोळयाप्रमाणे मरगळलेल्या समाजात नवचैतन्य आणले. त्यासाठी नविन मुल्य तसेच नैतिक शिक्षण, चारित्र्य घडण, शुध्दता, पावित्र्य यांचे धडे समाजास दिले. परिणामी समाजात नविन विश्वास, पुढाकार, नैतिक व सामाजिक जबाबदारीची जाणिव व आत्मविश्वास यांची प्रेरणा दिली. शितल, संपन्नता, स्वातंत्र्य व विपुलता ही वैशिष्टये धारज ज रजाऱ्या वेदांवर आधारीत स्वराज्य उभारजीसाठी लाजजाऱ्या सेंद्रीय आजि परस्परावलंबी सामाजिक ऐक्याची प्रक्रिया स्वामी दयानंद सरस्वती यांनी गतीमान केली. भारतीय सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्याचे प्रतिपादन ज रजारा पहिला भारतीय असे स्वामी दया-नंद सरस्वती बाबतीत म्हटले जाते. त्यां-नी पुर्ज स्वदेशाची ज ल्प-ना मांडली. त्यांचे विचार ृ ती, पध्दती पुर्जत: भारतीय पध्दतीची होती. ते राष्ट्रभक्तीचे प्रेरज होते. त्यां-नी राष्ट्रीय एज ात्मतेची प्रज्रि या सुरु जे ली. भारतीयांना स्वामीभान असावा असा त्यांचा गतलौकीक सांगून त्यांनी भारतीयांतील क्रमाने निर्माण होणारा न्युनगंड कमी जे ला. आत्मविश्वास वाढविला. भारतीय राष्ट्रीय चळवळ भारतीय असावी यासाठी आवश्यज ते तत्वज्ञा-न त्यां-नीच पुरविले. हिंदु धर्मातील अंधविश्वासाचे सत्यदर्शन त्यांनी घडवून दिले. हिंदु समाजातील दोषांवर प्रहार जे ला. अस्पृश्यता, मुर्तीपूजा, बालविवाह, जातीप्रथा आदिविरुध्द त्यांनी प्रखरतेने लढा दिला. स्वामी दयानंद सरस्वती यांना भारताच्या राजकीय विचारांच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे. कारण त्यांच्या कार्यानेच भारताच्या राजकीय आंदोलनाला शक्ती मिळवून देण्याचे कार्य जे ले.

संदर्भग्रंथ सुची

(१) डॉ.ढोबळे रमेश - आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.
(२) डॉ.कळंबे दिनकर एस - भारतीय राजकीय विचारवंत, कैलास पब्लीकेशन्स, औरंगाबाद.
(३) प्रा.ज ळज र्जी बी.वाय - भारतीय राजकीय विचारवंत प्रा.नाईकवाडे अशोक श्री.विद्या प्रकाशन, पुणे.
(४) प्रा.चोपडे किसन - भारतीय राजकीय विचार विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.
(५) प्रा.ज ळज र्जी बी.वाय - भारतीय राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातुर
(६) डॉ.पाटील वा.भा. - प्राचीन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत प्रशांत पब्लीकेशन्स, जळगांव
(७) डॉ.गोखले वि.म. - निवडक चरित्रे ज्योस्ना प्रकाशन, पुणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर नामदेव सोनवणे

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,मालेगाव-कॅम्प ,*(नाशिक).*

गोषवारा*:*

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, दलित व शोषितांचे उद्धारक, कायदेतज्ज्ञ, इतिहासतज्ज्ञ, राजनीतिज्ञ, शिक्षणतज्ज्ञ तसेच धर्म व समाजकारणाचे जाणकार म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर हे सर्वांना सुपरिचित आहेत. तसेच ते एक जगप्रसिध्द अर्थतज्ज्ञ आहेत म्हणूनच स्वतंत्र भारताचे आर्थिक धोरण ठरविताना धोरणकर्त्यांनी डॉ .आंबेडकरांच्या विचारांना अधिक प्राधान्य दिले. आजच्या वर्तमान काळातही बाबा साहेबांचे आर्थिक विचारहे प्रासंगिकवउपयुक्त असल्याचे निदर्शनास येते.

सूचक शब्द *:*डॉ बाबासाहेब आंबेडकर, भारतीय अर्थव्यवस्था, आर्थिक विचार.

प्रस्तावना *:*

भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि आधुनिक भारताचे जनक म्हणून ओळखले जातात. स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या आर्थिक नियोजनात डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचे प्रतिबिंब उमटलेले दिसून येते.त्यांच्या आर्थिक विचाराचे प्रारूप हे आर्थिक, सामाजिक, धार्मिक, भौतिक तंत्रज्ञान व मानवी मूल्यांचे मिश्रण आहे. त्यांनी आर्थिक विश्लेषण अनुभवावर व वैज्ञानिक मापदंडांवर आधारित केले.आपल्या आर्थिक तंत्रातरुपयाच्या प्रश्न, कृषी, उद्योग, व्यापार, श्रमविभागणी, मजूरी, श्रमिकांचे शोषण वकल्याण, भूमी सुधारणा, जल व ऊर्जा व्यवस्थापन, सार्वजनिकआयव्यय, महिला विकास व भागीदारी, करपद्धती यांसारख्या अनेकविध आर्थिक घटकांचा आपल्या अनेकविध ग्रंथांतून व भाषणातून परामर्श घेऊन विश्लेषण मांडलेले आहे. त्यांचे आर्थिक विचार हे एक शताब्दी पुढे असल्याने आजच्या वर्तमान स्थितीतही त्यांचीउपयुक्तता जाणवते.

शोधनिबंधाचे उद्दिष्टे *:*

- *.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची माहिती घेणे.*
- *. डॉ. आंबेडकरांच्याआर्थिक विचारांच्या उपयुक्ततेचा आढावा घेणे.*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रूपयांचा प्रश्न- उगम आणि निरसन,ईस्ट इंडिया कंपनी- प्रशासन आणि अर्थनीती,ब्रिटिशभारतातीलप्रांतिकवित्ताचीउत्क्रांती, संघराज्य विरुद्ध स्वातंत्र्य, पाकिस्तान *अथवा भारताची फाळणी, संस्थाने आणि अल्पसंख्याक, हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनीती, भारतातील जाती व्यवस्था ,तिची उत्पत्ती आणि विकास यासारखे अनेक ग्रंथ लिहून आपल्या विविधांगी विचारांची आर्थिक विचारांशी सांगड घातली .*

रुपयाच्या प्रश्न:

डॉ .आंबेडकरांनी डॉक्टर ऑफ सायन्स पदवीसाठी The problem of the rupee :Its origin and its solution हा प्रबंध लिहिला. ब्रिटिश शासकांनी भारतीय रुपयाच्या किमतीला पाउंड सोबत जोडून आपला महत्तम फायदा करून घेतला. देशाची संपत्ती ब्रिटिशांच्या खजिन्याच्या दिशेने जात राहिली त्यामुळे भारतीय जनतेचे नुकसान होऊन ब्रिटिश जनतेचा फायदा होत राहिला.यासाठी सुवर्णपरिमानपध्दती जबाबदार असल्याचे त्यांनी सांगितले.भारतीय चलन पध्दतीच्या उत्क्रांतीचे अध्ययन करून तत्कालीन सुवर्णपरिमान चलन पध्दतीचा त्याग करून अपरिवर्तनीय कागदी चलन पध्दतीचा पुरस्कार मर्यादित चलन निर्मितीसह सुचविला तसेच चलनाचे मूल्य आणि त्याची क्रयशक्ती या सर्व बाबी आंतरराष्ट्रीय अर्थकारणाशी कशा संबंधित आहेत याविषयी सखोल विचार मांडले .

***कृषीविषयक विचार** :*

पुरातन काळापासून शेती क्षेत्र हा देशाच्या आर्थिक विकासाचा मूलाधार असताना शेतीक्षेत्रापुढे लहान धारणक्षेत्र ,विखुरलेले धारणक्षेत्र,कोरडवाहू क्षेत्राचे प्रमाण,अल्प उत्पादकता यासारख्या समस्या आहेत. या समस्यांचे समाधान करण्यासाठी डॉ आंबेडकरांचे विचार उपयुक्त ठरतात.

वारसाहक्क हाजमिनीच्या विभाजनाचे मूळ कारण नसून शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचा अतिरिक्त भार हे मूळ कारण आहे. शेतकऱ्यांच्या राहणीमानाचा दर्जा निम्न्नअसतो म्हणून लोक लहान लहान तुकडे करण्याचे प्रयत्न करीत नसून त्यांना उपजीविकेचेदुसरे कोणतेही साधन उपलब्ध नसते. यावर जलद औद्योगिकीकरण घडवून आणण्याचा त्यांनी उपाय सुचवला. त्यामुळे शेतीवरील अवलंबित्व कमी होऊन तुकडीकरण व विभाजन कमी करता येईल.

विखुरलेल्या व लहान धारणक्षेत्राच्या समस्येवर उपाय म्हणून डॉ आंबेडकरांनी सहकारी शेतीचा एक उपाय सुचवला. सहकारी क्षेत्रामुळे धारणक्षेत्राचे प्रमाण कायम राहील .लहान - लहान धारणक्षेत्रएकत्र करूनधारणक्षेत्राचे प्रमाण वाढवण्यास मदत होईल.

देशात भूमिहीन लोकांचा प्रश्न मोठा असताना हा प्रश्न सोडविण्यासाठी कूळकायदा हा प्रमुख उपाय नसून पडित जमीन लागवडीखाली आणणे तसेच जमीनदारांचे उच्चाटन करून भूमिहिनांना जमिनीची वैयक्तिक मालकी प्रदान करणे ऐवजी सामुहिक शेती करण्यावर भर देण्यात यावा .

शेती हा शासकीय उद्योग असावा. शासनाने सर्व जमीन ताब्यात घेऊन ज्यांची जमीन असेल त्यांना नुकसानभरपाई देऊन नंतर जमिनीचे भाग करून ग्रामस्थांना विविध अटींच्या आधारावर कसण्यासाठी द्यावी.

खोती प्रदेशातील शेतकऱ्यांचीपिळवणूक थांबविण्यासाठी खोती पद्धतीचे समूळ उच्चाटन करावे. जमीन कसणाऱ्याना कुळवहिवाटीचे हक्क मिळावेत.

अलीकडील काळात करचुकवेगिरीसाठी सत्ताधारी ,उद्योजक, सनदी अधिकारी, पांढरपेशा वर्गातील लोक जमीन खरेदी करतात. त्यामुळेमूळशेतकरीनष्टहोण्याचीभीतीवाढीसलागलीआहे.यावर उपाय म्हणून सर्व शेतकर्यांकडून एकसारखा कर घेण्याऐवजी जमीन महसूल संहितेचे 107 वेकलम रद्द करून जमीन महसूल प्राप्तिकराच्या कक्षेत आणला पाहिजे असे विचारमांडले.

भारतात फार पूर्वीपासून शेती आणि शेतकरी यांच्या आर्थिक अवनतीस खासगी सावकारांचा कर्जपुरवठा कारणीभूत आहे.खाजगी सावकार शेतकर्यांची प्रचंड प्रमाणात पिळवणूक आणि फसवणूक करतात.त्यामुळे सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता करणे आवश्यक आहे त्यासाठीसंस्थात्मक वित्तपुरवठ्याचे आवश्यकता आहे. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रात बँकांची स्थापनाकरूनशेती विकास आणि शेतकर्यांचे उत्थान घडवून आणले पाहिजे.

उद्योगविषयक विचार

अठराव्या शतकातील औद्योगिक क्रांतीमुळे युरोपातील अनेक देशांमध्ये आर्थिक विकासाला गती मिळाली .अशाच पध्दतीने भारताचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी जलदऔद्योगिकीकरणाची नितांत आवश्यकता आहे असे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मत व्यक्त केले होते.शेती क्षेत्रावर अवलंबून असणारा अतिरिक्त भार कमी करून वाढणाऱ्या लोकसंख्येला रोजगार पुरवठा करणे आणि त्या माध्यमातून आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी औद्योगिकीकरणाची आवश्यकता आहे..औद्योगिकीकरण घडवून आणताना शासनाच्या पातळीवर सार्वजनिक क्षेत्रात मूलभूत उद्योग सुरू करणे त्यासाठी विविध महामंडळे निर्माण करणे. विमा उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करणे,आधुनिक तंत्राचा वापर करणे आवश्यक आहे. मात्र औद्योगिकीकरणातुन निर्माण होणारी आर्थिक विषमता, संपत्तीचे केंद्रीकरण आणि प्रादेशिक असमतोल निर्माण होऊ नये यासाठी शासनाने दक्षता घेण्याची आवश्यकता आहे.

आर्थिक अस्पृश्यतेविषयी विचार:

भारतीय समाजव्यवस्थेच्याआर्थिक मागासपणाचे व दुरावस्थेचे मूळ जातिव्यवस्थेत आहे.जातिव्यवस्थेतून निर्माण झालेली अर्थरचनेची हीन अवस्था ही अस्पृश्यतेमुळे निर्माण झालेली आहे .अस्पृश्यता ही केवळ धार्मिक रचनाच नसून गुलामगिरी पेक्षाही भयंकर आर्थिक रचना आहे. गुलामगिरीत गुलामाचीकिंमत कमी होऊ नये म्हणून मालक त्याला कपडेदेतो, खाऊपिऊघालतो. पण अस्पृश्यतेच्या रचनेत मालक कोणतीही जबाबदारी न स्वीकारता या समाजाची आर्थिक पिळवणूक करतो. म्हणून जोपर्यंत व्यावसायिक स्वरुपात परिवर्तन होणार नाही,तोपर्यंत खालच्या वर्गामध्ये आर्थिक उत्थान होऊच शकत नाही. सामाजिक स्तरावरील अस्पृश्यता ,जातीभेद यासारख्या समस्या महात्मा गांधींच्या सहानुभूतीपूर्वक नीतीने दूर होऊ शकणार नाही तर त्यासाठी आर्थिक स्तरावर मूलभूत संस्थागत परिवर्तन आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय विकासाची अर्थनीती काय असावी याचे विवेचन डॉ.आंबेडकरांनी स्टेट्स अँड माइनॉरिटीज या ग्रंथात केले. या ग्रंथात त्यांनी गरिबी हटाव, विषमता निर्मूलन आणि शोषणमुक्ती विषयी आपले विचार परखड स्वरुपात मांडलेले आहेत.डॉ आंबेडकरांच्या मते जोपर्यंत शोषणमुक्त समाजाची निर्मिती होत नाही तोपर्यंत आर्थिक अस्पृश्यता नष्ट करणे शक्य होणार नाही.

महिला विकासविषयक विचार:

डॉ. आंबेडकरांनी आर्थिक विकासामध्ये महिलांच्या योगदानाला अत्यंत महत्त्वपूर्ण मानले आहे.स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांवर आधारित नवीन समाजरचना निर्माण व्हावी आणि त्यात महिलांचा सहभाग असावाअसेत्यांचेविचारहोते.एकूण लोकसंख्येमध्ये अर्धा वाटा असणार्या महिलांना आर्थिक

स्वातंत्र्यापासून, आत्मनिर्भरतेच्या अधिकारापासून वंचित ठेवले तर राष्ट्राच्या आर्थिक विकासाला मर्यादा पडतील म्हणून स्त्रियांसाठी आर्थिक अधिकार ,आर्थिक संरक्षण व मजुरीसंबंधी कायद्यात तरतुदी करणे आवश्यक आहे.तसेच देशातील सक्षम, बुद्धिमान, कौशल्यपूर्ण मानव संपत्तीच्या निर्मितीत महिलांचे प्रामुख्याने मातांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.म्हणून महिलांना व्यावसायिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळणे वत्यांना सशक्त बनविणे आवश्यक आहे.

सार्वजनिक वित्त विषयक विचार :

डॉ. बाबासाहेबांनी दि इव्हॉलुशन ऑफ प्रोव्हीन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया, ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी या ग्रंथात सार्वजनिक वित्तविषयक विचार मांडलेले आहेत. 1792 ते 1858 या कालावधीत ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासन व वित्त रचनेत झालेले बदल भारतीयांसाठी कसे व किती अन्यायकारक होते. या कालखंडात भारतीय जनतेची कशी प्रचंड पिळवणूक करण्यात आली. तसेच ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त झाल्यानंतर कर्जाचा बोझा दरिद्री भारतावर टाकून कसा अन्याय केला. याबाबत डॉ आंबेडकरांनी आपले विचार मांडले. त्यांच्या मते ईस्ट इंडिया कंपनी अत्यंत कमी दरामध्ये इंग्लंडमध्ये कच्च्या मालाची आयात करत आणि इंग्लंडमधून तयार झालेल्या पक्क्या मालाची भारतामध्ये अधिक किमतीला विक्री करीत होते. त्यामुळे निर्यातीतून मिळणारे उत्पन्न कमी आणि आयातीवर होणारा खर्च अधिक अशा रीतीने तुटीचे सार्वजनिक वित्त कंपनी काळात सातत्यपूर्ण आढळून येते.

श्रमविभागणी विषयक विचार :

महात्मा गांधीनी श्रम विभागणीसाठी जाती व्यवस्थेचे अस्तित्व मान्य केले होते. परंतु डॉ. बाबासाहेबयांनी 'जातींचा उच्छेद' या ग्रंथातुनयावर कडाडून टीका केली. जाती व्यवस्थेमुळे केवळ श्रमाची विभागणी झाली नसूनश्रमिकांचीच विभागणी केली गेली हे निदर्शनास आणून दिले.जाती व्यवस्थेवरील हल्ला हा केवळ उच्चवर्णीयांच्या वर्चस्व वादाला दिलेले आव्हाननसून आर्थिक विचारांशी त्यांचा जवळचा संबंध त्यांनी जोडला. भारतात जाती व्यवस्थेमुळे श्रमाची आणि भांडवलाची गतिशीलता कमी झाली असून त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर विपरीत परिणाम झाला. यावर उपाय म्हणून त्यांनी श्रम विभागणी ही जाती व्यवस्थेवर आधारित नसावी तर ती शिक्षण, कौशल्य आणि कामाच्या अनुभवावर आधारित असावी असे सांगितले.

करप्रणाली विषय विचार:

ब्रिटिश काळातील कर आकारणीची पद्धत ही गरीब शोषित व अल्प भूधारकांसाठी अन्याय करणारी होती. शेतजमिनीवर भरमसाठ कर आकारणी केली त्यामुळे शेती क्षेत्रावर त्याचे विपरीत परिणाम झाले. गरीब श्रीमंत असा भेद न करता कर आकारणी करणे अन्याय कारक स्वरुपाचेअसते. म्हणून ठरावीक उत्पन्न मर्यादे पर्यंत कर आकारले जाऊ नयेत. कर देण्याची क्षमता विचारात घेऊन कराची आकारणी केली जावी. ज्यांची कर भरण्याची क्षमता अधिक आहे अशा व्यक्तींवर क्षमतेनुसार कर आकारणी केली जावी...कर आकारणीचा बोझा करदात्यांवर अधिक प्रमाणामध्ये पडू नये. केंद्र आणि राज्य शासन यांच्यामध्ये कर महसुलावरून वादविवाद होऊ नये यासाठी राज्य शासनाचे आणि केंद्र शासनाचे कर वेगळे असावे. शेती आणि

विक्री कर हे राज्याच्या अखत्यारीत असावे. तत्कालीन गरजांनुसार केंद्र आणि राज्य सरकारांना महसूल मिळवून देणारे कर कोणते असावे याबाबत डॉ बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या 12 व्या विभागात 264 ते 300 या कलमांखाली वित्त आयोग स्थापना करण्या मागील भूमिका कळते. केंद्र व राज्य यांच्यात वित्तीय निधीचे वाटप करण्याची व प्रत्येक पाच वर्षांनी त्याचा आढावा घेण्याची ही घटनात्मक तरतूद त्यांनी केली.

किंमत अस्थिरते विषयी विचार

डॉ. आंबेडकरांच्या मते देशांतर्गत वस्तूंच्या किमतीमध्ये मोठे चढ - उतार होऊ देणे म्हणजे देशातील आर्थिक अस्थैर्याला निमंत्रण देणे होय. प्रामुख्याने महागाईमुळे कष्टकरी, गरीब व समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असणारी जनता भरडली जाते. म्हणून किंमतवाढ होऊ देण्यास त्यांचा विरोध होता. तसेच किंमतवाढीमुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे अधिक विषम वाटप होऊन श्रीमंत अधिक श्रीमंत उलट गरीब अधिक गरीब होतात या सर्व शासनाने किंमतवाढ रोखण्यासाठी राज्यकोषीय व चलनविषयक उपाययोजनांचा अवलंब करून किंमतनियंत्रण घडवून आणले पाहिजे .

कामगार विषयक विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगार मंत्री असताना कामगारांच्या हिताचे अनेक कायदे पास केले. कामगारांकडूनदैनंदिन बारा तास काम करून घेणे, कामाच्या ठिकाणी आवश्यक त्या सुविधा प्रदान करणे, कमी वेतन देणे, पुरूषांपेक्षा स्त्रियांना कमी वेतन देणे हा कामगारांवर अन्यायच ठरतो. म्हणून कामगारांच्या कामाच्या तासाची मर्यादा आठवड्यातून अठ्ठेचाळीस तास, स्त्री- पुरुष वेतन समानता, स्त्रियांना बाळंतपण काळात सुटी, कामाच्या ठिकाणी योग्य वागणूक व विमा संरक्षणविषयक अनेक कायदे केले. कामाच्या ठिकाणी कामगारांना योग्य वागणूक असेल तर कामगारांच्या कार्यक्षमतेत वाढ होते. त्याचा फायदा उद्योगाला होतो. कामगारांचे संप, टाळेबंदी, कामबंद आंदोलन यासारख्या समस्यांपासून औद्योगिक क्षेत्राला वाचवता येते. उद्योग क्षेत्रांची भरभराटहोऊन देशाच्या आर्थिक विकासाला चालना/ प्रोत्साहन मिळते. तसेच कामगारांना योग्य सुविधा प्रदान केल्यास कामगारांची कामाविषयी निष्ठा वाढण्यास मदत होत। सद्यस्थितीत उद्योग क्षेत्राच्या आणि देशाच्या आर्थिक विकासासाठी डॉ आंबेडकरांचे कामगारविषयक विचारही उपयुक्त ठरतात

जल आणि ऊर्जा विकास विषयक विचार

डॉ. आंबेडकरांनी जल आणि ऊर्जा विकास खात्याचा कार्यभार सांभाळताना जलही संपत्ती आहे .असा विचार सर्वप्रथम मांडल। आणि जलवितरण निश्चित झाले पाहिजे असे त्यांचे मत होते. भारतातील पर्जन्याचे असमान वाटप आणि अनिश्चितता यावर मात करून कोरडवाहू शेतीचे रूपांतर बागाईत शेतीत करण्यासाठी, उद्योग व्यवसायांना पाण्याची उपलब्धता करून देण्यासाठी जलसाठे निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी मोठया धरणांची निर्मिती होणेसुद्धा आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.डॉ. आंबेडकर हे दामोदर, भाकरा नांगल, हिराकूड यासारख्या धरणांचे उद्गाते आहेत .डॉ. आंबेडकरांनी ऊर्जाविषयक राष्ट्रीय धोरण सर्वप्रथम आखले.त्यांच्या मते भारतात विजेची हमी असावी.कमी दरात व मुबलक प्रमाणात वीजपुरवठा व्हावा . वीजनिर्मिती ववितरण संदर्भात केंद्राची भूमिका महत्त्वपूर्ण असावी.पाणी आणि ऊर्जा यांचा एकत्रित विचार

होणे गरजेचे आहे.पाण्यापासून वीजनिर्मिती, शेतीसाठी वीजपुरवठा या संदर्भातील संपूर्ण नियोजन व त्याची अंमलबजावणी करण्यात डॉ आंबेडकरांची कामगिरी अतुलनीय आहे.

निष्कर्ष

डॉ आंबेडकरांचे आर्थिक विचार हे समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या त्रिसूत्रीवर आधारित असून त्यांचे लिखाण कल्याणकारी अर्थशास्त्र व श्रमाचे अर्थशास्त्र यात मोलाची भर घालणारे आहे. त्यांनी जलद औद्योगिकरणासाठी खाजगी उद्योगांपेक्षा सार्वजनिक उद्योगांना अधिक महत्त्व दिले. ऊर्जा, कृषी जल, चलन, महिला, कामगार, नियोजन यासारख्या क्षेत्रात मोलाची भर घातली. डॉ आंबेडकरांनी आधुनिक भारतीय अर्थव्यवस्थेची खऱ्या अर्थाने मुहुर्तमेढ रोवली. भारत आर्थिकदृष्टया महासत्ता होण्याच्या उंबरठयावर असताना त्यांचे आर्थिक विचार हे आजच्या स्थितीतसुद्धा उपयुक्त ठरणारे आहेत .

संदर्भ

1.Rajkumar(2011), Economic thoughts of B.R.Ambedkar,Common wealth publishers Pvt.Ltd.Delhi.

2.डॉ जाधव नरेंद्र(1992),आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान ,सुगावा प्रकाशन, पुणे.

3.काकडे ,लांडगे, भानुपते (2005),डॉ बाबासाहेब आंबेडकर- नियोजन ,जल व विद्युत विकास : भूमिका व योगदान, सुगावा प्रकाशन ,पुणे .

4.खंदारे सुभाष(2018), रुपयाची समस्या त्याचे मूळ व त्यावरील उपाय, सुधीर प्रकाशन ,वर्धा .

5.https://www.bookganga.org

6.https://www.loksatta.com

7. https:// maharashtra times.com >article

8.https://maxwomen.in.econo

9.mr.m Wikipedia .org

ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविकांच्या समस्यांचा अभ्यास.... संदर्भ - ता. शिरूर (का).

प्रा. सय्यद अफरोज अहेमद

गृहशास्त्र विभाग, कालिकादेवी महाविद्यालय शिरूर (का.) जि. बीड.

प्रस्तावना :

भारत देश आशिया खंडातील विकसनशील देशामध्ये मोडतो. भारतात ग्रामीण भागात अशिक्षित तसेच गरीब लोकांचा जास्त समावेश आहे. प्राचीन काळी शिक्षण, आरोग्य, आहार इत्यादी बाबतीत मोठया प्रमाणात उदासीनता होती, एकंदरीत ग्रामीण समाजाच्या पारंपरिक समाजरचनेत पुढे चालून बदल झाल्यामुळे हळूहळू भारत देश विकासाच्या दिशेने वाटचाल करू लागला आणि अठराव्या व एकोणिसाव्या शतकात जगामध्ये अनेक महत्त्वपूर्ण बदल झाले त्यात प्रामुख्याने औदयोगीकरण आणि अन्य क्षेत्रात क्रांती झाली. संयुक्त राष्ट्र संघटना स्थापन करण्यासाठी यामध्ये वेगवेगळ्या पातळीवर वेगवेगळ्या संघटना स्थापन करण्यात आल्या. जागतिक आरोग्य संघटनेची स्थापना दुसरे महायुद्ध झाल्यानंतर झाली त्याचा मूख्य उद्देश मानवी आरोग्याचे विविध रोगापासून संरक्षण करणे असा होता. तसेच विविध संघटना मार्फत वेगवेगळ्या आर्थिक सामाजिक कौटुंबिक प्रश्नावर जास्त लक्ष दिले जाऊ लागले माता व बालसंगोपन या प्रश्नाला प्राधान्य दिले गेले.

भारतामध्ये लोकशाही शासन प्रणाली प्रमाणे सर्वांना विकासाच्या समान संधी यावर जास्त भर दिला गेला, जन्मास येणाऱ्या प्रत्येक बालकाला जगण्याचा अधिकार आहे याकरीता त्याच्या आवश्यक गरजासाठी प्रयत्नांची, सहकार्याची आवश्यकता भासू लागली. प्रत्येकाच्या क्षमतेचा, बुद्धीचा पुरेपूर वापर केला तर राष्ट्रीय पातळीवर भारताच्या विकासात वरचा क्रमांक येईल त्याकरीता कुटुंबातील मुले व माता यांच्या सर्वांगीण विकासासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजना निर्माण झाली. एकात्मिक बाल विकास सेवा योजना म्हणजे एकाच ठिकाणी किंवा संघटित बालकांनासुविधा देण्याची व्यवस्था होय. एकात्मिक बाल विकास सेवा योजना 1975 मध्ये सुरु करण्यात आली ही योजना सुरू होण्या आगोदर बालकांची काळजी व संगोपनावर जास्त भर दिला गेला नाही परंतु बालकांचा सर्वांगीण विकास कशा प्रकारे साधता येईल यावर जास्त भर देण्यात आला. बालक देशाचा भावी आधारस्तंभ असून, देशाच्या विकासातबालकांची महत्वाची भूमिका आसते म्हणून त्याचां सर्वांगीण, एकात्मिक विकास होने महत्त्वाचे आहे. त्याकरीता एकात्मिक बाल विकास योजना सुरू करून शिक्षणाच्या माध्यमातून अंगणवाडी चा विकास झाला.

बालशिक्षणाचा विकास करण्यामध्ये 'ताराबाई मोडक' यांचा अतिशय महत्त्वाचा वाटा आहे त्याचबरोबर 'अनुताई वाघ' यांनी अंगणवाडी रुपी रोपटे लावून त्यांचे संवर्धन करण्याचे काम केले आहे.अंगणवाडीतीलमुलेव घराच्या अंगणातील फुले यांची एकत्र संकल्पना त्यांनी याव्दारे मांडली. एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रामुख्याने अनुसूचित जाती, जमाती भूमिहीन, शेतमजूर, दारिद्र्य रेषेखालील

कुटुंब, अल्पसंख्याक, रोजगार हमीवर काम करणारे कुटुंब तसेच या कुटुंबातील मुले व इतर व्यक्ती यांच्यासाठी आहे. कारण समाजातील या घटकातील लोकांचे उत्पन्न कमी असल्याने त्यांच्या अत्यावश्यक गरजा ते पूर्ण करू शकत नाहीत त्यांना पोटभर जेवण पण मिळणे शक्य होत नसुन,आरोग्या विषयी ज्ञान नसते या कुटुंबामध्ये अंधश्रद्धा, अज्ञान, बालमृत्यु, कुपोषण, इत्यादी समस्या जास्त प्रमाणात दिसून येतात.यामुळे महिला आणि बालकांच्या आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत म्हणुन अंगणवाडी या प्रकल्पाला केंद्र सरकारने मान्यता दिली. अंगणवाडी प्रकल्पाला मान्यता देण्याचा केंद्र शासनाचा हेतू हाच की आजचा बालक हा राष्ट्राचा भावी आधारस्तंभ आहे. म्हणून केंद्र शासनाने राष्ट्रीय धोरणामध्ये बालकांच्या विकासावर अधिक भर दिलेला आहे.बालकांच्या विकासाचे स्वरूप लक्षात घेऊन पोषण, आरोग्य, शारीरिक, मानसिक, नैतिक, भावनिक, सामाजिक इत्यादी विकासाच्या बाबतीत बाल संगोपन, बाल शिक्षण यांना अग्रक्रम दिला म्हणून या बालकांचा सर्वांगीन विकास होणे महत्त्वाचे आहे. बालकांचा विकास म्हणजे राष्ट्राचा विकास होय, अशा प्रकारची कल्पना या मधून साकार करण्याचा केंद्र सरकारचा निश्चित प्रयत्न आहे. भावी पिढी ही राष्ट्रकार्यात उपयोगी यावी हा त्यामागचा स्पष्ट हेतु असल्याचे आपणास त्यांच्या कार्यक्रमावरून दिसून येते. यातुनच बाल संगोपनासाठी अंगणवाडी अस्तित्वात आली आहे.

अंगणवाडीचा इतिहास व लाभार्थी :--

अंगणवाडीची संकल्पना भारतात श्रीमती 'ताराबाई मोडक',आणि'श्री गिजू भाई बधेका' यांनी आणली.एकात्मिक बाल विकास योजना ई.स.१९७५साली सुरू झाली.पहिली अंगणवाडी बोर्डी येथे सुरू केली.(बोर्डीता. डहाणू ,जि .ठाणे)ताराबाई मोडक यांनी पूर्वप्राथमिक अभ्यासाची स्थापना केली त्याच काळात नूतन बाल शिक्षण संघाची स्थापना झाली ताराबाई या स्वतः ग्रामीण भागात राहात होत्या, ग्रामीण भागात शिक्षणासाठी जागा नसल्यामुळे त्यांनी खेडयात अंगणातच शिक्षण देण्यास सुरुवात केली त्यालाच पुढे अंगणवाडी असे नाव पडले. तसेच गरिबी आणि अज्ञानामुळे आरोग्यविषयक चांगल्या सवयी चे ज्ञान नसल्यामुळे अनेक कुटुंबांमध्ये पोटभर जेवण मिळू शकत नाही. अनुसूचित जाती-जमाती, शेतमजूर, दारिद्र्य रेषेखालील कुटूंब व इतर व्यक्ती यांना अनेक शारीरिक, आर्थिक, आरोग्य विषयक समस्या सतत भेडसावत असतात याचाच विचार करून ताराबाई मोडक तसेच अनुताई वाघ यांनी अंगणवाडीची संकल्पना अस्तित्वात आणली. मुले शाळेपर्यंत येत नाही तर शाळा मुलांपर्यंत पोहोचवून त्यांना शिक्षणाचे धडे देणे व जनतेला वेगवेगळ्या योजनांची माहिती तसेचत्यांच्या समस्यांची जाणीव करून देण्याचे महत्वाचे कार्य याव्दारे केले जाऊ लागले.

प्रामुख्याने अंगणवाडी मध्ये०० ते ०६ वर्षाची बालके गरोदर माता, स्तनदा माता, किशोरवयीन मुली, यांना प्राधान्य दिले गेले. त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचे कार्य या व्दारे केले जाते. वरील सर्व गोष्टींचा विचार करून महिला व बालकल्यणासाठी योजना राबवण्याचे काम केंद्र सरकारने ठरविले आणि बालकल्याण कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला. पाचव्या पंचवार्षिक योजनेत या योजनेचे काम हाती घेण्यात आले. यालाच एकात्मिक बाल विकास प्रकल्प म्हणतात. ग्रामीण भागात७०० लोकसंख्येसाठी व शहरी भागात १००० लोकसंख्येसाठी एक अंगणवाडी ची मान्यता असते.

संशोधन साहित्याचा आढावा :

प्रस्तुत विषयावर संशोधन करताना या विषयाशी निगडित पुर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेण्यात आला. साहित्याचा आढावा घेताना पुस्तकांचा वृत्तपत्रातील लेख, मासिके, संशोधन लेख,संशोधन पत्रिका याचा संशोधनाकरीता अभ्यास करण्यात आला .

(१९९१) कुमारी मेघा मधुकर वालचाले यांनी "भारतातील संबंधित बाल विकास सेवा योजना"या विषयावर संशोधन कार्य केले आहे. त्यांच्या कार्यात त्यांना असे आढळले की शहरांमध्ये पूरक आहार ठेकेदारा व्दारे पुरविले जाते हे ठेकेदार निकृष्ट प्रतीचा पूरक आहार देतात त्यामुळे शहरातील मातांना व मुलांना पूरक आहार देऊन ही काही फायदा होत नाही. कारण पूरक आहाराचा दर्जा निकृष्ट प्रकारचा असतो.

(१९९४-९५) 'कुमारी ललिता पाटील' यांनी "औरंगाबाद शहरातील बालवाडी शिक्षकांच्या समस्यांचा अभ्यास" या विषयावर संशोधन केले त्यांना असे आढळून आले की, सेविकांच्या समस्या तेव्हाच निर्माण होतात जेव्हा बालक समस्याग्रस्त असेल तेव्हा पालकांनी सहकार्य करणे अपेक्षित आहे असे त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर कामाचा मोबदला अपुरा पडत आसल्यामुळे काम करताना सेविका असमाधानी आहेत.

संशोधन समस्येची गरज व महत्त्व:

आज भारतामध्ये औदयोगिकरणामुळे बहुतांश लोक हे शहराकडे धाव घेत आहेत त्यामुळे झोपडपट्टयांची संख्या जास्त प्रमाणात वाढत चाललेली आहे. लहान बालके यांच्यावर चांगले संस्कार करता येत नाहीत आणि संगोपन ही नीट करता येत नाही त्यामुळे देशाचे हे भावी आधार विध्वंसक मार्गाकडे जात असल्याचे आपणास दिसून येते.

कोणतेही क्षेत्र असो त्यामध्ये समस्या असतात आणि त्या समस्येचे निराकरण करणे गरजेचे आहे कारण कोणत्याही क्षेत्रामध्ये कार्य करणारा वर्ग आपले कार्य योग्य प्रकारे तेव्हाच करू शकतो जेव्हा त्याच्या समोर काम करत असताना कोणत्याही प्रकारच्या समस्या उद्‌भवत नाहीत जर काम करत असताना व्यक्तिला समस्या येत असतील तर ती व्यक्ती काम करताना विचलित होऊ शकते त्यामुळेकेलेले कार्य ती व्यक्तीव्यवस्थित रीतीने पार पाडू शकत नाही. अंगणवाडी सेविकांना प्रथम स्त्री म्हणून एक भूमिकापार पाडावी लागते जिथे स्त्री या शब्दाचा वापर करण्यात येतो तेथे हमखास त्यांना समस्यांना सामोरेजावे लागते. अंगणवाडी सेविका म्हणून कार्य करीत असताना गावातील गरजू महिला, गरीब परितक्त्या, घटस्फोटीता,विधवा निराधार महिलांना प्रशिक्षण देऊन तर कधी-कधी प्रशिक्षण न देता ही त्या कार्य करीत असतात. तसेच त्यांचा अपुरा पगार, सामाजिक वातावरण समाजातील त्यांचे स्थान, असुरक्षितता, बलात्कार, आरोग्याच्या समस्या, मानधन समस्या तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळत नाही,सेवानिवृत्तीच्या लाभसंबधी समस्या, आजारपणाची रजा, महागाई भत्ता, डिजिटल अंगणवाडयांचे प्रश्न इत्यादी अनेक लहान मोठया समस्यांचा सामना या सेविकांना करावा लागतो . त्यासाठी अशा स्त्रियांना प्रशिक्षण देऊन आरोग्याच्या बाबतीतील शिक्षण आहार संबंधित शिक्षण देऊन सक्षम करण्यासाठी या योजना अंगणवाडीच्या माध्यमातून समोर आल्या.

कोणत्याही क्षेत्रात सुधारणा घडवून आणावयाच्या असतील तर सर्वप्रथम आपल्याला त्या क्षेत्रातील समस्यांचा सखोल अभ्यास करावा लागेल व त्या समस्या निर्माण होण्यास नेमका कोणता घटक कारणीभूत

आहेत त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. बालक घडविण्याचे महत्वपूर्ण काम हे अंगणवाडी मध्ये काम करणाऱ्या सेविकांना करावे लागते. तेव्हा त्यांच्यावर देशाची खूप मोठी जबाबदारी असल्याचे आपणास दिसून येते आणि ही जबाबदारी पार पाडत असताना त्यांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. भारत देश हा आर्थिकदृष्टया विकसनशिल देश असुन अनेक आर्थिक समस्या आहेत परिणामी आरोग्याच्या अपुऱ्या सुविधा तसेच स्थलांतरीत लोकांचे राहणीमान अत्यंत खालच्या दर्जाचे असल्या कारणाने बालमृत्यूचे प्रमाण मोठया प्रमाणात दिसते.

वरील सर्व गोष्टीचा विचार करून महिला व बालकल्याण्यासाठी योजना राबविण्याचे काम केंद्र सरकारने ठरवूनमोठया प्रमाणात बाल विकासाचे कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न केला गेला, परंतु शासनालायोग्य असा प्रतिसाद मिळाला नाही. बाल कल्याणासाठी विविध योजना या कागदोपत्री तयार झाल्या, परंतु त्यांची अंमलबजावणी प्रत्यक्षात होत नाही जागतिक आरोग्य संघटनेचा मुख्य उद्देश हा मानवी आरोग्याचे विविध रोगांपासून संरक्षण करणे हा आहे. रोगाची लक्षणे आणि उपाय योजना यांचे सर्व नियोजन या आरोग्य संघटने मार्फत होत असते. जागतिक पातळीवर महिला व बालकांच्या समस्येला अधिक महत्त्व दिले जाते कारण माता व बालक यांच्यावर देशाचे भवितव्य अवलंबून आहे जर त्यांच्या आरोग्याच्या समस्यांचे प्रश्न निर्माण झाले तर देशाची प्रगती निश्चितच खुंटणार.आज वेगवेगळ्या योजना असून देखील माता व बालमृत्युचे प्रमाण आज ही काही प्रमाणात कायम आहे.घटनेने स्त्रियांना समान संधी दिलेली असली तरी प्रत्यक्षात परिस्थिती मात्र विदारक आहे. समाज, शासन, कुटुंब, कार्यालय या सर्व ठिकाणी महिलांचे स्थान अजूनही दुय्यमच आहे. ती नोकरी करीत असूनही तिला आर्थिक स्वातंत्र्य नाही ,तसेच तिच्या आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न, कामातील समस्या ,कामाच्या ठिकाणच्या समस्या, कौटुंबिक प्रश्न, समाजाचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन, नोकरी व कुटूंब यातील भूमिका व मानसिक संघर्ष इत्यादीचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. म्हणून प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

- अंगणवाडी सेविकांची सामाजिक,आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, पार्श्वभूमी अभ्यासणे.
- अंगणवाडी सेविकांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेणे.
- अंगणवाडी सेविकांचा पोषण आहार वाटपातील भूमिकेची कार्यपद्धती अभ्यासणे.
- अंगणवाडी सेविकांच्या स्थानिक पातळीवर येणाऱ्या अडचणीचा अभ्यासणे.
- ग्रामीण व शहरी भागातील अंगणवाडी सेविकांना येणाऱ्या समस्या अभ्यासणे.
- अंगणवाडी सेविकांना मिळणाऱ्या शासकीय सोई सुविधांचा अभ्यास करणे.
- अंगणवाडी सेविकांच्या वेतनासंबंधीची समस्या जाणून घेणे.

गृहीतके:

- बीड जिल्यातील अंगणवाडी सेविकांच्या विविध समस्या आहेत.
- अंगणवाडी सेविकांच्या वेगवेगळ्या समस्यामुळे त्यांच्या कामावर परिणाम होतो.
- अंगणवाडी सेविकांना मिळणारे वेतन अपुरे आहे.

- बालकांमध्ये चांगल्या सवयीचा विकास होणे महत्वाचे आहे.
- अंगणवाडीमध्ये मुलांच्या भाषिक विकासावर भर असावा.
- अंगणवाडीतील मुलांना सामाजिक समायोजनेचे शिक्षण मिळायला हवे.

विषयाची व्याप्ती वमर्यादा :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही शिरूर तालुक्यातील १९९ अंगणवाडीत कार्येरत सेविका पुरतीच मर्यादित आहे. याकरिता अंगणवाडी सेविकांच्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, कामाच्या ठिकाणच्या समस्यांना अनुसरून अभ्यास करण्यात आला .

संशोधन पद्धती व नमुना निवड :

प्रस्तुत संशोधन करताना शास्त्रीय पद्धतीचा वापर करून प्राथमिक व दितीय माहिती गोला करण्यात आली. द्वितीय माहिती जिल्हा परिषद बीड, एकात्मिक बाल विकास केंद्र, बाल विकास प्रकल्प तसेच वेळोवेळी होणारे प्रसिद्ध अहवाल यांच्या आधारे द्वितीय माहिती संकलित केली तर प्राथमिक माहिती मिळविताना अभ्यास क्षेत्र असलेल्या शिरूर तालुक्यातून एकूण १९९ अंगणवाडी पैकी स्तरित यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने २५ % नमुना म्हणजे ५० प्रतीसादक अंगणवाडी सेविकांचा नमुना निवडण्यात आला व मुलाखात-अनुसूची, प्रश्नवली व निरीक्षणाच्या माध्यमातून प्राथमिक माहिती या प्रतिसादक अंगणवाडी सेविकाकडून गोळा करण्यात आली.

संदर्भ ग्रंथ:-

1. डॉ. जयश्री गोडसे (२०१०):स्त्री-अभ्यास विविध पैलु ,कीर्ति प्रकाशन औरंगाबाद.
2. एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र राज्य, मुंबई – मार्गदर्शिका (हॅण्ड बुक)
3. प्रा.सौ.माधवी कवि (२००८) : महिला कल्याण आणि विकास , विद्या प्रकाशन, नागपूर.
4. डॉ.स्नेहा महाजणा (१९९४) : आहारशास्त्राची मुलत्तवे, श्री.मंगेश प्रकाशन नागपूर.
5. रमा शर्मा / एम.के. शर्मा (२०१०) :मातृ-कला एवं शिशु विकास , अर्जुन पब्लिशिंग हाऊस , दरियागंज नई दिल्ली.
6. विमलेश कुमारी (२०१०) :मातृत्व एवं शिशुपालन ,डिसस्कवरी पब्लिशिंग हाऊस , दरियागंज नई दिल्ली.
7. डॉ. गोपीनाथ कालभोर (२०१०) : बालिका शिक्षा , कृष्णकांत ब्रदर्स ,मथुरा(उ.प्र.) प्रथम संस्करण.
8. प्रा.सौ.शोभा वाघमारे (नाईक) (२००८) :पोषण आणि आहार , विद्या बुक पब्लिशर्स , औरंगाबाद.
9. डॉ.प्रमिला जाधव-पानसंबळ (२०१५) : स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा सहभाग व सामाजिक परिवर्तन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
10. डॉ.शोभा वाघमारे(नाईक) (२०१०) :आहारोपचार आणि सामुदायिक पोषण , विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद .
11. डॉ.दा.धो.काचोळे (२०१५) :सामाजिक समस्या आणि नागरी समस्या ,कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद.
12. भांडारकर पु. ल. (१९७६) : "सामाजिक संशोधन पद्धती"महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ नागपूर.
13. लोमटे सुमन (२०००) :नाते व्यवस्था स्त्री दर्जा आणि भूमिका , सरस्वती प्रकाशन.
14. काळदाते सुधा - भारतीय समाज - प्रश्न आणि समस्या, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद
15. पांगरीकर अनघा -अंगणवाडी योजनेची परिणामकारकता, गृहविज्ञान विभाग विज्ञान विभाग शारीरिक ज्ञान वीज्ञानकॉलेज औरंगाबाद. (अ प्रकाशित)
16. पिसाळ रजनी -अंगणवाडी शिक्षिके कडून अपेक्षा, प्रकाशन--संचालक बालविकाससेवा योजनावाशी, नवी मुंबई.

रशिया युक्रेन युद्ध जागतिक अर्थव्यवस्थे वर परिणाम

डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर

ने. सु. बो. महा. नांदेड

रशिया आणि युक्रेनमध्ये का युद्ध सुरु आहे:

युक्रेन आणि रशिया या राष्ट्रांच्या सीमारेषा या एकमेकाशेजारी आहेत. त्यामुळे युक्रेन या देशालाही आपली ताकद दाखवण्यासाठी नाटोमध्ये सामील व्हायचे होते. त्यामुळे युक्रेनने आपल्या भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेत आपल्यालाही नाटोचे सदस्य बनवण्याची मागणी अमेरिकेकडे सुरू केली. रशिया-युक्रेनच्या युद्धाची ही' तीन कारणे आहेत.

युक्रेनचा NATOमध्ये सामील होण्याला रशियाचा विरोध:

रशिया-युक्रेन युद्ध आता तिसऱ्या महायुद्धाकडे वाटचाल करत आहे. रशियाने आपल्या आणि युक्रेनमध्ये येणाऱ्यांना धमक्या दिल्या आहेत, तर अमेरिकेनेही त्याचा परिणाम फार वाईट होतील, असा कडक इशारा दिला आहे. त्याची किंमत रशियाला चुकवावी लागेल. ब्रिटनसह इतर देशही रशियाच्या विरोधात उभे ठाकले आहेत. यावेळी रशिया आणि युक्रेनमधील युद्धामागे नाटो कारणीभूत असल्याचे मानले जात आहे. NATO म्हणजे नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन (North Atlantic Treaty Organization) ज्याची सुरुवात 1949 साली झाली. युक्रेनला नाटोमध्ये सामील व्हायचे आहे, परंतु रशिया याच्या विरुद्ध आहे. पण नाटोमध्ये सामिल होण्याला रशियाचा विरोध का आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे, एकेकाळी सोव्हिएत युनियनच्या काळात मित्र असलेले हे प्रांत दोन देश झाल्यानंतर एकमेकांचे कट्टर शत्रू का झाले आहेत?

याचे पहिले आणि सर्वात मोठे कारण म्हणजे नाटो संघटनेत युक्रेनचा समावेश करण्यासाठी अमेरिकेने केलेली कसरत. अमेरिकेचे वर्चस्व असलेल्या संस्थेमध्ये 30 देशांचा समावेश आहे, त्यापैकी बहुतेक युरोपमधील आहेत. मात्र, यातील बहुतांश सैनिक हे अमेरिकेतील आहेत. रशियावर दबाव आणण्यासाठी आणि जुन्या मतभेदांमुळे अमेरिका अशा प्रकारचे प्रयत्न सातत्याने करत आला आहे. अमेरिकेने यापूर्वीही रशियावर निर्बंध लादून त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, त्यांची ही युक्ती आजवर कामी आली नव्हती. आता अमेरिकेला हे काम युक्रेनच्या मदतीने करायचे आहे. युक्रेन NATO सोबत गेल्यास त्याचे सैन्य आणि शस्त्रास्त्रांच्या जोरावर अमेरिका रशियाचे नुकसान करण्यात अंशतः यशस्वी होऊ शकते, अशी रशियाला चिंता आहे.

नॉर्ड स्ट्रीम 2 रोखलेली पाइपलाइन

रशिया- युक्रेनच्या युद्धामागे दूसरे कारण म्हणजे यूएस आणि वेस्टर्न-युरोपियन देशांनी नॉर्ड स्ट्रीम 2 रोखलेली पाइपलाइन हे आहे. या प्रकल्पावर रशियाने अब्जावधी डॉलर्स खर्च केले आहेत. याद्वारे रशियाला फ्रान्स, जर्मनीसह संपूर्ण युरोपला गॅस आणि तेलाचा पुरवठा करायचा आहे. यापूर्वी ज्या पाइपलाइनमधून हा पुरवठा होत असे त्या पाइपलाईन युक्रेनमधून जात असंत. यासाठी रशिया दरवर्षी युक्रेनला लाखो डॉलर्स देत असे. नवीन पाइपलाइन बांधल्यास युक्रेनची कमाई बंद होईल. युक्रेनच्या रशियापासून वेगळे होण्याच्या प्रमुख कारणांमध्ये याचाही समावेश आहे.

रशियाचे युक्रेनशी असलेले भावनिक नाते:

तिसरे कारण म्हणजे रशियाला युक्रेनने कोणत्याही प्रकारे अमेरिकेसोबत जाऊ नये असे वाटते. याचे एक मोठे कारण म्हणजे रशियाचे युक्रेनशी असलेले भावनिक नाते आहे. युक्रेनच्या मातीतूनच रशियाचा पाया रचला गेला. रशियाची ओळख, उरल पर्वतरांगही युक्रेनमधून जाते. अमेरिका आणि रशिया यांच्यात दीर्घकाळापासून वाद सुरू आहे. शीतयुद्धानंतरही परिस्थिती बदललेली नाही. दुसरीकडे, रशियाच्या सामर्थ्याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही. रशियाला फक्त आपली प्रतिष्ठा राखायची आहे आणि त्याची बदनामी थांबावी असाही हेतू आहे.

दरम्यान, युक्रेनच्या पश्चिमेला युरोप आणि पूर्वेला रशियाची सीमा आहे. 1991 पर्यंत, युक्रेन पूर्वेकडीलच्या सोव्हिएत युनियनचा (USSR) भाग होता. वेगळे झाल्यानंतरही युक्रेनमध्ये रशियाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येत होता. युक्रेन सरकारही रशियन सरकारच्या आदेशानुसार काम करत होते. मात्र खालावत चाललेली अर्थव्यवस्था, वाढती महागाई आणि बहुसंख्य युक्रेनियन नागरिकांवर अल्पसंख्यांक रशियन भाषिक लोकांवरील राज्य, यामुळे या बंडाला खतपाणी मिळाले.

एकमेकांची शेजारील राष्ट्रं:

ज्या प्रकारे स्वतंत्र भारत आणि पाकिस्तान ही राष्ट्रं एकाच दिवसात अस्तित्वात आली आहेत, तशीच आणि त्याच प्रकारे रशिया आणि युक्रेन ही राष्ट्रं एकाच दिवशी जन्मला आली आहेत. ज्या दिवशी या राष्ट्रांची निर्मिती झाली तो दिवस होता, 25 डिसेंबर 1991. या दिवशी सोव्हिएत रशियाचे (युएसएसआर) विघटन झाले आणि नव्या 15 देशांची निर्मिती झाली. याच 15 देशांमध्ये ही दोन राष्ट्रं होती रशिया आणि युक्रेनही. 1991 पूर्वी, सोव्हिएत रशिया जगातील दोन ध्रुवीय प्रणालीमध्ये कम्युनिस्ट गटाचे नेतृत्व करत होता आणि सोव्हिएत रशिया अमेरिकेशी जोरदार स्पर्धा करत होता. सोविएत रशिया आणि अमेरिका या दोन देशांमध्ये कट्टर शत्रूत्व होते, त्यामुळे हे दोन्हीही देश अनेकदा एकमेकांसमोर युद्धासाठी उभे राहिले होते. 1945 ते 1991 पर्यंतचा हा काळ खरं तर शीतयुद्धाचा समजला जातो. मात्र या युद्धमैदाना भांडवशाली अमेरिका

विजयी होत आली आहे. 25 डिसेंबर 1991 मध्ये मात्र Union of Soviet Socialist Republics हे 15 देशांमध्ये विभागले गेले. USSR हे 15 देशात विभागल्या गेल्यानंतर अमेरिका जगाचे नेतृत्व करु लागली.

सोव्हिएत समाजवादी प्रजासत्ताक संघ:

1991 सोव्हिएत समाजवादी प्रजासत्ताक संघ पंधरा देशात विभागला गेल्यानंतर रशियातील काही नागरिकांनी हा झालेला अपमान सहन केला. कारण रशियन प्रजासत्ताक हा युएसएसआरमध्ये सामील असलेल्या 15 प्रजासत्ताक राष्ट्रांचा प्रमुख बनला होता. आणि हेच त्यांच्या दृष्टीने त्यांना त्रासदायक होते. त्यावेळी रशियाची परिस्थिती कमकुवत होती, आणि त्यामुळे त्यांना आपल्या राष्ट्राचा अपमान गपगुमान सहन करावा लागला होता. सोव्हिएत समाजवादी प्रजासत्ताक संघ विभागला गेला तरीही अमेरिकेकडून रशियावर नेहमीच दबाव तयार करण्यात आला.

नाटो (नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन) या लष्करी संघटनेच्या माध्यमातून अमेरिकेने यूएसएसआरपासून विभक्त झालेल्या सगळ्यांना देशांना आपल्या अधिपत्याखाली घेण्यास सुरुवात केली.युक्रेनला नाटोचे सदस्य बनायचे होते, मात्र पुतिन नाराज होते…

युक्रेन आणि रशिया या राष्ट्रांच्या सीमारेषा या एकमेकाशेजारी आहेत. त्यामुळे युक्रेन या देशालाही आपली ताकद दाखवण्यासाठी नाटोमध्ये सामील व्हायचे होते. त्यामुळे युक्रेनने आपल्या भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेत आपल्यालाही नाटोचे सदस्य बनवण्याची मागणी अमेरिकेकडे सुरू केली. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष गेल्सिन्की यांच्या या हालचालीमुळे पुतिन प्रचंड नाराज झाले. त्यामुळे त्यांनी आपले सैन्य युक्रेनच्या सीमेवर पाठवण्यास सुरुवात केली. आणि हेच रशिया-युक्रेनच्या तणावाचे तात्कालिक कारण आहे असल्याचे म्हटले जाते.

रशियाने युक्रेनवर आक्रमण केले आणि अमेरिका आणि त्याच्या इतर नाटो सहकाऱ्यांमध्ये मोठा संघर्ष झाला तर अमेरिका आणि इतर प्रगत देश रशियावर आर्थिक निर्बंध लादतील अशी अपेक्षा आहे. बऱ्याचदा हे निर्बंध आक्रमकांसोबत व्यवसाय करणाऱ्या देशांनाही लागू होतात.

रशिया-युक्रेन तणाव वाढल्याने संघर्ष थांबविण्याचा प्रयत्न करण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने (**United Nations Security Council**) मंगळवारी तातडीची बैठक बोलावली. वृत्तसंस्था असोसिएटेड प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, जागतिक शांतता संस्थेच्या (**World Peace Council**) राजकीय प्रमुखांनी पूर्व युक्रेनमधील डोनेस्तक (**Donetsk**) आणि लुहान्स्क (**Luhansk**) या फुटीरतावादी प्रदेशांना रशियाने मान्यता दिल्याचा निषेध केला आहे.

एएफपी वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, यूएनमधील (**UN**) अमेरिकेच्या प्रतिनिधीने दोन प्रदेशांना मान्यता दिल्याबद्दल रशियाला लक्ष्य केले आणि पुतिन (**Vladimir Putin**) यांचे दावा फोल ठरवत, आपला देश

डोनेस्तक आणि लुहान्स्कमध्ये शांततारक्षकांची भूमिका बजावेल असे त्यांनी सांगितले. दरम्यान या घटनेनंतर अमेरिका(**America**) आणि रशिया यांच्यातील चर्चेत प्रगती न झाल्याने जगभरातील शेअर बाजारात जोरदार घसरण झाली. तसेच या अनिश्चिततेमुळे कच्च्या तेलाच्या किमतीतही (**Crude oil prices**) मोठी वाढ नोंदवण्यात येत आहेत.

वाढू शकते महागाई:

काळ्या समुद्राच्या प्रदेशातून अन्नधान्याच्या प्रवाहात कोणताही व्यत्यय आल्यास त्याचा किमतींवर आणि पुढे चालून अन्नधान्याच्या महागाईवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. चार प्रमुख निर्यातदार – युक्रेन, रशिया, कझाकस्तान आणि रोमानिया हे काळ्या समुद्रातील बंदरांमधून धान्य पाठवतात. मात्र युद्धजन्य परिस्थितीत यामध्ये कोणत्याही लष्करी कारवाई किंवा निर्बंधांमुळे व्यत्यय येऊ शकतो.

नैसर्गिक वायू आणि तेलाच्या किमती वाढतील:

युक्रेन आणि रशियामधील तणावाचे रुपांतर संघर्षात झाले तर ऊर्जा बाजारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. युरोप आपल्या 35% नैसर्गिक वायूसाठी रशियावर अवलंबून आहे. हा वायू मुख्यतः जर्मनीमधून बेलारूस आणि पोलंड ओलांडून पाइपलाइनद्वारे युरोपात येतो.

97 डॉलरवर पोहेचले कच्चे तेल:

या वर्षीच्या आर्थिक सर्वेक्षणात 2022-23 या आर्थिक वर्षात कच्च्या पेट्रोलियमच्या किमती प्रति बॅरल 70-75 डॉलरच्या श्रेणीत असण्याची अपेक्षा आहे. क्रूडच्या किमती गेल्या एका आठवड्यापेक्षा जास्त काळापासून प्रति बॅरल 90 डॉलरच्या वर सुरू आहेत. यामागील प्रमुख कारण युक्रेन आणि रशिया यांच्यातील तणाव हे आहे. कच्च्या तेलाच्या किमती आज सात वर्षांतील उच्चांकी म्हणजेच 97 डॉलर प्रति बॅरलवर पोहोचल्या आहेत.

संघर्षाचे व्यापारावर परिणाम:

रशियाने युक्रेनवर आक्रमण केले आणि अमेरिका आणि त्याच्या इतर नाटो सहकाऱ्यांमध्ये मोठा संघर्ष झाला तर अमेरिका आणि इतर प्रगत देश रशियावर आर्थिक निर्बंध लादतील अशी अपेक्षा आहे. बऱ्याचदा हे निर्बंध आक्रमकांसोबत व्यवसाय करणाऱ्या देशांनाही लागू होतात.

आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम:

सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी (**CMIE**) डेटाबेसमधील डेटातून लक्षात येते की भारतासोबत व्यापारामुळे रशियाचे महत्त्व कमी होत आहे. सोव्हिएत युनियनच्या पतनापूर्वी रशिया हे भारतासाठी एक महत्त्वाचे निर्यातीचे ठिकाण होते आणि भारताच्या एकूण निर्यातीत सुमारे याचा 10 टक्के भाग होता. 2020-

21 पर्यंत ही संख्या 1% पेक्षा कमी झाली आहे. या काळात भारताचा एकूण व्यापार नक्कीच वाढला आहे. 2020-21 मध्ये भारताच्या एकूण आयातीमध्ये रशियन आयातीचा वाटा 1.4% होता.

भारताच्या संरक्षण गरजांवर होणार परिणाम:

रशियन निर्यातीवरील निर्बंध भारताच्या संरक्षण गरजांसाठी समस्या निर्माण करू शकतात. स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या (**SIPRI**) मार्च 2021 च्या फॅक्टशीटनुसार 2016-2020 मध्ये रशिया हा दुसरा सर्वात मोठा जागतिक शस्त्रास्त्र निर्यातक होता आणि भारत हे त्याचे सर्वात मोठे निर्यात गंतव्यस्थान होते, जे रशियन संरक्षण निर्यातीपैकी 23% होते.

रशिया-युक्रेनमधील युद्धाचे जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम, शेअर बाजार कोसळले, सोने महागले – चांदी 66,000 पार

संदर्भ:

1. दै. लोकमत 28-2-2022
2. दै. सकाळ 28-2-2022
3. https://www.india.com/marathi/india/russia-ukraine-crisis-how-could-war-between-russia-and-ukraine-2. affect-the-indian-economy-5253509/
4. https://www.sarkarnama.in/desh/do-you-know-these-three-reasons-for-the-russia-ukraine-war-as91
5. https://thefocusindia.com/national/russia-ukraine-war-affects-global-economy-stock-market-crashes-gold-rises-silver-crosses-66000-134125/

कौटिल्याचे राजकीय विचार

डॉ. बी. व्ही. डोंगरे (पाटील)

राज्यषास्त्र विभाग प्रमुख, माधवराव पाटील महाविद्यालय,पालम ता.पालम जि.परभणी

मराठवाडा राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेच्या, अंबाजोगाई येथे होणा—या १३ व्या अधिवेशनात चर्चेसाठी निश्चित करण्यात आलेल्या विषयांमध्ये कौटिल्याचे राजकीय चिार या विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे, हि निश्चितच आनंदाची आणि तत्वाज्ञानाच्या क्षेत्रातही भारताला एक प्राचीन परंपरा आहे. ह ेमत आता या क्षेत्रातील विद्वान मान्य करीत आहेत.

प्राचीन राजेशाही शासनपध्दतीची जागा आता जगभर लोकशाही शासन पध्दतीने घेतली आहे. लोकाच्या हितासाठी असलेले शासन ही लोकशाहीची मध्यवर्ती संकल्पना आहे. कोटिल्याला अभिप्रेत असणारा राजा हा देखील प्रजेच्या सुखात आपले सुख माननारा असाच होता. त्यासाठी राजाची निती म्हणजे धोरणे कसे असावी याचे मार्गदर्शन कौटिल्याने केले आहे. जे आजच्या राज्य कर्त्यासाठीही उपयुक्त ठरु शकते. म्हणुन कौटिल्याच्या विचाराची उजळणी आवश्यक आहे. आजच्या विद्यार्थ्यांतुनच उद्याचेराज्यकर्ते निर्माण होणार आहेत म्हणुन अध्यापकांनी वर्तमान परिस्थितीत उपयुक्त ठरु शकतील असे कौटिल्याचे विचार विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे आवश्यक आहे. अशाच विचारांचा आढावा घेण्याचा प्रयत्न या निबंधात केला आहे.

कौटिल्याने राजाला राज्यकारभार चालवण्यासाठी मार्गदर्शक ठरावा म्हणुन ग्रंथ लिहीला असताना त्याचे नांव राजनितीशास्त्र असे न देता अर्थशास्त्र असे दिले याचे आश्चर्य वाटते. परंतु कौटिल्याने स्वत: त्याचे उत्तर पुढील श्लोकात दिले आहे.

मनुष्याणा वृत्तिरर्थ :। मनुष्यवती भूमिरित्यर्थ : तस्या :
पृथ्विव्या लाभपालनोपाय : शास्त्रमर्थशास्त्रमिति

म्हणजे मनुष्यप्रमाणेच जीवीत अर्थावर म्हणजे संपत्तीवर अवलंबुन आहे. मनुष्ये ज्या पृथ्वीवर राहतात तिला वसुधा, वसुमती, रत्नगर्भा इत्यादी अर्थनिदश्रक म्हणजे संपत्तीद्योतक नांवे आहेत तेंव्हा अशा अर्थवती पृथ्वीचा लाभ कसा करुन घ्यावा आणि तिचे पालन कसे करावे याचा मार्ग हया शास्त्रात दाखवला असल्यामुळे मी या शास्त्राला अर्थशास्त्र असे अन्वर्थक नांव दिले आहे.

कौटिल्याचेच दुसरे नांव चाणक्य असे आहे. म्हणुन या ग्रंथात सांगितलेली निती, चाणक्यनिती म्हणुन ओळखली जाते. या चाणक्य नितीचे वर्णन, मुद्राराक्षस नाटकाच्या पाचव्या अंकाच्या प्रारंभी सिध्दार्थकाने पुढील शब्दात केले आहे. चाणक्यनितीरुप लतेवर देशकालाच्या घाटांनी बुध्दीजलाचे सिंचन केले असता, कार्यसिध्दी हे सुंदर फल प्राप्त होईल, यावरुन या ग्रंथाची उपयुक्तता स्थलकालरिपेक्ष आहे असे सिध्द होते.

कौटिल्यासारखे राजाने चार विद्वांचा अथवा शास्त्रांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्या म्हणजे आन्वीक्षिकी त्रयी वार्ता दण्डनितिश्चेति विद्या : आन्वीक्षिकी त्रयी, वार्ता आणि दण्डनीती या चार विद्या होत. त्याच्यामुळे मनुष्य धर्मकाय व अर्थकाय हे जाणु शकतो म्हणुन त्यांना विद्या ही संज्ञा आहे असे स्पष्टीकरण कौटिल्याने दिले आहे.

सांख्य, योग आणि लोकायत हितीन दर्शने म्हणजे आन्वीक्षिकी दृ ती.यीच्या संबंधात धर्म काय व अधर्म

काय, वार्ताव्यवहाराच्या संबंधात अर्थ काय व अनर्थ काय, दंडनीतीच्या संबंधात योग्य धोरण कोणते व चुकीचे धोरण कोणते, तसेच या तीन विद्यांचे परस्पर बलाबल, हया गोष्टींची कारण मी मांसेच्या द्वारा परीक्षा करते म्हणुन लोकांना उपकार होते, संकटकाली व अभ्युदयाच्या समयी बुध्दीला स्थैर्य प्राप्त करुन देते आणि विचार, उच्चार व आचार यात विशारदता आणुन देते.

आन्वीक्षिका सर्व विद्यांना प्रकाशीत करणारा दीप, सर्व कार्य सिध्दीस नेणारा उपाय आणि सर्व धर्मांना प्राप्त होणारा आश्रय होय असे सदा मानण्यात आलेले आहे.

ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद हे तीन म्हणजे त्रीयी, हया त्रीयीमध्ये निरुपिलेला धर्म, चारवर्ण आणि चार आश्रम यांचे आपआपले विशिष्ट धर्म निश्चित करतो म्हणुन तो उपकारक आहे.

टाज वर्णव्यवस्था व आश्रमव्यवस्था कालबाहय झाली असली तरी समाजात काम करणा—या प्रत्येकाचा आपला एक धर्म असतो, अदा : अध्यापन करणे हा शिक्षकाचा धर्म आहे. असाच प्रत्येकाचा धर्म असतो आणि प्रत्येकाने आपल्या धर्माचे पालन करणे समाजाता हिकारक असते, म्हणुन राजानें आपल्या प्रजेला स्वधर्मापासुन च्युत होवु देवु नये.

शेती, पशुपालन आणि व्यापार हया व्यवसायाना वार्ता म्हणतात. ती धान्य, पशु, धनु, जंगलातील उत्पन्न आणि कामगार याचा लाभ करुन देतो म्हणुन ती उपकारक आहे. बदलत्या परिस्थितीनुसार आपण यात कारखान्याचा समावेश करु शकतो.

आन्वीक्षिका, त्रयी आणि वार्ता हयाची जोपासना करण्याचे जे साधन तो दंड त्याचा यथायोग्य वापर करण्याची पध्दती म्हणजे दंडनिती. ती अप्राप्त वस्तुची प्राप्ती करुन देणारी,प्राप्त वस्तुचे संरक्षण करणारी संरक्षिताची वाढ करणारी आणि वृध्दींगत झालेल्या द्रव्याचे सुपात्री दान करणारी म्हणुन उपकारक आहे.

इतर तीन विद्या दंडधारणाच्या नीतिवर अवलंबुन आहेत म्हणुन कौटिल्य दंडाला महत्व देतो. पण त्याचा वापर मध्यम पध्दतीने व्हावा असे त्याचे मत आहे.कारण कडक शासन करणारा राजा प्राणीमात्रांना भीतीग्रस्त करतो तर सौम्य शासन करणा—या राजाची अवमानना होते आणि दंडजर उपयोगातच आणला नाही तर मात्स्यन्याय प्रवर्तित होतो. राजाच्या विनयावर आधारलेले दंडधारण प्रजेला योगक्षेम साध्य करुन देते. म्हणुन लोक यात्रा सुरळीत चालावी असे इच्छिणा—या राजाने दुष्टांना शासन करण्याकरिता आपला राजदंड नेहमी सिध्द ठेवला पाहीजे.

विद्या संपादन केली तरही षड्रिपु मुळे मनुष्य भ्रष्ट होवु शकतो, म्हणुन राजाने काम, क्रोध, लोभ, मान, मद, आणि हर्ष या षड्रिपुंचे दमन करुन इंद्रिय निग्रह केला पाहिजे असे कौटिल्याचे मत आहे. राजाची वर्तणुक कशी असावी याचे स्पष्टीकरण देताना कौटिल्य म्हणतो, राजाने षड्रिपुंचे दभन करुन इंद्रियावर जय मिळवावा, विद्यावृध्द लोकांशी संपर्क ठेवुन बुध्दी समृध्द करावी, गुप्तचरांच्या स्वरुपात दृष्टीचे कार्य सिध्द करावे, उद्यमशीलतेने योगक्षेम साधावा, कार्याच्या यथोचित अमलबजावणीने प्रजेच्या स्वधर्म पालनाची सिध्दी करावी, विद्येच्या उपारुनेने विनयाची जोपासना करावी, हितकर गोष्टीची संबंध ठेवुन लोकप्रियता संपादन करावी आणि हितकारक असेच आपले वर्तन ठेवावे.

सत्ता ही माणसाला भ्रष्ट करते हे कौटिल्याला मान्य असावे, म्हणुन राजावर अंकुश असला पाहिजे असे त्याचे मत आहे. त्यासाठी राजाने आपल्या स्वत:च्या वागणुकीवर लक्ष ठेवण्याच्या कमी आचार्य अथवा अमात्य यांची योजना करावी, त्यांनी उपायकारक गोष्टीपासुन राजाला परावृत्त करावे असे तो सुचवतो.

राजाची नीती धोरण :

रामायण, महाभारत काळापासुन चालत आलेली राजाची भुमिका कौटिल्याने मान्य केली आहे. राजपद हे केवळ सुखोपभोगाचे साधन नाही तर ती प्रजेच्या कल्याणाची जबाबदारी आहे, ही भारतीय संकल्पना आहे, म्हणुनच त्याला राजधर्म असे म्हटले आहे. राजाच्या कर्तव्याबद्दल कौटिल्य म्हणतो.

प्रजा सुखे सुखं : राज्ञ:प्रजानांच हिते हित्म ।
नात्मप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हित्म ।।

प्रजेचे जे सुख राजाचे सुख आणि प्रजेचे जे कल्याण तेच राजाचे कल्याण, केवळ स्वत:ला सुखदायक वाटणा—या गोष्टी आपल्या ख—या सुखाच्या आहेत असे राजाने केव्हाही समज ुनये.

कौटिल्याने राजासंबंधी म्हणजे राज्यकर्त्यांसंबंधी व्यक्त केलेले मत हे लोकशाहीतही तंतोतंत लागु होते. लोकशाहीत निवडणुका संपल्या की, एखादा आमदार, खासदार किंवा मंत्री याची भेट ही किती दुरापास्त असते

याचा आपणालाही अनुभव आहे. परंतु राजेशाहीतही प्रजेला राजाची भेट सुलभतेने व्हावी अशी कौटिल्याची अपेक्षा आहे. म्हणुन राजाच्या दैनंदीन व्यवहारा संबंधी मार्गदर्शन करताना तो असे सांगतो की, दरबारात गेल्यावर कार्य करुन घेण्याच्या इच्छेने जे आले असतील त्यांना दरवाज्याजवळ आत येण्यास प्रतिबंध करु देवु नये, कारण ज्या राजाची भेट होणे कठीण असते त्याच्याकडुन जवह आलेले लोक कार्य व अकार्य याची उलटापालट करुन घेतात, त्यामुळे तो प्रजाजनांच्या कोपास पात्र होण्याचा सभाव असतो.

कल्याणकारी धोरण :

आधुनिक काळात कल्याणकारी राज्याच्या संकल्पने अंतर्गत नागरीकाप्रती शासनाची जी कर्तव्ये अपेक्षित आहेत तशीच कर्तव्ये राजाने आपल्या प्रजेसाठी पार पाडावीत असे कौटिल्याने सांगितले आहे. कौटिल्य हा कल्याणकारी राज्याच्या पुरस्कर्ता ठरतो. शेती आणि उद्योगाची भरभराट, उत्पादनात वाढ व भौतिक समृध्दी हे राजाचे उदिष्ट असावे असे तो सांगतो.

शेतक–याबद्दल राज्याचे धोरण उदार असावे असे कौटिल्याचे मत होते . त्याच्या मते वाजवीपेक्षा जास्त दंडाच्या रकमा भरावयास लावुन, उठल्यासुठल्या वेढीला धरुन , नाना प्रकारचे कर द्यावयास भाग पाडुन राजाने शेतकरी लोंकांना पीडा न करता त्यांना ममतेने वागवावे आणि त्यांच्या शेतीच्या जनावराचे चोर, सर्पादी विषारी प्राणी आणि रोग यापासुन संरक्षण करावे.

सर्वसामान्य नागरीकाला जीवनावश्यक वस्तु वाजवी दरात मिळाव्यात आणि नफेखेरीस आळा बसावा म्हणुन कौटिल्याने व्यापाराची पध्दत पुढील प्रमाणे सांगितली आहे. स्वदेशात उत्पन्न झालेल्या सरकारी मालाचा व्यापार एकाच मक्तेदाराकडुन करुन घ्यावा.

परदेशात उत्पन्न झालेल्या मालाचा अनेक व्यापा–याकरवी ते आणि ते दोन्ही प्रकारचे माल प्रजाजनांना फायदेशीर होतील अशा रीतीने विकावयास लावावे आणि प्रजाजनांना हानीकारक होईल असा खुप मोठा सुध्दा नफा टाळावा. ज्या वस्तु नेहमी लागणा–या आहेत, त्याच्या बाबतीत वेळ घालविल्यामुळे अडचण आणि रेलचेलीमुळे होणारा दोष उत्पन्न होवु देवु नये.

प्रत्येक व्यक्तीने आपली कौटुंबिक जबाबदारी पार पाडली पाहिजे. एखाद्या व्यक्तीने कुटुंबाच्या निर्वाहासाठी आवश्यक ती सोय न करता संन्यास घेतल्यास त्या व्यक्तीकडुन राजाने दंड वसुल करावा असे कौटिल्य सांगतो. त्याच बरोबर अनाथ असलेली लहान मुले, वृध्द माणसे, अनाथ स्त्रिया आणि संकटग्रस्त यांचे पालन राजाने करावे असे तो सुचवतो. या सर्व कल्पना कल्याणकारी राज्यामध्ये अपेक्षीत आहेत.

परराष्ट्र व्यवहार :

कौटिल्याच्या विचारातील सर्वाधिक टिका होत असलेला आणि कालबाहय झाला आहे असे समजल्या जाणारा भाग म्हणजे त्याचे परराष्ट व्यवहार विषयक विचार होत. याबाबतीत त्याने मांडलेले विचार मंडल सिध्दत या नावाने ओळखले जातात. आपल्या शेजारील राज्य हे शत्रुराज्य व त्याच्या पलीकडील राज्य हे मीत्रराज्य समजावे. शत्रुचा शत्रु तो आपला मीत्र ही रीती राजाने स्वीकारावी व आपला साम्राज्यविस्तार करावा असा कौटिल्याचा सल्ला आहे. त्यामुळे काही टीकाकार कौटिल्याला आक्रमक आणि साम्राज्यवादी ठरवतात. त्याची मॅकियावेलीशी तुलना करतात. परंतु कौटिल्याला देखील मॅकियाबेली किंवा हेगेल प्रमाणे राष्ट्राज्याची निर्मीती अपेक्षीत असावी.

दुस–या कोणत्याही पाश्चात्य विचार वंताने राज्याचे घटक सांगताना मीत्र हा आवश्यक घटक मानला नाही. परंतु कौटिल्याच्या मते राज्यांसाठी, स्वामी, आमात्य, जनपद , दुर्ग , कोश , दड , व मीत्र हे सात घटक आवश्यक त मानले आहेत ज्याअर्थी कौटिल्याने मीत्र हा राज्याचा आवश्यक घटक मानला आहे. त्याअर्थी त्यांच्या साम्राज्य विस्ताराला निश्चितच मर्यादा आहेत.

परकीय नागरीकाबद्दल कौटिल्य जागरुक दिसतो. त्याच्या मते परकीय राज्यातील लोक राष्ट्घातक असतात म्हणुन त्यांना राजधानीत सक्त मनाई करावी. इतर गावात राहण्याला त्यांना बंदी नसावी पण त्यांच्यावर जबरदस्त कर बसवावा.

परकीय नागरीकाबद्दलची दक्षता आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात शत्रुचा शत्रु तो आपला मीत्र हे सुत्र आजही उपयुक्त ठरणारे आहे.

अराजक :

राजाने प्रजेच्या हितासाठी काय करावे याचे सविस्तर मार्गदर्शन कौटिल्याने केले आहे, पण त्याच बरोबर राज्यात अराजकाची स्थिती निर्माण होवु नये म्हणुन राजाने काय करु नये किंवा काय करणे, कारण नसता केवळ दुर्मदाने प्रजेची कत्तल उडविणे, जाणुन बुजुन सदाचाराचा त्याग करुन दुराचरण करण्यास प्रवृत्त होणे, जे केलेच पाहिजे ते न करता जे करावयास नको ते मुद्दाम करणे, तसेच प्रजेला जे द्यावयास पाहिजे ते न देता जे तिच्यापासुन घ्यावयास नको ते बळजबरीने घेणे, निरपराध्याला कडक शासन करुन अपराध्याला मोकळा सोडणे, ज्यांना प्रतिबंधात ठेवावयास पाहिजे त्यांना हवे तसे वावरु देवुन जे मोकळे राहणेच इष्ट त्यांना प्रतिबंध करणे, ज्यात नुकसान होण्याचा संभव आहे. अशी कामे हाती घेवुन ज्याच्या पासुन प्रत्यक्ष फायदा होत आहे. अशी कार्ये बिघडवुन टाकणे , चोरांपासुन प्रजेचे संरक्षण न करता तिची संपत्ती लूबाडणे, कल्याणप्रद धाडसाची आणि चांगली कामे निंद्य मानणे, लोकनायकांना उपद्रव देणे, मनाई व्यक्तीचा अपमान करणे, आपल्या दुर्वतनाने आणि असदाचाराने वृध्दाचा संताप उत्पन्न करणे, संकटकाळी उपाययोजना न करता चालु कामाची हेळसांड करणे, आणि प्रजेचे जान आणि तीची जिंदगी याचे संरक्षण करण्याचे आपले कर्तव्य विसरणे, हे दुर्गुण ज्या राज्याच्या वर्तनात असतात त्याची प्रजा

क्षीणा : प्रकृतयो लोभं लुब्धा यान्ति विरागताम्
विरक्ता यान्त्यमित्र वा भर्तार ध्वन्ति वा स्वयंम्

म्हणजे – प्रथम दरिद्री आणि दारिद्र्याला कंटाळुन पुढे लोभी आणि लोभामुळे शेवटी अराजक बनते.

आज स्वातंत्र्याच्या ५० वर्षा नंतर आपल्या देशातील कायदा व व्यवस्थेची स्थिती निराशाजनक आहे कोटयावधी रुपयांचा अपहार करणारे आणि निरपराध लोकांचा बळी घेणारे उजळ माथ्याने फिरतात आणि सज्जनांना मात्र घराबाहेर पडताना भीती वाटते म्हणुन कौटिल्याच्या शिकवणुकीप्रमाणे सज्जनांना अभय देणारे आणि दुर्जनांना धाक वाटणारे शासन निर्माण होणे ही काळाची गरज आहे.

थोर समाज प्रबोधनकार राजा राममोहन रॉय यांच्या सामाजिक नेतृत्वाचा अभ्यास

डॉ. संभाजी संतोष पाटील

राज्यशास्त्र विभाज, श्री.शि.वि.प्र.संस्थेचे भाऊसाहेब -ना.स.पाटील साहित्य आजि मु.फि.मु.अ.वाजिज्य महाविद्यालय, धुळे (महाराष्ट्र)

प्रस्तावना -

भारतात १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात प्रबोधन युगास सुरुवात झाली. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये सुरु झालेल्या सुधारजा चळवळीने अखेर राजकीय क्षेत्रात प्रवेश केला व भारतीय स्वातंत्र्य चळवळीची सुरुवात केली. प्राचीन भारतीय संस्कृतीतील चांजली मुल्ये टिज्विजे आवश्यज होते म्हजून-न तज्जाली-न विचारवंतां-नी आधुनिज पाश्चात्य विचारसरणीचा स्विकार करीत असतांना भारतीय मुल्यांशी सांगड घालण्याचा प्रयत्न केला यात प्रयत्न करजाऱ्या विचारवंतामधील अग्रस्थानी असणारे विचारवंत म्हणजे राजा राममोहन रॉय हे होत. रॉय यांच्या कार्यमाजील प्रेरजा मानवतावादाची आणि विश्वबंधुत्वाची होती ते प्रखर बुध्दीवादी होते. विविध भाषांचे व्यासंगी होते आणि अनेक कार्याच्या तत्वज्ञानाचे गाढे अभ्यासक पंडीत होते. तसेच त्यांच्या सर्व कार्यामागची प्रेरणा ही माणूसकीची होती. त्यांच्यात माणूसकीचा ओलावा होता. शिवाय हा मानवतावाद संकुचित नव्हता. तो वैश्विक होता. त्यामुळे त्यांच्या सर्वच कार्याला उदात्तता प्राप्त झालाली होती. भारतीय संस्कृतीतील आदर्श तत्वे आणि आधुनिक पाश्चात्य संस्कृतीतील आदर्श विचार यांच्या समन्वयातुन त्याने आचारविश्व निर्माण झालेले होते. रॉय यांनी समाजात सुरु असलेली सती प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. त्यातुनच त्यांनी स्त्री स्वातंत्र्यांचा विचार मांडला. हिंदु धर्मातील अनेक देवांचा कल्पनेतुन अनेक धर्म व पंथ निर्माण होऊन एक संघ समाजात फुटीरता निर्माज झाली. ही फुटीरता -नष्ट ज रज्यासाठी व मा-नवी ज ल्याजासाठी त्यां-नी एजे श्वर-नादाची ज ल्प-ना मांडली व त्यांचे ब्राम्हो समाजाच्या माध्यमातु-न समाजाला पटवू-न देज्याचे ज ार्य रॉय यां-नी शिजजामध्ये आमुलाग्र स्वरुपाचा बदल झाला पाहीजे. वैज्ञानिज दृष्टीजो-नाचा स्विज ार जे ला. भारतीयां-नी स्वतःची प्रंजती घडवु-न आजज्यासाठी पाश्चात्य शिक्षणाचा अवलंब केला पाहीजे असे रॉय यांचे मत होते. रॉय यांच्या काळात भारतीय समाजात असलेली जातीयता विषमता यामुळे समाजात काही व्यक्तींचा श्रेष्ठ तर काहींना अनिष्ठ मानले जात होते. धर्म, वंश,जात, लिंग, पैसा या आधारे भेदभाव जे ला जात असे. यामुळे देशात एकात्मतेच्या मार्गात अडथळें निर्माण झालें होते हा भेद रॉय यांना मान्य नव्हता. सर्वांना समान मा-नावे माजूस म्हजू-न सर्वांसाठी समा-न ज ायदा असावा असा मा-नवतावादी दृष्टीजो-नाचा स्विज ार रॉय यां-नी जे ला. भारतात अ-नेज जाती धर्माच्या आधारावर ज ायदा -न ज रता सर्वांसाठी समा-न -नाजरी ज ायदा ज रज्यात यावा यासाठी रॉय झटले.

शोध निबंधाचा उद्देश :-

थोर समाज प्रबोधनकार राजा राममोहन रॉय यांच्या सामाजिक नेतृत्वाचा अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोधनिबंधाचा उद्देश आहे.

संशोध-नाची उद्दीष्टे :-

(१) राजा राममोहन रॉय यांचे सामाजिक विचाराविषयी माहीती जाणुन घेणे.

(२) राजा राममोहन रॉय यांचे राज्य व कायदा या विषयी विचारांची माहिती अभ्यासणे.

(३) राजा राममोहन रॉय यांचे आणि आर्थिक विचारांविषयी माहिती जाणून घ्णे.

(४) राजा राममोहन रॉय यांचे शिक्षणा विषयी विचारांची माहीती जाणून घेणे.

माहितीचे संकलन आणि विश्लेषण :-

थोर समाज प्रबोधनकर राजा राम मोहन रॉय यांच्या योगदानाचा अभ्यास करतांना त्या काळातील घडलेल्या घडामोडी यांची माहिती विविध साधनंद्वारे प्राप्त केलेली आहे. या लघुशोध निबंधासाठी विविध संदर्भ ग्रंथ,मासिके, साप्ताहीके, इंटर-नेट, वर्तमा-नपत्रे इ. दुय्यम साध-नांचा वापर ज रज्यात आला आहे.

(१) **सामाजिक विचार** :- रॉय हे थोर समाजसुधारक होते. त्यांच्या संपुर्ण विचारांना आणि कार्याला अध्यात्मिक अधिष्ठान होते. सर्व मानव जातीचे कल्याण त्यांना अभिप्रेत होते. भारतीय राजकीय परिस्थितीच्या अधपतनाला धार्मिक आणि सामाजिज अधपत-न ज ारजीभूत आहे. याची जात्री त्यां-ना पटली होती म्हजून-न सामजिज आजि धार्मिज परिस्थिती सुधारल्या शिवाय राजकीय परिस्थितीत सुधारणा होणे शक्य नाही असे त्यांचे मत होते. या विचारसरणीचे राजा राममोहन रॉय होते. ते म्हजतात ``ज्या प्रज ारच्या धार्मिज परंपरां-ना हिंदू लोज चिज टू-न बसले आहे त्यांमुळे त्यांचे राजज ीय हीत साध्य होत -नाही याची मला जंत वाटते. जात आजि पंथ अशा भेदाभेदामुळे त्यांच्यात राजज ीय जाजीव नि-र्माज होत -नाही. तसेच विविध प्रज ारचे धार्मिक आचरण व विधी धर्म शुध्दीच्या कल्पना यामुळे हा समाज कोणतेही महत्वाचे कार्य हाती घेण्यास कुचकामी ठरलेला आहे म्हजू-नच मला वाटते ज ी, राजज ीय फायद्याच्या दृष्टी-ने तसेच सामाजिज स्वास्थ नि-र्माज होज्याच्या दृष्टी-ने धार्मिज बाबतीत सुधारजा होजे जरजेचे आहे.`` यावरु-न रॉय हे राजज ीय विज ास आजि धार्मिज सुधारजा यांचा नि-ज टचा संबंध ज सा मानत होते हे यावरुन दिसून येत होते. रॉय यांची समाज सुधारणेची सोय त्यांच्या धार्मिक विचार सरणीशी सुसंगत होती. मुर्तीपूजा आणि हिदूंच्या अनेक देवदेवता यामुळे समाजामध्ये पथ, उपपंथ निर्माण झाले असे त्यांचे मत होते. त्यांच्या मते अ-नेज देवदेवतांची ज ल्प-ना बुध्दीला पटलेली -नाही पज त्यास वेद आजि उर्पा-नषीदे या अहिंदूच्या मुळ धर्मग्रथांचा आधारही नाही. आपले हे मत सिध्द करण्यासाठी आणि हिंदू धर्माचे शूध्द स्वरुप दाखवून देण्यासाठी त्यांनी उपनिषदांची इंग्रजी व बंगाली भाषेत भाषांतर जे ली. ती स्वजर्चा-ने छापू-न वि-नामुल्य लोज ां-ना वाटली. ज्या समाज सुधारजेशी रॉय यांचे -नांव जोडले जेले ती सुधारणा म्हणजे सतीची प्रथा बंद करण्याविषयीचा कायदा होय. भारतात अनेक शतकांपासुन सतीची अमानुष आणि क्रूर प्रथा सुरु होती. ब्रिटीशांच्या आजम-नापुर्वी ही प्रथा -नष्ट ज रज्याबाबत झालेले प्रयत्न अयशस्वी ठरते. सुरुवातीस देजील ब्रिटीशां-नी ज ाही जे ले -नाही ज ारज धार्मिज बाबतीमध्ये हस्तजेप ज रायचे -नाही असे ब्रिटीशांचे धोरज होते. रॉय यां-नी अवितरपजे सतीच्या चालीविरुध्द लोकभावना जागृत करण्याचे कार्य सुरुच ठेवले यामुळे या चालीविरुध्द लोकमत तयार होण्यास मदत इ ाली व सरकारला तसा कायदा करणे सोपे झाले. १८१८ पासून सुरु केलेल्या त्यांच्या चळवळीला १८२८ मध्ये यश आले. अजेर जव्ह-र्र लॉर्ड विल्यम बेर्टींजच्या ज ाळात ४ डिसेंबर, १८२९ मध्ये सतीची प्रथा बंद ज रज्याविषयी ज ायदा ज रज्यात आला. या घट-नेमुळे एज जोष्ट झाली आर्थिज रुढी परंपरा अपरिवर्त-नीय -नसतात. परिस्थितीप्रमाजे त्या बदलाव्या लाजतात अजर -नष्ट ज राव्या लाजतात याची जाजिव हिंदू समाजाला झाली व समाज सुधारजेचा मार्ज जुला झाला. अशा प्रज ारे राजा राममोहन रॉय हे हिंदु समाज सुधारणेच्या चळवळीचे नेते व आर्यप्रवर्तक ठरतात. स्त्रियांना मालमत्तेचा हक्क त्यावेळेस नव्हता.पतीच्या निधनानंतर पतीची मालमत्ता मुलास मिळत होती. मुलीस मालमत्तेपासुन वंचित ठेवले जात असे. त्यामुळे रॉय यांनी स्त्रियांना मालमत्तेचा अधिकार असावा असा आग्रह धरला तसेच विधवांचे जीवन दु:खी व उपेक्षित होते. जीवंतपणीच त्यां-ना मरजप्राय वेद-ना भोजाव्या लाजत या अ-नष्ट जोष्टींज डे समाजाचे लज वेधु-न स्त्रियां-ना स्वाभीमा-ना-ने जजता यावे यासाठी प्रयत्न केले होते. तसेच त्यावेळेस बहुपत्नीत्वाची पध्दत अस्तित्वात होती. या प्रथेमुळे स्त्रीयांना हलाकीचे जीवन जगावे लागत होते म्हणून रॉय यांनी असा विचार मांडला की, पहिली पत्नी जीवंत असतांना पुरुषाला दुसरा विवाह करावयाचा असल्यास त्यांनी दंडाधिका-यांची परवानगी घ्यावी.स्त्रीयांना समाजामध्ये स्वतंत्रपणे जीवन जगता यावे तसेच त्यांचा सर्वांगीण विकास घडून यावा. या उद्देशानी त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. अशा प्रकारे स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आजज्यासाठी रॉय यां-नी स्त्री स्वातंत्र्याचे महत्व ज-नतेला पटवू-न दिले. रॉय यांचे असे मत होते ज ी, स्त्रीयांच्या शारिरीज

दुर्बलतेचा व असहयतेचा फायदा पुरुषांनी घेऊन स्त्रियांच्या विकासात अडथळे निर्माण केलेत म्हणून देशाच्या विकासातही अडथळे आलेत त्यासाठी स्त्रियांचे जीवनमान सुधारणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले. रॉय यांनी व्यवस्था आणि व्यवस्थेला विरोध जे ला. स्त्री-पुरुष समाजतेच्या तत्वाचा स्विकार त्यांनी केला.

(२) **राज्य व ज ायदेविषयज विचार** :- ब्रिटीशसत्तेचे राजा राममोह-न रॉय समर्थज होते. मात्र ब्रिटीशांज डु-न उदारमतवादी राजवट, हक्ज ांचे संरजज ज-तेचे ज ल्याज, स्वातंत्र्याचा परिपोष, देशाची आर्थिज सामाजिज प्रजती, लोज शाही मूल्यांची प्रस्थाप-ना अशा अ-नेज चांजल्या जोष्टींची अपेजा ज रतात. त्या मिळत -नसल्यामुळे त्यां-नी -नोज रशाहीवर ज ठोर टिज ा जे ली. यातु-न त्यांचे राज्य व शास-नविषयज विचार स्पष्ट होतात. राज्याची ज ार्ये पुढीलप्रमाजे - (१) सामाजिज व सांस्ृ तिज जेत्रात उपज्र मशिलता, (२) शिजजाचा प्रसार, (३) सत्ता व अ-य अि-नष्ट चालीरितींचे उच्चाट-न, (४) अंधश्रध्दा, भ्रामज ज ल्प-ना यापासुन स्त्रीयांची मुक्तता. (५) लोकशाही व स्वातंत्र्य, समता बंधुना या मुल्यांचा आदर, (६) न्यायतत्वांचा आदर, (७) शेजारी राष्ट्रांशी योज्य सम-वय ठेवजे. (८) शेतीची प्रजती व शेतज ऱ्यां-ना शिजज, (९) जिवीत व वित्तविषयज संस्था, (१०) आक्रमणापासुन देशाचे रक्षण रॉय यांनी प्रातिनिधीक लोकशाहीचा पुरस्कार केलेला आहे. अमर्याद राजेशाहीस त्यांनी विरोध जे ला आहे. निरंकुश राजेशाही हि एका व्यक्तीचे लहरी शासन असते. अशा शासनात प्रजेला पशुवत वागवले जाते. सर्वोत्तम शास-नप्रज ार म्हजू-न ते मर्यादीत घट-नात्मज राजेशाहीस मा-यता देतात. -यायव्यवस्थेवर त्यां-नी सजोल विचार जे ला होता. न्यायीक प्रक्रिया योग्य, नि:पक्षपाती आणि न्यायतत्वाला धरुन असावी. कायदा व समन्वय बुध्दीने न्यायदान केले जावे. न्यायाधीश कायदा व समन्यायबुध्दी नुसार न्यायप्रदान करतात की नाही हे जाणुन घेण्यासाठी लोकमताची त्यावर देखरेख असावी असा सल्ला ते देतात. देशी भाषेत जटले चालवले जावे. त्यां-ना प्रसिध्दी दिली जावी असे त्यां-ना वाटते. -यायदा-न वेळेत, स्वस्त सोयीचे व सहज उपलब्ध होणारे असावे. न्यायालयाची रचना उतरंडीप्रमाणे असावी. वरिष्ठ न्यायालयाचे जालच्या न्यायालयावर नियंत्रण असावे.

(३) **आर्थीज विचार** :- रॉय यांचे मुज्य ज ार्य धार्मिज व सामाजिज जेत्रातील असले तरी आर्थिज जोष्टींज डे त्यां-नी दुर्लज जे ले -नाही. ब्रिटीश सत्तेमुळे धार्मिज परिजाम दिसू लाजले. ब्रिटीशांच्या आजम-नापुर्वी भारत हा देश नि-र्यातदार देश होता. भारतीय ज ापड, हस्तीदंत, ज लाजु सरीच्या वस्तु मसाल्याचे पदार्थ यां-नी परदेशी बाजारपेठेत माजजी होती. ब्रिटीशांचे आजम-न झाल्यानंतर आणि त्यांच्या व्यापारी वखारी स्थापन झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात भारतीय उत्पादनात मोठया प्रमाणात प्रोत्साह-न मिळाले. ब्रिटीश व्यापारामार्फत भारतीय माल अधिज प्रमाजात परदेशात जाऊ लाजला. भारतीय हस्तउद्योजास चालना मिळाली पण इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीनंतर हे चित्र बदलले. इंग्लंडमध्ये मोठया प्रमाणात कापड व इतर वस्तुंचे उत्पादन होऊ लागले. त्या वस्तुच्या विक्रीसाठी बाजारपेठेची गरज भासु लागली यासाठी भारतीय बाजारपेठेचा वापर करण्यात आला. इंग्लंडमधील कापड व इतर वस्तु भारतात आयात होवू लागल्या. भारत हा निर्यातदार देश होता. त्याचे रुपांतर आयातदार देशामध्ये झाले. इंग्लडमधील उद्योगपती भारतातुन कच्चा माल आयात करुन भारतात पक्का माल आयात करु लाजले. यातु-न भारताचे जे पध्दतशीर आर्थिज शोषज होत होते त्याज डे दादाभाई -नौरोजी, -यायमुर्ती रा-नडे, लोज मा-य टिळज अशा अनेक विचारवंतांनी लोकांचे लक्ष वेधले. तरी या परिस्थितीची जाणिव त्यापुर्वीच रॉय यांना होती. १८३२ साली इंज्लंडमधील त्यांच्या मुक्ज ामात त्यां-नी पार्लमेंटच्या समीतीसमोर साज दिली व भारतातील आर्थिज स्थितीज डे लज वेधले. त्यांनी हे दाखवून दिले की, जमीनदारांसंबंधी जो कायदा भारतात आहे, त्यामुळे जमीनदाराचा फायदा होत असून जमीन ज सणाऱ्या कुळांची पिळवणूक होत आहे. जमीन कसल्याबद्दल जमीनदारांना द्यावा लागणारा खंड जास्त असल्याने शेतकऱ्यांच्या हाती काही शिल्लक रहात नाही. त्यामुळे खंड कमी प्रमाणात असावा अशी त्यांनी मागणी केली. तसेच मिठाच्या किमती कमी कराव्यात अशीही मागणी केली.

(४) **शिक्षण विषयक विचार** :- रॉय हे आधुनिक पाशात्य शिक्षणांचे खंदे पुरस्कर्ते होते. पारंपारिक शिक्षण पध्दतीला त्यांचा विरोध होता. गणित, रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञान, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र आणि आधुनिक तत्वज्ञान यांचा शिजजातु-नच पाशात्यराष्ट्रां-नी आपली प्रजती साध्य जे ली. हे त्यां-नी जाजले होते. भारतास आपली प्रजती ज रावयाची असेल तर मध्ययुगीन आणि बाळबोध शिक्षण पध्दतीचा त्याग करुन आधुनिक, वैज्ञानिक पध्दती, तत्वे आणि कल्पनांवर आधारलेल्या शिक्षण पध्दतीचा स्विकार करावा लागेल असे प्रतिपादन त्यांनी केले. युरोपियन लोकांनी ज्याप्रमाणे वैज्ञा-निज दृष्टी स्विज ारु-न नि-सर्जातील शक्तीचा उपयोज स्वत:च्या विज ासासाठी ज रु-न घेतला. तशी दृष्टी स्विज ारु-न आपजास विज ास घडवुन आणावा लागेल. त्यांनी कलकत्तामध्ये हिंदु कॉलेज स्थापन करण्यास पुढाकार घेतला यासाठी त्यांनी तळमळीने प्रयत्न जे ले. हिंदुज ॅलेजच्या स्थाप-नेमध्ये सिहांचा वाटा उचलजाऱ्या रॉय यां-नी पाश्चात्य शिजजाच्या प्रसारासाठी इतरही अ-नेज प्रज ारे ज ार्य जे ले.

मुल्यमाप-न :-

रॉय यांनी विविध विचारांचे चिंतन केले. भारतीय समाज आधुनिक बनावा येथील लोकांनी पाश्चात्य शिजज, पाश्चात्य भाषेत लिहावे -नवि-न मुल्यांचा स्विज ार ज रावा असा त्यांचा दृष्टीज ोन होता. ते असामा-य दर्जाचे प्रज्ञावंत होते. त्यांचे सामाजिक व राजकीय चळवळीतील कार्य भविष्याला दिपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरणारे आहे. त्यांच्या कार्यामागील प्रेरणा मानवता वादाची आणि विश्वबंधुत्वाची होती. ते प्रखर बुध्दीवादी होते. त्यांच्या सर्वच कार्यास उदामत्ता प्राप्त झालेली होती. धार्मिक तत्वज्ञानाकडे मानव जातीचे कल्याण साधणारा एक मार्ग म्हणून ते पहात होते. त्यांच्या विचारामध्ये धार्मिक भेदांना स्थान नव्हते. ब्राम्होसमाज हे रॉय यांच्या मानवता वादाचे मुर्त स्वरुप होय. रुढींच्या चालीविरुध्दी त्यांचे आंदोलन स्त्रीला समान हक्क मिळावेत, विधवांना प्रतिष्ठेने जगता यावे , भारतीयांना जास्तीत जास्त प्रमाणात नोकऱ्या मिळाव्यात, शासनाचे धोरण उदार मतवादाचे असावे, व्यक्तीला अप्रतिष्ठा करणाऱ्या आणि सामाजिक भेदाभेद निर्माण ज रजाऱ्या अंधश्रध्दा आजि रुढी यांचा समाजा-ने त्याज ज रावा यासाठी त्यां-नी प्रयत्न जे ले. त्यांची मा-नवतावादी दृष्टी स्पष्ट ज रतात.

संदर्भ ग्रंथ:

(१)डॉ.ढोबळे रमेश - आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत विद्या पब्लिशर्स, नागपुर. प्रथम आवृत्ती जुन २०१०
(२)प्रा.वराडकर र.घ. - भारतीय राजकीय विचारवंत विद्या प्रकाशन, नागपुर सन २००५.
(३)प्राचार्य डॉ.देवरे पी.डी. - भारतीय राजकीय विचार डॉ.निकुंभ डी.एस. प्रशांत पब्लीकेशन्स,जळगांव प्रथम आवृत्ती २००८.
(४)डॉ.राठी शुभांगी - भारतीय राजकीय विचार, अथर्व पब्लीकेशन्स, जळगांव. प्रथम आवृत्ती २०१४.
(५)डॉ.पाटील वा.भा. - प्राची-न व आधु-निज भारतीय राजज ीय विचारवंत, प्रशांत पब्लीजे श-न, जळजांव प्रथम आवृत्ती २००९.

मंगळवेढयाचा वारसा : एक ऐतिहासिक विश्लेषण

जडहिरे रावसाहेब तुळशिराम
विज्ञा-न महाविद्यालय, सांजोला
डॉ. एस. जी. जाधव
सेवानिवृत्त प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख, पीपल्स कॉलेज, नांदेड

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील मंजळवेढा हे प्रद्रिर्घ ज ाळ राजज ीय जें द्र आजि राजधा-नीचे ठिज ाज राहिले आहे. मंगळवेढे हे तालुक्याचे ठिकाण असून चोखामेळा, दामाजीपंत, कान्होपात्रा या संतांच्या वास्तव्याने ही भूमी प्रसिद्ध आहे. पंधराव्या शतज ात येथे दुष्ज ाळ पडला होता. त्यावेळी संत दामाजीपंतां-नी स्वत:ची धा-याची ज ोठारे उघडू-न जोरजरिबां-ना वाटू-न त्यांचे प्राज वाचविले, असा इतिहास आहे. त्याचप्रमाजे मंजळवेढा हा तालुज ा ज्वारी उत्पाद-नासाठी महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.

मंगळवेढा-इतिहास :

Acharya Sushruta clarifies that different combination of Mahabhuta leads to the formation of six Rasas. All the six Rasa have Mahabhuta but the predominant Mahabhuta determines the Pradhana Rasa. The Anu-Rasa is the secondary taste perception which is perceived after primary taste. The Rasa is Stable in dry state. Whereas Anu Rasa is unstable. As per modern science taste

organ is nothing but the Taste buds. Each taste bud is made up of 100-150 receptors. The life of each receptor is one to two weeks, after these receptors are replaced by the other receptors.

The inter-ralation between Rasa and Mahabhuta:

(Manifestation of Rasas)

Madhura- Jala + Prithvi

Amla- Pritvi + Agni according to Acharya Charaka, and Vagbhata
Jala + Agni according to Acharya Sushruta

Lavana- Jala + Agni according to Acharya Charaka and Vagbhata
Prithvi + Agni according to Acharya Sushruta
Agni + Jala according to Maharshi Nagarjun

Katu- Vayu + Agni

Tikta- Vayu + Akasha

Kashaya- Vayu + Prithvi

Difference between Rasa and Anu-Rasa:

Rasa is primary taste, perceived immediately, distinctly, and completely, and remains stable in dry state also, whereas the Aun-Rasa is secondary taste, perceived after some time, and not distinctly perceived, but perceived partly but not stable in dry state.

Relation between Rutu, Mahabhuta and Rasas formation:

1. Shishira Rutu- Vayu + Akasha forms Tikta Rasa
2. Vasanta Rutu - Vayu + Prithvi forms Kashaya Rasa
3. Grishma Rutu - Agni + Vayu forms Katu Rasa
4. Varsha Rutu - Agni + Prithvi forms Amla Rasa
5. Sharad Rutu - Agni + Jala forms Lavana Rasa
6. Hemnatha Rutu - Prithvi + Jala forms Madhura Rasa.

The disturbance in the seasons may affects the Mahabhuta also, which may further affects the permutation and combination of the Mahabhutas, and there is variation in the Rasa perception.

Rasa Upalabdhi:

- According to Badhnta Nagarjun the taste can be perceived through three Pramanas as follows:
- Pratyaksha - By direct perception from sense organ. Eg: Tikta Rasa of Kirata Tikta, Vasa, Guduchi etc
- Anumana- Through inference. Eg: All types of poisonous drugs cannot be perceived directly.
- Aptopadesha- Through ancient literature. Eg: The Rasa of Gold, Mala, Mutra, their action cannot be perceived through the Pratyaksha and Anumana. It can only be reviewed through the classical literature.

Rasa Rupantarana (Transformation of Rasa):

According to Badhant Nagarjun, Rasa can be changed under the influence of Sthana, Patra, Samyoga, Paaka, Atapa, Bhavana, Desha, Kaala, Parinama, Upasarga, Vikriya.

- Sthana- Dravyas kept unaltered for longer duration the taste will change. Eg: Madhura Rasa of cooked rice changes into sour taste when kept for longer duration.
- Patra- Dravyas kept in certain metallic utensils changes its taste. Eg: Curd kept in bronze utensil turns pungent taste.
- Samyoga- When the drugs are combined it changes its taste. Eg: Tamarind is combined with Lime turns into sweet taste.

- Paaka- A drug which is exposed to heat changes its taste. Eg: Tamarind when heated changes into sweet taste.
- Atapa- Certain drugs when exposed to sun leads to change in taste. Eg: Tumburu Phala is exposed to sun light its Kashaya Rasa changes into sweet taste.
- Bhavana- A drugs when triturated with certain drugs or single gives rise to different colour. Eg: Tila when it triturated with Yasthimadhu gives rise to sweet taste.
- Desha- Taste of the drugs may differ according to Desha (Region), Eg: Tulasi grown in hot climatic conditions are some different taste which is grown in cold climatic condition.
- Kaala- After some time the taste of the drug may vary. Eg: The unripe banana is astringent, after some time it changes into sweet taste.
- Parinaama- Transformation of the drug from one form into another form can be seen change in the taste. Eg: Curdling of sweet milk becomes sour.
- Upasarga- Worm infestation may leads change in the colour. Eg: Infested sugarcane turns in to sour.
- Vikriya- Drugs subjecting into specific methods leads to change in taste. Eg: Talaphala when rubbed turns bitter, Panasa squeezed in hands becomes Amla.

Qualities of Rasas:

Madhura Rasa: Snigdha, Sheeta, Guru
Amla Rasa: Snigdha, Ushna, Laghu
Lavana Rasa: Snigdha, Ushna, Guru
Katu Rasa: Ruksha, Ushna, Laghu
Tikta Rasa: Ruksha, Sheeta, Laghu
Kashaya Rasa: Ruksha, Sheeta, Guru

Actions of Rasa:

Madhura Rasa Karma

- Nadi Samsthana- Alhadakara, Shad Indriya Prasadakara, Medhya, Tarpana
- Pacahana Samsthana- Anulomana, Trishna Nigrahana
- Raktavaha Samsthana- Sandhaniya, Hridya
- Shwasana Samsthana- Kanthya
- Mutravaha Samsthana- Mutrala.
- Prajanana Samsthana- Vrushya, Garbhasthapana, Stanyajanana
- Twacha- Dahashamana, Twachya, Keshya, Varnya.

Amla Rasa Karma

- Nadi Samsthana- Manaprasadana, Indriya Sthairyakara
- Pachana Samsthana- Lalasravakara, Rochana, Deepana, Pachana, Anulomana
- Raktavaha Samsthana- Hridya, Raktapittakara
- Mutravaha Samsthana- Mutrala
- Prajanana Samsthana- Shukrgna

Lavana Rasa Karma:

- Pacahana Samsthana- Kledana, Deepana, Pachana, Rochana, Lalasravajanaka
- Raktavaha Sansthana- Rakta Kopaka

- Shwasana Samsthana- Chedana, Kapha Nissaraka.
- Mutravaha Samsthana- Shikraghna

Katu Rasa Karma:

- Nadi Samsthana- Indriyottejaka, Sajnasthapana
- Pachana Samsthana- Mukha Shodhaka, Deepana, Pacahana, Krimighna, Rochana, Grahi
- Raktavaha Samsthana- Hridayottejaka, Raktasravakara
- Shwasana Samsthana- Kaphagna
- Mutravaha Samsthana- Mutra Sangrhaniya
- Prajanana Samsthana- Avrushya
- Twacha- Kusthagna, Kandugna

Tikta Rasa Karma:

- Pacahana Samsthana- Rochana, Krimighna, Trishna Nigrahana, Deepana, Pachana, Purisha Shoshana
- Raktavaha Samsthana- Rakta Prasadana, Ahridya
- Shwasana Samsthana- Kaphagna
- Mutravaha Samsthana- Mutra Sangrahaniya
- Prajanana Samsthana- Avrushya, Stanyashodhana
- Twacha- Swedana, Kandugna, Kusthagna, Dahashamana, Sthirikarana
- Tapakrama- Jwaragna

Kashaya Rasa Karma:

- Pachana Samsthana- Sthambhana
- Raktavaha Samthana- Sandhaniya, Ahrudya
- Shwasana Samsthana- Kaphagna
- Mutravaha Sansthana- Mutra Sangrahaniya
- Prajanana Samsthana- Avrushya
- Twacha- Peedana, Ropana, Scarnikarana

Madhura Rasa Atisevana Janya Vikara:

Sthaulya, Mardava, Alasya, Atiswapna, Gaurava, Aruchi, Agnimandya, MukhaKanthagata Mansa Vriddhi, Shwasa, Kasa, Pratishyaya, Alasaka, Sheeta Jwara, Anaha, Mukhamadhurya, Vamana, Sajnanasha,Swarabhanga, Netra Rogas, Galaganda, Gandamala, Shleepada, Prameha, Krimietc Kaphaja Rogas.

Amla Rasa Atisevana Janya Vikaras:

Danta Harsha, Trushna, Akshinimilana, Romanchakara, Liquifies Kapha, Pitta Vriddhi, Raktadosha, Mamsa Vidaha, Sharira Shaithilyakara, Shotha, Kshata, Kantha, Vaksha, Hrudaya Dahakara, Raktavikarakara, Shothakara, Paaka, Daaha, Kandu, Paandu, Drishtimandya, Raktapittakara, Bhrama etc.

Lavana Rasa Atisevana Janya Vikara:

Avrushyakara, Trishna,Murcha, Santapa, Vidara, Mamsakotha, Kustha, Visha, Shopha, Dantachuti, Napumsakata, Indiyanasha, Indralupta, Palita, Khalitya, Raktapitta, Amlapitta, Visarpa, Vatarakta, Vicharchika etc.

Katu Rasa Atisevana Janya Viakara:

Glani, Krashata, Kampa, Angashula, Avrushyakara, Murcha, Bhrama, Daha, Daurbalya, Trushna etc.

Tikta Rasa Atisevana Janya Vikaras:

Kharatwa, Glani, Murcha, Dhatu shoshana, Daurbalya, Bhrama, Mukhashosha, Vatavyadhi

Kashaya Rasa Atisevana Janya Vikaras:

Mukhashosha, Hrudayashula, Adhmana, Swarabheda, Shyavatwa, Napumsakata, Visthabhi, Karshya, Glani, Sthambha, Pakshaghata, Apatanaka, Ardita, Strotorodha, Avrushyakara, Vatavyadhi etc.

CONCLUSION:

Madhura, Amla, Lavana, Katu, Tikta, Kashaya are the Shadrasas. The present study revealed that the six types of tastes, determination, Guna, Karma, Ati sevanajanya vikarasa, and some modern aspects. The further scope of the study is to evaluate the controversial aspects of tastes of the drug which are enumerated in classics along with comparative study with the modern science.

REFERENCES:

1. Vagbhata, Commentary, Indu Commentary of Vaidya Anant Damodar Athavale on Astanga Sangraha, Sharirasthana, Pune, Shree Mada Atreya Prakashana, 1980; 279(3): 3- 1.
2. Harita, Commentary, Nirmala Hindi Commentary of Acharya Ramavalamba Shastri on Harita Samhita, Tritiya Sthana Varanasi: Prachya Prakashana, 1985; 86(49): 2-1.
3. Yadavji Trikamji, editor, Commentary: Vidyotini Hindi Commentary of Acharya Kasinath Shastri and Gorakhnath Chaturvedi on Charaka Samhita of Charaka, Sharira Sthana, Varanasi: Chaukhambha Bharati Academy, 1996; 93(8): 32-22.
4. Yadavji Trikamji, editor, Commentary: Ayurveda Tatva Sandipika Hindi Commentary of Acharya Ambika Datta Shastri on Sushruta Samhita of Sushruta, Sharira Sthana, Varanasi: Chowkhambha Sanskrit Sansthan, 2002; 73(10): 3-13.
5. Vagbhata, Commentary, Indu Commentary of Vaidya Anant Damodar Athavale on Astanga Sangraha, Sharirasthana, Pune, Shree MadaAtreya Prakashana, 1980; 279(3): 3-1.
6. Harita, Commentary, Nirmala Hindi Commentary of Acharya Ramavalamba Shastri on Harita Samhita, Tritiya Sthana Varanasi: Prachya Prakashana; Chaukhambha Bharati Academy, 1985; 86(49): 2-1.
7. Acharya Sushruta, Sushruta Samhita commentary of Dalhanacharya Sutrasthana 14th chapter, Shoka No-13, edited by Acharya Yadavji and Trikamji, 7th edition Varanasi, Chaukhamba Orientalia, 2002, Page No-62.
8. Sri Vagbhatacharya, Rasaratna Samucchaya, by Dr. V.A. Dole, 1st Chapter Shloka No- 68, 2nd edition, Varanasi, Chaukhambha Sanskrit Series Office, 2008, Page No-17.

लोकसंख्येचा भस्मासुर : एक समस्या

प्रा. बाबुराव होनाजी राठोड

समाजशास्त्र

उच्च माध्यमिक आश्रम शाळा, चव्हाण वाडी ता.मुखेड जि. नांदेड

प्रस्तावना:

सध्याच्या जागतिक लोकसंख्येत विकसनशील देशांची लोकसंख्या साधारणतः 80 टक्के आहे आणि ती 2050 पर्यंत 88 टक्के होण्याची शक्यता आहे. विकसनशील देशांचा लोकसंख्या वाढीचा वेग 1.5 टक्के आहे, तर विकसित देशांचा फक्त 0.5 टक्के आहे. विकसनशील देशांच्या लोकसंख्येच्या जडणघडणीत भारताचा मोठा वाटा आहे.

जगाच्या लोकसंख्येने आता पर्यंत सात शेकोटींचा टप्पा ओलांडला आहे आणि ती सन 2050 पर्यंत जवळजवळ 900 कोटीं पर्यंत जाऊन ठेपणार आहे. जगाच्या लोकसंख्या वाढीचा आधीचा वेग अतिशय कमी होता, म्हणजे सन 1804 मध्ये जगाची लोकसंख्या शंभर कोटी होती, ती 200 कोटी होण्यास 123 वर्षांचा कालावधी जावा लागला. त्यानंतर 200 कोटी लोकसंख्येचे 300 कोटी होण्यास फक्त 33 वर्षे लागली आणि त्यानंतर 300 कोटींची 400 कोटी लोकसंख्या फक्त 14 वर्षांत झाली.सध्याच्या वेगानुसार, सन 2028 मध्ये ती 800 कोटी झालेली असेल. मधल्या काळात अधिक असणारा वेग आता मंदावतो आहे, तरी ही हळूहळू वाढत जाऊन सर्वसाधारण पणे सन 2200 पर्यंत जागतिक लोकसंख्या एक हजार कोटींवर जाऊन स्थिरावेल, असा अंदाज आहे.

सध्याच्या जागतिक लोकसंख्येत विकसनशील देशांची लोकसंख्या साधारणतः 80 टक्के आहे आणि ती सन 2050 पर्यंत 88 टक्के होण्याची शक्यता आहे. विकसनशील देशांचा लोकसंख्या वाढीचा वेग 1.5 टक्के आहे, तर विकसित देशांचा फक्त 0.5 टक्के आहे. विकसनशील देशांच्या लोकसंख्येच्या जडणघडणीत भारताचा मोठा वाटा आहे.

लोकसंख्येच्या दृष्टीने भारत जगात सध्या दुसऱ्या क्रमांकावर आहे. पहिला क्रमांक अर्थातच चीनचा आहे. सध्याच्या भारतीय लोकसंख्या वाढीचे प्रमाण लक्षात घेता सन 2025 पर्यंत भारत चीनला मागे टाकून प्रथम क्रमांकावर येऊ शकेल. सध्याच्या जागतिक लोकसंख्येत भारताचा वाटा 17 टक्के आहे; परंतु जगाच्या भूभागांपैकी फक्त 2.4 टक्के भूभाग भारताने व्यापला आहे. दरवर्षी भारतीय लोकसंख्येत सुमारे 1.8 कोटींची भरपडते. या वेगाने सन 2050 पर्यंत भारतीय लोकसंख्या 153 कोटींवर पोहोचेल आणि तेव्हाचीनची लोकसंख्या 139 कोटी होईल.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) भारताच्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाचा अभ्यास करणे.

२) भारताची लोकसंख्या व लोकसंख्या वाढीच्या दराचा अभ्यास करणे

३) भारताच्या शहरी लोकसंख्या घनतेचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके:

१) भारताच्या लोकसंख्येमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

२) भारताच्या शहरी लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होत आहे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे त्यामध्ये संदर्भग्रंथ मासिक लेख व संकेत स्थळ शासकीय प्रकाशने याचा वापर करण्यात आलेला आहे.

भारताचे राष्ट्रीय लोकसंख्या धोरण :

१९३८ साली राष्ट्रीय नियोजन समितीच्या हाता खाली एक लोकसंख्या विषयक उप समितीने मण्यात आली होती. त्यास मितीने १९४० साली राज्याने कुटुंब नियोजन व कल्याणकारी धोरणे यावर भर द्यावा, असा ठराव केला होता. कुटुंब नियोजनावर भर देणारा राष्ट्रीय कार्यक्रम चालू करणारा १९५२ मध्ये भारत हा जगातला पहिला देश होता. खर्चाचा १०० टक्के वाटा केंद्र सरकार उचलत असे. १९६६ मध्ये आरोग्य मंत्रालया खाली कुटुंबनियोजन विभाग स्थापन करण्यात आला. आरोग्य मंत्रालयाचे नाव बदलून आरोग्य व कुटुंबनियोजन मंत्रालय असे ठेवण्यात आले. कॅबिनेट समिती उभारण्यात आली. जिचे प्रमुख सुरुवातीला पंतप्रधान व नंतर वित्तमंत्री होते.

१९७६ चे धोरण

१९७६ मध्ये आणी बाणीच्या काळात राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाची घोषणा करण्यात आली. या धोरणाने कुटुंब नियोजनाचा कुटुंबकल्याण असा विस्तार केला. त्यानुसार १. सरकारने विधेयक आणून लग्नाचे वय वाढवण्याचे निश्चित केले (मुलींसाठी१८ तर मुलांसाठी २१) २. राज्यांमधील महिला शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे सरकारने ठरवले. ३. कुंटुब नियोजन करणाऱ्या गरीब कुटुंबांना पैशाच्या स्वरूपात मोबदला देण्याचे ठरले.

२००० चे धोरण

इ. स. २०००एन. डी. ए. सरकारने राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २०००ची घोषणा केली. त्याच बरोबर तेव्हाचे पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या अध्यक्षते खाली राष्ट्रीय लोकसंख्या आयोगाची स्थापना करण्यात आली. या धोरणाने ही खात्री देण्यात आली की सरकार कुटुंब नियोजन ऐच्छिक व माहिती पूर्ण निवडी वर आधारित ठेवेल. आरोग्य सेवा देताना प्रत्येक वेळी नागरिकांची संमती घेतली जाईल व कोणती ही लक्ष्ये असलेला कार्यक्रम देशावर लादला जाणार नाही. अशा प्रकारे या धोरणाने १९७६ च्या धोरणामुळे जो संशय निर्माण झाला होता त्यावर मात करायचा प्रयत्न केला. या धोरणाने पुढच दशकासाठी (२०१० पर्यंत) उद्दिष्टे व अगक्रम ठरवण्यावर भर दिला.

तक्ता क्र. 1

भारताची लोकसंख्या आणि लोकसंख्या वाढीचा दर, 1901 - 2011

वर्ष	लोकसंख्या (दशलक्ष)	वार्षिक वाढीचा दर	% दशकातील वाढीचा दर

1901	238.4	-	-
1911	252.1	0.56	5.8
1921	251.3	- 0.03	0.3
1931	279.0	1.04	11.0
1941	318.7	1.33	14.2
1951	361.1	1.25	13.3
1961	439.2	1.96	21.6
1971	548.1	2.20	24.8
1981	683.3	2.22	24.7
1991	843.3	2.14	23.9
2001	1027.0	1.93	21.5
2011	1210.2	1.64	17.6

आलेख 1 वरून स्पष्ट होणारी गोष्ट म्हणजे लोकसंख्या वाढत असली, तरी लोकसंख्या वाढीचा वेग निश्चितपणे कमी झालेला आहे.जो वेग 1971-1981 च्या दरम्यान होता, तो 2001 - 2011 मध्ये महत्त्वपूर्णरीत्या खाली आला आहे. भारतीय लोकसंख्येच्या इतिहासात 1911-1921 याकाळात फक्त एकदाच लोकसंख्या कमी झाली होती. वाढीचा वेग ऋण झाला होता. पहिले जागतिक महायुद्ध तसेच प्लेगच्या साथीत सुमारे 30 लाख मृत्यू झाले होते. या शिवाय 1918 मध्ये आलेल्या एन्फ्ल्यूएंझाच्या साथीत 1.2 ते 1.3 कोटी लोकांना प्राण गमवावा लागला होता.

लोकसंख्या दुप्पट होण्याचा जो वेग आहे, त्यावरून लोकसंख्या किती जलदगतीने वाढते आहे, याचा अंदाज बांधता येतो. सन 1901 मध्ये असणारी 23.8 कोटी लोकसंख्या दुप्पट होण्यासाठी साठ वर्षांचा कालावधी जावा लागला, त्यानंतर मात्र 30 वर्षांतच लोकसंख्या दुप्पट झाली. हा काळ अत्यंत जलद लोकसंख्या वाढीचा होता आणि तेव्हाच लोकसंख्या हा एका दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आणि थोडासा काळजीचा मुद्दा म्हणूनही पुढे आला.

मागील दोन दशकांत लोकसंख्या वाढीचा वेग मंदावला असला, तरी आणखी काही काळापर्यंत लोकसंख्या वाढत राहणार आहे. याचे मुख्य कारण म्हणजे आधीची मुळातच जास्त असणारी लोकसंख्या आणि लोकसंख्येचे वयानुसार वर्गीकरण. भारतीय लोकसंख्येच्या एक तृतीयांश व्यक्ती 18 वर्षां खालील आहेत, तसेच 50 कोटींहून अधिक व्यक्तींनी अद्याप वयाची 25 वर्षे पूर्ण केलेली नाहीत. सुमारे 51 टक्के लोकसंख्या जननक्षम वयोगटातील असून, दरवर्षी लाखो व्यक्ती यागटात समाविष्ट होत आहेत आणि ही गोष्ट लोकसंख्या वाढीशी निगडित आहे.

लोकसंख्या वाढ रोखायची असेल, तर मृत्यूदर तसेच जन्मदर कमी होणे गरजेचे आहे. त्यासाठी लोकांचे आरोग्य उत्तम राखण्याची म्हणजेच रोग प्रतिकारक शक्ती वाढविण्याची आवश्यकता आहे. भारतात मृत्यूदर तसा खाली येऊन स्थिरावला आहे; परंतु जन्मदर अजून ही पुरेसा खाली आलेला नाही. जन्मदर कमी

न होण्या मागे प्रामुख्याने कुटुंब नियोजन न करणे, कुटुंबनियोजन करण्याची इच्छा असूनही कुटुंब नियोजन साधने न मिळणे, मोठ्या कुटुंबाच्या अभिलाशेतून अधिक मुले जन्माला घालणे अशा अनेक बाबी कारणीभूत आहेत. सध्याच्या आकडेवारी नुसार, भारतात दरवर्षी 2.6 कोटी बालके जन्माला येतात. सुमारे 18.8 कोटी व्यक्तींना कुटुंब नियोजन साधने मिळण्याची गरज आहे. कुटुंब नियोजनसाधने वापरणाऱ्या जोडप्यांचे प्रमाण केवळ 55 टक्के आहे. ज्यांना आवश्यक आहे, अशा सर्वांपर्यंत कुटुंब नियोजनाची साधने पोहोचली, तर जन्मदर निश्चितच खाली येईल.

प्रत्येक स्त्रीने सध्या प्रचलित परिस्थिती नुसार मुलांना जन्म दिले, तर येणारा एकूण जननदर म्हणजेच जननक्षम वयातील प्रत्येक स्त्रीला होणाऱ्या सरासरी मुलांची संख्या. भारतातील सध्याचा एकूण जननदर 2.5 मुले इतका आहे. लोकसंख्या स्थिरतेसाठी हा आकडा 2.1 पर्यंत खाली येण्याची आवश्यकता आहे.

शहरी करण व घनता:

लोकसंख्येच्या शहरी करणाचे प्रमाण हा विकासाचा एक निर्देशांक आहे. वाढते शहरीकरण म्हणजे समाजाचे परंपरागत स्वरूप पालटून आधुनिकीकरण होणे. आधुनिक जगातील आर्थिक व्यवहार मुख्यतः शहरात पार पडतात, तसेच उत्पादनातील किंवा प्राप्तीमधील वाढ शहरी पार्श्वभूमीवरच अधिक प्रमाणात दिसून येते. आर्थिक वाढ शहरीकरणाला चालना देते आणि शहरीकरणामुळे आर्थिक वाढ होते. हा परस्पर पूरक संबंध असल्यामुळे शहरी करणाविषयी माहिती महत्त्वाची आहे.

तक्ताक्र. 2

शहरी लोकसंख्या आणि लोकसंख्येची घनता, 1951-2011

वर्ष	% शहरी लोकसंख्या	**लोकसंख्येची घनता**
1951	17.3	117
1961	18.0	142
1971	19.9	177
1981	23.3	216
1991	25.7	274
2001	27.8	325
2011	31.2	382

स्वातंत्र्यानंतर म्हणजे 1951 पासून 2011 पर्यंत शहरीकरणात बरीच वाढ झाली. 1951 मध्ये 17 टक्के पासून सातत्याने वाढणारी शहरी लोकसंख्या 2011 मध्ये 31 टक्क्यांच्यावर जाऊन पोहोचली. शहरी लोकसंख्या वाढीचा दर (31.8 टक्के) एकूण लोकसंख्या वाढीच्या दरा पेक्षा (17.6 टक्के) बराच जास्त आहे. ग्रामीण लोकसंख्या वाढीचा दर कमी म्हणजे 12.2 टक्के आहे. याचा अर्थ शहरी लोकसंख्या वाढत आहे आणि

अधिक वेगाने वाढते आहे. आधी अस्तित्त्वात असणारी शहरे वाढतच आहेत; परंतु आणखी नवीन शहरे ही उदयाला येत आहेत. या सर्वांचा अर्थ असा की, ग्रामीण भागातून शहरात होणारे स्थलांतर वाढते आहे.

लोकसंख्येची घनता, विशिष्ट ठिकाणी होणारे लोकसंख्येचे एकत्रीकरण दर्शविते. एका चौ. कि. मी. मध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या म्हणजे घनता. लोकसंख्या वाढी बरोबरच घनताही वाढलेली आहे. स्वातंत्र्या नंतर लोकसंख्येची घनता 117 पासून 382 पर्यंत वाढली; परंतु ती देशात सर्वत्र सारखी नाही. काही ठिकाणी विरळ तर काही ठिकाणी दाट वस्ती असल्याचे निदर्शनास येतेच. मुंबई सारख्या दाट लोकवस्तीच्या काही भागातील घनता 2011 च्या जनगणने नुसार 20 हजार 482 इतकी जास्त सुद्धा आहे.

निष्कर्ष:

१) भारताच्या लोकसंख्येत सातत्याने वाढ होत गेली आहे म्हणजेच १९०१ एक ला भारताची लोकसंख्या २३८.४ दशलक्ष होती त्यात वाढ होत जाऊन २०११ ला १२१०.२ दसलक्ष झाली आहे.

२) भारताच्या लोकसंख्यामध्ये १९८१ दशकीय लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात घट होत आहे.

३) भारताच्या शहरी लोकसंख्या वाढीचे प्रमाणात वाढ होत आहे म्हणजेच १९५१ ला एकूण लोकसंख्येत १७.३% लोकसंख्या ही शहरी भागात होती तर त्यात वाढ होत जाऊन २०११ ला ३१.२% प्रमाण झाल्याचे दिसून येते म्हणजेच यात सातत्याने वाढ होत गेल्याचे दिसून येते.

शिफारसी:

१) सरकारकडून राबविण्यात येणारे लोकसंख्या विषयक धोरणाची प्रभावी पणे अंमलबजावणी करणे.

२) उच्च शिक्षणाच्या प्रमाणात वाढ करणे

३) महिलांच्या व पुरुषांच्या लग्न वयामध्ये वाढ करणे.

संदर्भ :

१ Agarwal S.S. (1985) - 'India's Population Problem' – Tata McGraw Hill Publication, Bombay

२ A.K. P.C. Swain (2008) – 'Population Studies' – Kalyani Publications, Ludhiana.

३.Dr. D.D.Kachole (2001) – 'Demography' – Kailasha Publication, Aurangabad.

४.भारतीय लोकसंख्या: एक दृष्टिक्षेप, डॉ. अंजली राडकर, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स पुणे, vikaspedia.in.

५. राष्ट्रीय लोकसंख्या धोरण, भूषण देशमुख, महाराष्ट्र टाईम, १० फेब्रुवारी २०१६.

५.भारताचा जनगणना अहवाल१९५१ ते २०११.

भारतातील पारंपारिक खेळ कबड्डी आणि खो–खो यांचा अभ्यास

प्रा. दिपक तोताराम सुर्यवंशी

संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, खापर ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार

प्रस्तावना :

पारंपरिक खेळाला संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक संघटनांच्या मान्यतानुसार शिर्षका पासून असे स्पष्ट होते की, स्पर्धा न करणारी वडीलोपार्जित मिळकत म्हणजे पारंपारिक खेळ होय. मुख्यत: हे खेळ हालचाल असून ते आपल्या परंपरेशी जवळीक साधले त्यात प्रामुख्याने नृत्य, गोळाफेक व पाण्याचा खेळ आहे. पारंपारिक खेळाबाबत महत्वाचे म्हणजे आपल्या इतिहासाचा महत्वपूर्ण भाग असून विविध सांस्कृतिक विभिन्नतेतून पुढची दिशा समजते. पारंपरिक खेळ इतिहासाचे दर्शन घडविते व काळाची कालावधी फरक व तफावत दाखवते. बहुतांश हे खेळ स्थानिक व विभागीय पातळीवर खेळले जात असून त्याचे मुळ गुणधर्मांना जागतिक क्रिडा संस्कृतिशी जवळीक व मान्यता काळाची गरज आहे. भाषा, संगीत, साहित्य व शिल्पशास्त्र यांच्या व्यतिरिक्त पारंपारिक खेळांना समुदाय व जागतिक पातळीवर विभिन्नतेचा आनंद घेण्याची भरपूर संधी पारंपारिक खेळ एक विशेष प्रकारची संधी देते जे मुख्य धारातले खेळ देत नाही त्या खेळांचा प्रमुख आधार स्पर्धा नसून मौज व आनंद असून क्रिडा व शारीरिक हालचाली पेक्षा मोठी साखळी निर्माण करण्यास मदत करते. क्रिडा सहभाग व सरावात सुरक्षित हमी देते व त्यामुळे सामुदायिक आंतर क्रियाच्या सदगुणांचा फायदा होतो.

अर्थ :

पारंपारिक खेळ म्हणजे बऱ्या वर्षापासुन समाजामध्ये खेळलेल्या क्रिडा ह्या क्रिडामुळे सहभागाची मिळविलेली संधीचा अंतर्गत समाजामध्ये अनन्यसाधारण महत्व असते.

वैशिष्ट्ये :

१. विशेष प्रकारची कौशल्याची गरज नसते.
२. कल्पनाशक्ती व सर्जनशीलता विकसित करण्यास मदत करते.
३. विभागीय बदल समजण्यास सोपे जाते.
४. अपारंपारिक वस्तुचा उपयोग होतो.

फायदे :

१. आपल्या संस्कृतीच्या पायाची आठवण होते.
२. पारंपारिक खेळ भाषा, संस्कृती, जमीन व उगम यांच्याशी जोडले जाते.
३. मात्र भाषा विकसित करण्यास मदत होते.
४. सामाजिक बंधन मजबूत होते.

महत्व :

पारंपारिक खेळ लहान व मोठे सामाजिक समूह, समुदाय, राज्य व देशाच्या विविध सांस्कृतिक परस्पर सामंजस्य व शांततापूर्ण हालचाली निर्माण करण्यास हातभार लावते. ह्या खेळाची अर्थपूर्ण ओळख असून पारंपारिक खेळाच्या महत्वाला मजबूत करण्यासाठी समाजाच्या प्रत्येक घटकाला विशेषत: युवा व कमकुवत वर्गाला ह्या खेळात सहभाग व सरावाची भरपूर संधी दिली पाहिजे. पारंपारिक खेळांना आपली स्वत:ची ओळख, प्रमाण व

नियमावली असून त्यांना जागतिक प्रमाणांची आवश्यकता नाही. ह्या खेळांच्या पुढील सहभाग व सरावावर भर दिला पाहिजे. सांस्कृतिक वारस्यावर परिणाम न होण्यासाठी ह्या खेळांना व्यापारिक व्यवसायापून सुरक्षित ठेवले पाहिजे पारंपारिक खेळात कमी खर्च, अल्प सुविधा व साहित्यांचा उपयोग होत असुन त्यांना सर्वसाधारणत: जगात व प्रामुख्याने तिथे साधनांची विशेष कमतरता आहे तिथे प्रोत्साहन दिले पाहिजे.

पारंपारिक खेळ कबड्डी व खो खो

कबड्डी :

या खेळाचा उगम महाराष्ट्रामध्येच झाला आहे. हा खेळ सुरवातीला शिवाजी महाराजांच्या काळातील होय. या खेळामागचा उद्देश हाच होता की, आपल्या राज्यातील प्रत्येक व्यक्ती काटक, चपळ आणि सुदृढ व्हावी त्यामुळे आपल्या राज्याचे संरक्षण करण्यासाठी तो कधीही उभी राहु शकेल. तसेच महाराष्ट्रातील बऱ्याच गावात हा खेळ खेळला जात असे. पहेलवान मंडळी स्तत:च्या अंगी असलेली रग जिरविण्यासाठी हा खेळ खेळत असत. पण त्याकाळी मैदानाची लांबी रूंदी ठरलेली नसे. फक्त मध्यरेषा तेवढी असे. प्रारंभी कबड्डीचे स्वरूप म्हणजे काहीही न उच्चारता प्रतिस्पर्ध्याच्या अंगणात जाऊन आपल्या क्षेत्रात यायचे जर गडी पकडला गेला तर त्याच्या छातीवर बचाव करणारे खेळाडू तो चीत म्हणे पर्यंत बसून राहायचा. हा खेळ प्रामुख्याने महाराष्ट्रातच खेळला जात असे. खेळाचे खास असे सामने होत असत.

काही सणांच्या दिवशी होळी, दसरा, पोळा, पंचमी निमित्ताने हा खेळ खेळला जात असे. निरनिराळे संघ येत असत. आखाड्यात वस्तादापेक्षा वेगळे पंच नसत. म्हणजेच साधनांशिवाय, खर्च न करता भरपूर असा एक व्यायाम प्रकार असे कबड्डीचे स्वरूप असे. अगोदरच्या काळात कोणताही शब्द न टाकता मुका कबड्डी हा खेळ खेळला जात होता. पिढ्या न पिढ्या ह्या खेळात विकास झालेला नव्हता. पण उशिर का होईना या खेळाचा विकास होण्यास सुरूवात झाली. प्रथम मुक्का कबड्डी बोलका झाला दर घालताना सुरकृसुर राज राम–लक्ष्मण जानकी जय बोलो हनुमानकी, सुर सपाटा मार झपाटा याच गळ्याचा कंठण काटा समुहात माजवान किल्ला शिवाजी आत कसा शिरला इत्यादी शब्द वापरू लागले. त्यामुळे श्वास घेण्याची व सोडण्याची सुरवात झाली. या शब्द उच्चाराने फुफ्फुसांना व्यायाम होत असे. असा बराच काळ लोटल्यानंतर १८ व्या शतकाच्या आसपास इंग्रजांचे हिंदूस्थानावर राज्य चालू झाल्यावर भारतीय लोकांत खेळाची प्रवृत्ती वाढीस लागली. कबड्डी हा खेळ मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात नियमबध्द रीतीने प्रथम पुणे, सातारा इथे चालू झाला. साताऱ्याचे यशवंत पाठक, शाम वैद्य पुण्याचे श्री का. के. बेंद्र, सदुभाऊ गोडबोले यांनी काही नियमांवरून सामने करण्यास इ.स. १९२० मध्ये सुरवात केली. काळाचय ओघात कबड्डी खेळण्याच्या पध्दती बदलत गेल्या.

कबड्डी खेळामध्ये हाताने गडी बाद करणे हे कौशल्याचा अधीक प्रमाणात वापरण्यात येते आहे. सद्यस्थितीमध्ये कबड्डी खेळामधून पाठलाग हे कौशल्य लुप्त होत आहे. तसेच साखळी मारणे हे कौशल्य क्षेत्ररक्षणातील प्रमुख कौशल्य आहे. कोणत्याही जागेवरून ते सहजपणे मारता येते. त्यामुळे क्षेत्ररक्षक या कौशल्यास प्राधान्य देतात. अशा प्रकारे आपणास असे सांगता येईल की, कबड्डी हा भारतातील पारंपारिक खेळातील अत्यंत महत्वाचा खेळ आहे. ज्यातुन खेळाडूचा शारीरिक व मानसिक विकास घडवून येतो. खो–खो :

खो–खो हा खेळ भारतीय पारंपारिक खेळांपैकी सर्वात वेगवान खेळ असून महाराष्ट्राच्या भूमितच या खेळाची सुरवात झाली. खो–खो हा खेळ भारतीय संस्कृतिचा अविष्कार व अनमोल ठेव आहे. याबद्दल शंका नसून महाभारताच्या काळापासून खो–खो या खेळाचे अस्तित्व जागवते पण हा खेळ त्या वेळी वेगळ्या स्वरूपात

होता. महाभारताच्या काळात युध्द सामोरासामोर चालत असे रथावर चढून सैन्य विरोधी पक्षाशी मुकाबला करीत असे. बचावासाठी म्हणून त्यांची एक योजना असे रथ चालवणारे आपले रथ रणभूमीवर नागमोडी स्वरूपात चालवत. त्यावेळी 'यशोद' नावाचा खेळही अशाच स्वरूपात खेळला जात असे. तसेच संत तुकारामांच्या वाडमयातही खो–खो खेळाशी पुरक आसणाऱ्या खेळाचा उल्लेख आढळतो. व्युत्पत्तीशास्त्राच्या ग्रंथात 'स्यू' ला संस्कृत क्रियापदापासून 'खो' ची व्युत्पत्ती मिळते. १७ व्या शतकापासून आस्थापास्था, खो–खो या खेळांना समाजाची मान्यता मिळालेली दिसते. मराठी भाषेतील वाक्यप्रचारातही खो देणे, खो बसणे, कोंडी करणे, कोंडी फोडणे, आक्रमण करणे हे या खेळातील शब्द रूढ झालेले दिसतात. आजही या वाक्यप्रचारांचा उपयोग केला जातो. याचा अर्थ या संकल्पनांवरून हा खेळ प्राचीन काळापासून खेळला जात असावा. 'खो' चा उच्चार हा महाप्राणेच्चार असल्याने योगशास्त्राशी निगडीत असणे असंभवनीय नाही.

खो–खो चे पूर्वीचे स्वरूप धावने व पाठलाग करणे (Run and chose) या दोन क्रियांवर आधारित होते. खो–खो पाठलागाचा खेळ आहे. खो–खो हा फक्त पळण्याचा खेळ आहे. अशी मतमतांतरे ऐकवयास मिळतात खो'–खो तसा वेगवान खेळांडूंचा खेळ आहे. जो वेगवान असेल तो प्राविण्य मिळवतोच प्राचीन काळापासून भारतीय संस्कृति शेत प्रधान आहे. खेळातही त्याचे प्रतिबिंब दिसते. खो–खो खेळण्यासाठी पूर्वीच्या काळात फारसे नियम नव्हते. जागेची मर्यादा (मोजमाप), ठराविक खेळ, खेळाडूंची संख्या, दोन खेळाडूंमधील अंतर, दिशा, खुंट, चौकोन या बाबतीत कोणतेच बंधन नसल्यामुळे साधारण लांब व रूंद अशा जागेत खेळण्यास गडी जमत व ते प्रत्येक बाजूस निम्मे वाटून खेळण्यात येत असे. खुटांऐवजी प्रेक्षकांपैकी दोन कच्चे कडी बसवीत. खुंटाला खे द्यावा की नाही याबदल सुध्दा एकमत नसून इतर नियमांप्रमाणे हा नियम खेळांच्या सुरवातीस ठरविण्यात येत असे. हल्लीप्रमाणे खेळास एकदम सुरवात न होता पिटाळणाऱ्या गड्याने दोन्ही खुंटाभोवती पाच अगर सात फेऱ्या घातल्यानंतर खेळास सुरवात होत असे. यावेळी ढोबळ अशा तीन नियमांचे पालन पिटाळणाऱ्या (पाठलाग करणाऱ्या) गड्याकडून होत असे. १. दोन बसलेल्या गड्यांची तोंडे विरूध्द दिशेस असावित. २. खो पाठवरून द्यावा. ३. दोन बसलेल्या गड्याच्या मधून जाऊन खो देता कामा नये.

वास्तविक हा खेळ वेगवेगळ्या ठिकाणी विभिन्न नियमांनी खेळला जात असे. पुढे चालून खुंट म्हणून कच्चा गड्याच्याऐवजी झाडांच्या फांद्या जमीनीत शेवून खेळले जात असावे. व त्याचेच रूपांतर स्तंभामध्ये झाले आहे. खो–खो खेळासाठी लागणारी कमीत कमी साधन सामग्री, छोट्याशा मैदानाची उपलब्धता व खर्चिक नसलेला खेळ व गतिमान खेळ या काही वैशिष्ट्यामुळे हा खेळ काळाप्रमाणे विकसीत होत गेला व लोकप्रिय झाला.

पारंपारिक भारतीय खेळांना लोकप्रीय बनविण्यासाठी इ.स. १९१४ मध्ये महाराष्ट्रातील पुण्याच्या डेक्कन जिमखान्यातर्फी विविध संघाना आमंत्रित करून तिथे सामने भरवले गेले. त्या प्रसंगी सर्वांना लागू होतील अशा काही नियमांची निर्मिती करण्यात आली. या वेळेपासून खो–खो खेळाला थोडेसे व्यवस्थित स्वरूप प्राप्त झाले. इ.स. १९२४ मध्य बडोदे येथील 'हिंदू विजय जिमखाना' द्वारे काही नियमांची निर्मिती व जुन्या नियमामध्य दुरूस्ती करण्यात आली.

कै. माणिकराव जुम्मादादा व्यायामशाळा, बडोदे आणि कै. मुजुमदार आदि व्यक्तींनी या खेळाचा प्रचार केला. इ.स. १९२५ मध्य अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली. १९३५ मध्य या मंडळाने खो–खो च्या नियमांचे पुस्तक प्रकाशित केले. इ. स. १९३६ मध्ये बर्लिन येथे झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत प्रथमच खो–खो या खेळाचे प्रदर्शन आंतरराष्ट्रीय पातळीवर झाले. पुढे १९४९ मध्य स्वीडन तसेच डेन्मार्क येथे

खो–खो खेळाची प्रात्यक्षिके दाखविली. याच वर्षी अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाने पुन्हा नवीन नियमांचे पुस्तक प्रकाशित केले. बऱ्याचशा शाळा, महाविद्यालये तसेच अखिल भारतीय पातळीवर खाजगी मंडळे यांच्याद्वारे सामने भरवले जाऊन या खेळाचा प्रचार व प्रसार होऊ लागला. हा खेळ भारतातील काठेवाड, गुजरात, महाराष्ट्र इत्यादी विभिन्न राज्यांच्या कानाकोपऱ्यातून खेळला जाऊ लागला.

संदर्भ सूची:

१. शिलेदार जुझार सिंबध व विठ्ठलसिंग परिहार, खेळ संचालन व क्रिडा मागदर्शक, अभय प्रकाशन, नांदेड
२. माने एच. ए., शैक्षणिक व शारीरिक शिक्षण संशोधन, विजय प्रकाशन, नांदेड
३. वांगवाड व्यंकटेश आणि तिवारी शंकर, शारीरिक शिक्षण, मापन व मुल्यामापन, अलमंड पब्लिकेशन, पुणे
४. आगलावे प्रदिप, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्याप्रकाशन, नागपूर
५. देशपांडे सुरेश, अहार व्यवस्थापनाचे वाढते महत्त्व, लोकराज्य क्रिडा विशेषांक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
६. पाथ्रीकर विजय, क्रिडा जुगांर (२०१४) आंतरविद्यापीठीय क्रिडा महोत्सव, डॉ. बा. अं. म. विद्यापीठ, औरंगाबाद
७. ग. भा. गोगाटे, शारीरिक शिक्षण तत्वे व स्वरूप, पुणे

आधुनिक काळात महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता

सुरेखा नामदेवराव शिंगणकर

संशोधक विद्यार्थी

प्रस्तावना :

एखाद्या देशाची संस्कृती तेथील रहिवाश्यांच्या हृदयात आणि आत्म्यात बसलेली असते. महात्मा गांधी यांच्या विचारांची प्रासंगिकता आजच्या काळातही टिकून आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात गांधीजींचे योगदान अतुलनीय राहीले आहे. भारतीय जनमानसावर गांधीजीचा फार मोठा प्रभाव होता. आधुनिक भारताच्या इतिहासात गांधीजीनी जो ठसा उमटविला तो अन्य कोनालाही उमटविता आला नाही. भारतीय जनमानसाची नाळ माहीत असणारे तथा जाणणारे ते सर्वोच्च नेता होते. गांधीजी हे विसाव्या शतकातील अजुनही न उकललेले आणि कदाचित कधीही न उलगडले जाणारे गुढ आहे. विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती म्हणून गांधीजी व अल्बर्ट आईनस्टाईन यांच्यापैकी "टाईम" या अमेरीकन साप्ताहीकाने आईन्स्टाईन यांची निवड केली, तेव्हा अल्बर्ट आईनस्टाईन हयात नव्हते, परंतू गांधीजीच्या हत्येनंतर आईनस्टाईन म्हणाले होते. "गांधी नावाची हाडामासाची व्यक्ती या भूतलावावर अस्तित्वात होती यावर नवीन पिढीला विश्वासच बसणार नाही" एका सर्वोच्च वैज्ञानिकाने गांधीजीची महती विषद केली ही बाब अतिशय महत्वाची आहे.

अमेरीकेचे माजी राष्ट्रप्रमुख बराक ओबामा, आफ्रीकेचे माजी राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांनी गांधीजीना आदर्श मानले यातूनच गांधीजीची व्यापकता स्पष्ट होते, आधुनिक जगाच्या इतिहासात गांधीजी हे एक महान विभूती म्हणून ओळखले जातात. ग्रामस्वराज्य असो की ग्रामउदयोग, व्यक्तीगत आचरण असो की राहणीमान पर्यावरण, आरोग्य, सर्वधर्मसमभाव अशा अनेक विषयावर त्यांनी मांडलेली मते आजच्या बदलत्या काळात सुसंगत असल्याचे दिसून येते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण विषयक आंतरराष्ट्रीय परिषदेतही वेळोवेळी गांधी विचाराला महत्व देण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेच निश्चित केलेले "संस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स" चा आधारही गांधी विचारात दडला आहे. एकंदरीतच आजही गांधी विचार काळाची गरज बनला आहे.

उद्देश :

1. महात्मा गांधीजींच्या विचारांचा व स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा अभ्यास करणे.
2. आधुनिक काळात महात्मा गांधीजींच्या विचाराच्या प्रासंगिकतेचे अध्ययन करणे.

गृहितकृत्ये:

1. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच नेतृत्व महात्मा गांधीजीने केले.
2. महात्मा गांधींजींनी विविध क्षेत्रात मुलगामी विचार मांडले
3. महात्मा गांधीजींचे विचार व तत्वे आजही देशाच्या विकासासाठी प्रासंगिक व अत्यावश्यक आहेत.

संशोधन पध्दती:

प्रस्तुत शोधनिबंधासाठी आधुनिक काळात गांधी विचाराची प्रासंगिकता या विषयाची मांडणी करतांना ऐतिहासिक संशोधन, संदर्भ संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला. त्यासाठी दुय्यम संदर्भ ग्रंथाचा आधार घेण्यात आला.

विषयाचे महत्व:

शोध निबंधासाठी प्रस्तुत विषय निवडण्या मागे प्रयोजन असे आहे की, सध्य स्थितीला जागतिक पातळीवर व भारतामध्येही मोठ्या प्रमाणावर अंतर्विरोध दिसतो आहे. यावर गांधी विचार हा रामबाण उपचार आहे. आधुनिक भारताच्या इतिहासावर गांधीजीचा खुप मोठा प्रभाव आहे. आजच्या स्पर्धेच्या जगात मानवी मूल्याचे महत्व कमी होत आहे. दहशतवाद, अत्यंतिक राष्ट्रवाद, भाषावाद, चंगळवाद, जातीयवाद, अशा अनेक वादाच्या जगतात आपण वावरत आहोत. त्यामुळे आजच्या स्फोटक वातावरणामध्ये गांधीवादाची गरज प्रकर्षाने जानवते. गांधीजीच्या विचारामध्ये अंतर्विरोध होते आणि त्यामुळे त्याच्यावर टिकाही होते, परंतू या अण्वस्त्रसज्ज जगात गांधीजीची व गांधीवादाची उपयोगिता अजुनही भासते आहे.

गांधी विचारातील स्त्री-स्वातंत्र्य:

दक्षिण आफ्रिकेतील लढ्यात महिलाच्या निर्भय सहभागाचा मोठा प्रभाव गांधीजीवर पडला. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महिलांच्या सहभागासाठी गांधीजी आग्रही राहीले या चळवळीतूनच सरोजीनी नायडू, विजयालक्ष्मी पंडीत, अवंतिकाबाई गोखले, दुर्गाबाई देशमुख, उषा मेहता, अरुणा असफअली, राजकुमारी अमृतकौर, बीबी अमतुस्सलाम अशा अनेक महिला पुढे आल्या. संविधान सभेतही 15 महिला होत्या. या साऱ्या स्वातंत्र्य चळवळीशी जोडल्या गेलेल्या होत्या.

म. गांधीजीना परंपरेने स्त्रीची रेखाटलेली अबला प्रतिमा मान्य नव्हती. पुरुषाप्रमाणेच त्यांनाही संधी व प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असे त्यांचे मत होते. यामुळेच त्यांनी स्त्रीयांना दास्यांत ठेवणाऱ्या धार्मिक, वैधानिक, राजकीय व्यवस्था, स्त्रियांशी निगडित असलेल्या बालविवाह, हुंडापध्दती, बहुपत्नीत्व, सतीप्रथा, आदी कुप्रथाचा निषेध करुन त्यांचे समुळ उच्चाटन करण्याचे कशोशिने प्रयत्न केले.

गांधीजीनी आंतरजातीय विवाहाची गरज असल्याचे म्हटले होते. आपल्या शिक्षण पध्दतीमध्ये भारतातील समाजव्यवस्थेत स्त्री-पुरुष संबंध कसे असावेत एकंदर समाजामध्ये स्त्रीचे स्थान काय आहे. यांचा विचार केला नाही, असे ते नमुद करतात. आजही महिला सुरक्षा अतिशय ज्वलंत प्रश्न बनला आहे. फाळणीच्या पार्श्वभूमीवर स्त्रियांवर झालेल्या अत्याचारा सबंधी गांधीजी म्हणाले, "सध्याच्या जातीय हलकल्लोळात स्त्री समाजाला ज्या यातना सोसाव्या लागत आहेत त्यामुळे माझे अंत:करण पिळवटून जाते. पण तुम्हाला सोसाव्या लागणाऱ्या अत्याचाराच्या दोषारोपापासून तुम्हीही मुक्त नाही. माता, पत्नी, भगिनी म्हणून तुम्ही आपल्या पुरुष मंडळीवर दडपण टाकले असते तर जी लाजीरवाणी कृत्य घडली ती टळणे शक्य होते. गांधीजीचे हे सर्व विचार आणि संवाद ऐकताना गांधीजी जणू आजच्याच काळातील स्त्रियांच्या समस्याबद्दल बोलत आहेत असे जाणवत राहते.

म. गांधीची आंदोलने व सध्यास्थिती:

लोकशाही देशामध्ये विरोधी विचाराचा सुद्धा सन्मान करणे आवश्यक असते. महात्मा गांधीजी हे एक महान मानवता आणि विश्वबंधुत्व यांचा संदेश देणारे सत्याचे पूजारी होते. अहिंसात्मक प्रतिकाराचा मार्ग स्विकारुन त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढा लढला. सत्य, अहिंसा, सत्याग्रह, असहकार, सविनय कायदेभंग, उपोषण, हरताळ, बहिष्कार, धरणे असे अनेक शांततापूर्ण आंदोलनाचे प्रयोग गांधीजींनी केले. गांधीजीनी सत्याग्रह हे नवे तंत्र केवळ भारतालाच नव्हे तर जगाला दिले आहे. अन्यायी अत्याचारी व जुलमी सत्तेला

विरोध करण्याचा हा अहिंसात्मक मार्ग म्हणजे एक अभिनव कल्पना होय. हिंसे शिवाय, शस्त्राशिवाय लढाई जिंकता येते हे त्यांनी जगाला दाखवून दिले. असहकार, सविनय कायदेभंग, या मार्गानी गांधीजी ब्रिटीश सत्तेशी सतत संघर्ष करुन स्वातंत्र्य प्राप्त केले. मार्टीन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला यांनी महात्मा गांधीजीच्या सत्याग्रहाचा मार्ग स्विकारला होता, यावरुन त्यांचे महत्व लक्षात येते.

आज आपण वेगळी परिस्थिती अनुभवत आहोत. लोकशाहीमध्ये विरोधी आवाज ऐकणे आवश्यक असते. सध्यास्थितिमध्ये CAA, NRC च्या विरोधात जी आंदोलनने झाली ती हिंसक स्वरुपाची होती, त्यात अनेकाचे बळी गेले व करोडो रुपयांचे सार्वजनिक संपत्तीचे नुकसान झाले आहे. हे गांधीजीच्याच देशात घडावे ही अतिशय वाईट आणि क्लेशदायक बाब आहे. म्हणून गांधीविचार व तत्वाची गरज आज प्रकर्षाने जाणवत आहे. गांधीजीचे सत्याग्रही आणि स्वंयसेवक अत्यंत संयमाने सरकारच्या अमानुश अत्याचारांना तोंड देत होते. धारासना सत्याग्रहाच्या संदर्भात "न्यू सीफेन" या वृत्तपत्राच्या वार्ताहर वेब मिलर लिहतो की "स्वंयसेवकाची शिस्त अदभूत होती. गांधीजीच्या अहिंसा धर्माला त्यांनी जणू काही घोळून पिऊन टाकले आहे असे वाटत होते. यावरुन गांधीजीच्या आंदोलनातील शिस्त, संयम, अहिंसा प्रतिबिंबित होते.

आज NRC व CAA च्या नावाखाली देशविरोधी घोषणा दिल्या जातात. देश तोडण्याची भाषा केली जाते. हे अतिशय भयंकर आहे. गांधीजीच्या अहिंसक व तत्वनिष्ठ आंदोलनाची गरज आज आवश्यक आहे.

धार्मिक झुंडशाहीला गांधीवाद हेच उत्तर:

भारत हा अनेक विचारधारा, पध्दती, परंपरा, असलेला देश आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही असलेल्या देशात वेगवेगळ्या विचारतत्वाचे शांततेच्या मार्गाने स्वागत केले जाते. परंतु अलिकडच्या काळात धार्मिक झुंडशाही वाढलेली दिसते.

भारत विविधतेने नटलेला देश आहे. धर्म, पंथ, भाषा, परंपरा यांची विविधता आढळते. म. गांधीजी म्हणत असत स्वराज्यासाठी विविध धर्म व जातीतील व्यक्तीमध्ये ऐक्यभावना असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी रचनात्मक कार्यक्रमात "जातीय ऐक्याला प्रथम स्थान दिले. कोणत्याही देशात राजकीय ऐक्य बाहेरुन लादून निर्माण होत नाही. त्यासाठी वेगवेगळ्या धर्म व जातीमध्ये प्रेमभावना व आस्था निर्माण करावी लागते. गांधीजी म्हणत असत. "एक उद्देश, एक ध्येय आणि समान सुख-दु:खामध्ये हिंदू-मुस्लीम ऐक्य सामावलेले आहे. ऐकमेकांच्या सुख, दु:खात सहभागी होवून परस्पर सहकार्य व सहिष्णुतेने आपण आपले ईप्सित साध्य करु" या वरुन गांधीजीना देशाप्रती असलेली तळमळ जाणवते त्यांना हिंदूराष्ट्राची कल्पनाही मान्य नव्हती तसेच जीनाचा द्विराष्ट्रवाद सिध्दांतही मान्य नव्हता. ते म्हण्त असत प्रत्येकाने आपल्या धर्मातील सर्वश्रेष्ठ तत्वे आचरणात आणावीत आणि दुसरे धर्म व त्यांचे अनुयायी यांच्याविषयी सद्भभाव बाळगावा जातीय तणाव सोडविण्याची हीच गुरुकिल्ली आहे.

आजच्या स्थितीमध्येही धार्मिक झुंडशाही, टोकाचा अत्यंतिक धर्माभिमान पाहायला मिळतो. अलिकडेच CAA, NRC च्या विरोधात झालेली हिंसक आंदोलने आणि दिल्लीत झालेल्या दंगली हे धार्मिक झुंडशाहीचेच उदाहरण आहे. त्यात पन्नास पेक्षा जास्त लोकांचा बळी गेला. शेकडो कोटीचे नुकसान झाले. त्याला प्रक्षोभक भाषणे बऱ्याच अंशी कारणीभूत ठरली. त्यामुळे आजच्या स्थितीमध्ये गांधीवाद विचारधारा तितकीच उपयोगी आहे. धार्मिक झुंडशाहीला गांधीवाद हेच उत्तर आहे. भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाला गांधीवादाचेच अनुकरण करणे रास्त ठरेल.

सध्यस्थितीत गांधी विचाराधी गरज:

गांधीजीनी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले. त्यांच्या स्वराज्याच्या पूर्वअटीमध्ये हिंदू-मुस्लीम ऐक्य, स्वदेशी आणि अस्पृश्यता निवारण या तीन गोष्टीचा समावेश केला होता. काहीही साध्य करण्यासाठी अहिंसा ही गांधीजीची पूर्व अट होती आणि अहिंसेच्या रक्षणासाठी गांधीजी जगले आणि हुतात्म्य पत्कारले. आज गांधीचे सगुणरुप सर्वव्यापी आहे. पण त्यांच्या आत्म्यावर म्हणजे विचारावर सतत हल्ले होत आहेत. सर्वधर्म समभावाच्या जागी "बळी तो कान पिळी" हे चित्र आहे. गांधीजीच्या हिंदू वैष्णवजन परंपरेची मोडतोड करुन हिंसेचा मार्ग अवलंबला जात आहे. गरीबांचे अश्रु पुसण्याऐवजी राजसत्ता म्हणजे लक्ष्मीची पुजा करणे असा संकुचित अर्थ उरला आहे. गांधीजीची छबी नोटावर आहे. प्रत्येक सरकारी कार्यालयात फोटो आहे. परंतु तेथेच खुलेआम गैरव्यवहार होत असतात. गांधीजीचा चष्मा आता स्वच्छता अभियानाची शोभा वाढवित आहे. भारतात अद्‌याप कमालीच्या आर्थिक विषमतांच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक सोयी-सुविधांवर देखील दुर्देवाने आधी सधन, श्रीमंताचा हक्क राहतो आणि म्हणूनच रोज सकाळी शहरातील श्रीमंत वसाहतीतील कचरा नेमाने साफ होतो. स्वराज्याच्या जागी आता घराणेशाही व एकाधिकारशाही वाढत आहे.

आज गांधी विचार वाचविण्यासाठी धार्मिकता व कट्‌टरता यांच्या जागी सर्वधर्म समभावाची परंपरा जोपासावी लागेल. सत्तेचे केंद्रीकरण सोडून ग्रामसभाना अधिकार देण्याची तयारी ठेवावी लागेल. विकासाची समतोल प्रारुपे शोधावी लागतील व पर्यावरणाचे संतुलनही जपावे लागेल. गांधीजीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी गरीबांसाठी प्रामाणिकपणे काम करावे लागेल. हा विविधतेने नटलेल्या सुंदर देश अधिक सुंदर व बलशाली बनवण्यासाठी सर्वांनी एकत्र येवून देशासाठी व उज्ज्वल भविष्यासाठी काम करावे लागेल.

निष्कर्ष :

आधुनिक जगाच्या इतिहासातील गांधीजीनी अढळ असे स्थान मिळवले आहे. अहिंसा आणि सत्य या मूल्यांच्या मार्गाचे अनुकरण करत संघर्षातून यशस्वी झालेल्या गांधीजीनी "आधी केले मग सांगितले" या उक्तीचे अनुकरण केले. आज आंदोलनाच्या नावाखाली सार्वजनिक मालमत्ता मातीमोल केली जाते. गांधीजीना हे कद्‌यापीही मान्य नव्हते. एखाद्‌या देशाला सामाजिक क्रांती करावयाची असेल तर त्यांची सुरुवात महिलांना दिल्या जाणाऱ्या संधीतून व्हावी. गांधीजीनी स्वातंत्र्य लढ्‌यात महिलांना संधी दिली त्यामुळेच गांधीजीची चळवळ घराघरात पोहचली होती. महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता आजच्या काळातही अजुनही टिकून आहे. म. गांधी यांच्या विचारांनी जगभरातील अनेक नेते भारावून गेले. अहिंसा आणि सत्य या मूल्यांच्या मार्गाचे अनुकरण करत संघर्षात यशस्वी झाले. गांधीजीचे विचार आजही प्रेरणादायी आहेत.

संदर्भ सूची :

1. M.K. Gandhi, "My Idea of Living In a village.
2. M.K. Gandhi, Collected Works of Mahatma Gandhi, Vol-9 , New Delhi Publication Division.
3. कुंभार नागोराव : म.गांधीजीचे सामाजिक तत्वज्ञान, अरुणा प्रकाशन, लातूर, 2012
4. भाऊ धर्माधिकारी (संपा.) : गांधीवाद : समाजवाद (एक तुलनात्मक अभ्यास) महाराष्ट्र ग्रंथभांडार, कोल्हापूर, 1949.
5. जाधव एस.जी : भारताचा इतिहास (इ.स. 1850 ते 1950) संस्कृती पुस्तकालय, नांदेड, 2005.
6. दै. लोकसत्ता (8 मार्च 2019) – गांधी विचारातील स्त्री स्वातंत्र्य (रझिया पटेल).
7. दै. लोकसत्ता (4 फेब्रुवारी 2015) – गांधी विचारांना नव्या प्रतिकाची गरज, (योगेंद्र यादव)

सामाजिक समता: क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तौलनिक विचार

संशोधज

श्री. शिवशरज जी. रटज लज र

मु.पो.लज्मी-नज्र, हिंजोली-४३१५१३

भारतभूमी ही संतांची व महापुरूषांची जननी आहे. कोणतेही महापुरूष, कोणत्याही काळात जन्माला आले, तरी त्यांनी अखिल मानवजातीच्या उध्दारासाठी जे महत्कार्य केले ते त्रिकालाबाधीत वंदनिय ठरले.

थोर संत अथवा महापुरूष कोणत्या धर्मात, जातीत किंवा पंथात जन्माला आले यावरून त्यांचे महत्व वाढले नाही तर त्यांनी केलेल्या अतुलनीय कार्यामुळे ते महान ठरले. सामाजिक विषमता, आर्थिक विषमता, जीवन जगण्याच्या मार्गातील अडथळे पाहून महापुरूषांची मने विषन्न झाली, जिन्न झाली, अतीव दु:खाने होरपळली. ही विषमता दूर करण्यासाठीच त्यांनी आजीवन संघर्ष केला, क्रांतीकारी पावले उचलली व अवघ्या विश्वाला जीव-नविषयज -नवी-न दृष्टीज ो-न प्रदा-न जे ला. यामुळेच ते मार्जदर्शज तेजोनिधी म्हजू-न -नाव लौज्ि ज ास पावले. अशा तेजश्वी नररत्नांपैकी मला भावलेल्या क्रांतीसूर्य समतानायक जगज्जोती महात्मा बसवेश्वर व विश्वरत्न बोधिसत्व घट-नेचे शिल्पज ार डॉ.बाबासाहेब आंबेडज रांच्या शैजजिज व सामाजिज विचारांचा परामर्श घेण्याचा सुसंकल्प करून या लेखाव्दारे आपल्याशी सुसंवाद साधण्याचा मानस आहे.

जगज्जोती म.बसवेश्वर व डॉ.बाबासाहेबांची प्रेरणा-

बाराव्या शतज ाच्या पूर्वार्धात म.बसवेश्वरां-नी ज -र्नाटज ातील विजापूर जिल्ह्यातील बाजेवाडी या जावात ज-म घेतला. त्यांच्या ज-माच्या वेळी भारताचे संपूर्ज प्रभुत्व अ-नेज राजवंशांमध्ये वाटले जेले होते. आपसातील कलह व संघर्षामुळे भारत एक कुरूक्षेत्र, युध्दभूमीच बनला होता. धर्माच्या नावावर मानसामानसात, जाती जातीत भेदभाव केला जात होता. स्पृश्य-अस्पृश्य भाव अतिव धारदार झाला होता. कर्मठ, अंधश्रध्दा पसरविणारे पुरोहितशहा विषमतेची बीजे रोपीत होते. त्यामुळे समाजमन पोखरल्या जात होते. वर्जव्यवस्था, उच्चनीचता, आर्थिक दुर्बलता, दैववाद यामुळे निष्क्रीय होऊन नशिबालाच दोष देणाऱ्या मानव जातीला महात्मा बसवेश्वरांनी आपल्या क्रांतीकारी विचारांनी जगण्याचा नवा मार्ग दाखविला. 'कायक वे कैलास' म्हणजे 'कर्महिच ईश्वराची पूजा', 'दासोह' म्हणजे प्रामाणिकपणे आपले नित्यकर्म करावे व अनाठायी संग्रह करज्यापेजा आपल्या ज माईचा ज ाही भाज समाजासाठी, राष्ट्राच्या उन्नतीसाठी वापरला पाहिजे हा मोलाचा संदेश म.बसवेश्वरांनी दिला. आणि स्वत:ला कुचकामी समजणारा, कमनशिबी समजणारा कामगार वर्ग, बारा बलुतेदार वर्ग, कातडी कमावणे, चर्मोद्योग करणे, स्वच्छतेची कामे करणारा अस्पृश्य वर्ग म.बसवेश्वरांच्या 'कायक वे कैलास' या संकल्पनेमुळे नव्या जोमाने कामाला लागला. स्वत:चा चरितार्थ स्वाभिमानाने चालवू लागला. आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळे समाजात सन्मानाचे स्थान मिळवू लागला हे विशेष.

अशाच प्रकारची अस्पृश्यता निवारणाची, दलीतोध्दाराची नवप्रेरणा देणारे, नवचैतन्य प्रदान करणारे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडज र यांचा ज-म एज ोनिसाव्या (१९ व्या) शतज ाच्या शेवटच्या दशज ात मध्यप्रदेशातील, इंदौर जिल्ह्यातील महू या गावी - १४ एप्रिल १८९१ मध्ये झाला. त्यांच्या जन्माच्या वेळीही दलीतांच्या जीवनात पसरलेला अंध:कार एवढा भयानक होता की, त्याचे केवळ स्मरण केले तरी अंगावर

रोमांच उभे राहतात. श्रमिकांना व महिलांना मिळणारी हीनत्वाची वागणूक, अस्पृश्य समजून केली जाणारी उपेक्षा, सामाजिक आणि आर्थिक विषमतेची वागणुक या सर्व बाबींनी बाबासाहेबांना विलक्षण बेचैन केले होते.

स्वत: उच्च शिक्षण घेवून आपल्या ज्ञात अज्ञात समाजबांधवांना अज्ञानाच्या व विषमतेच्या अंध:कारातून प्रकाशाकडे घेवून जाणारे डॉ.बाबासाहेब दीन दलीतांसाठी तेजोनिधी दीपस्तंभच बणले.

बहिष्ृ त हितज ारिजी सभा, समता सैि-नज दल, स्वतंत्र मजूर पज, डिप्रेस्ड क्लास एज्युजे श-न सोसायटी, शेड्युल्ड ज ास्ट फेडरेश-न, पीपल्स एज्युजे श-न सोसायटी इत्यादी सामाजिज संघट-नाव्दारे दलीतोध्दार ज रजारे बाबासाहेब महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिज समतावादी विचारां-नी प्रेरित झाल्या सारजेच वाटतात.

सामाजिक समतेचा विचार :-

बाराव्या शतकात म.बसवेश्वरांनी मानसामानसातील भेद कमी करण्यासाठी बोली भाषेतील वचन साहित्याने विषमतावादी समाजरचनेचा प्रखर विरोध केला, ते म्हणतात

"हा कोण, हा कोण, हा कोण असे न म्हणविता
हा माझा, हा माझा, हा माझाच म्हणवावे देवा."

असेच काहिसे विचार डॉ.बाबासाहेब आम्हाला देतात,

"माणसाने माणसाला स्पर्श केला, तर गोमूत्र अंगावर घेता,
ज ुत्री-मांजरीचा स्पर्श तुम्हाला चालतो मज माजसाचा विटाळ ज सला ?"

ज्या कुळात जन्म घेतला, ते कुळ स्पृश्य- अस्पृश्यता मानणारे आहे. याचा म.बसवेश्वरांना अत्यंत खेद वाटतो. त्याचा धिक्ज ार ज रज्यासाठी ते एज ा वच-नात सांजतात.

"पिता ढोर कक्कय्या होऊन
आजोबा मातंग चन्नय्या झाल्यास
मी वाचणार नाही का?
आणि श्वपचय्यांच्या सानिध्यात भक्तीचे
सद्गुण मी जाणेन... कूडलसंगमदेचा || "

सर्वांचा पिता, विश्वाचा निर्माता एकच असतांना परस्परांना कमी अधिक समजणारे आम्ही कोण, असे त्यां-ना वाटायचे.

म.बसवेश्वरांच्या जाती उच्चाट-नाला पुढे विसाव्या शतज ात बळ देज्याचे व समुळ उच्चाट-नाचे ज ार्य डॉ.बाबासाहेबां-नी पूर्ज जे ल्याचे दिसू-न येते. आपल्या सावलीमुळे हिंदू भ्रष्ट होऊ -नयेत म्हजू-न पेशवाईत अस्पृशांना रस्त्यावर फिरायलाही बंदी होती. त्यांच्या गळ्यात मडके तर चालतांना पाठीमागे फडा (झाडू) बांधल्या जायचा, हातात ओळख म्हणून काळा दोरा बांधल्या जायचा. डॉ.बाबासाहेबांनी 'जात' या विनाशज संकल्पनेची चिकित्सा करून तिचा शोध घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला. जात ही 'श्रमविभागणी वरही अवलंबू-न नाही आणि ती नैसर्गीक कल व जनमानस यावरही आधारीत नाही, व्यक्तीची कामे जात आधीच तयार करते. मूळ कुवतीच्या आधारे नव्हे तर जन्मानुसार किंवा आई-वडलांच्या सामाजिक स्थानानुसार. यामुळे जातीपातीची बंध-ने झुजारू-न स्वज र्मी-निष्ठा वाढवावी व ज र्मा-ने श्रेष्ठ व्हावे, असे डॉ.बाबासाहेबां-ना -नेहमी वाटायचे. एज ीज डे महात्मा बसवेश्वरांचा 'कायक वे कैलास', 'दासोह', 'दया धर्मदमूलवैय्या' हा सिध्दांत व्यक्तीला कार्यप्रवण करतो तर दुसरीज डे डॉ.बाबासाहेबांचा **'शिज ा, संघटीत व्हा, संघर्ष ज रा'** हा -नारा जीव-नाचा दीव्यमार्ज प्रदा-न ज रतो.

धर्मानुसार व जाती-वर्णानुसार समाजाची अनेक तुकड्यांत विभागणी करून श्रेष्ठ कनिष्ठत्व माणणाऱ्या वेद शास्त्र पुराणांचा धिक्कार करतांना म.बसवेश्वर म्हणतात,

"वेदां-ना बास-नात जुंडाळू-न, अडजळीत टाज तो
शास्त्रांच्या पायात बेड्या ठोकतो
तर्काच्या पाठीवर वार करतो आणि
आगमांचे नाक कापतो....."

विषमतेचे पोषण करून, जातीयता वाढविणारे, साहित्याच्या नावावर समाजाला दैववादी, नशिबवादी, कर्मठ बणविणारे वेद, शास्त्र, पुराण, पोथ्या आमचा उध्दार करणार नाहीत तर आम्ही कार्यप्रवण होवून, आमचा आत्मोध्दार साधला पाहिजे असे त्यां-ना वाटायचे.

डॉ.बाबासाहेबांनी सुध्दा अनेक शास्त्रांचा साकल्याने अभ्यास केला. धर्म, शास्त्र, पुराण माणसा माणसात भेद करते, ते संपविणे गरजेचे आहे म्हणून **'न स्त्री स्वातंत्र्यं अर्हति..."** म्हणणाऱ्या मनुस्मृतीचा जाहीरपणे धिक्कार केला व दहन केले. यापेक्षा समाजशास्त्र, अर्यशास्त्र, कायदा, राजकारण, मानववंशशास्त्र, घट-नाशास्त्र, पत्रज ारिता, इतिहास, शिजज, तत्त्वज्ञा-न यांचा अस्त्रासारजा प्रभावी वापर ज रू-न- मुज -नायज , बहिस्कृत भारत, समता, जनता, प्रबुध्द भारत यासारख्या वैचारिक अंदोलनातून सामाजिक समता प्रस्थापित ज रण्यामध्ये डॉ.बाबासाहेबांनी दीव्यक्रांती केली.

जातीभेदानुसार नगररचना व वास्तव्यास दिली जाणारी भूमी वा कुळवाडी श्रेष्ठकनिष्ठ ठरत नाही असे सांगताना म.बसवेश्वर एक प्रभावी व विद्रोही वचन मांडतात-

"महारवाड्याची वा शिवालयाची
जमीन असे का वेगळी ?
शौचाचे वा आचमनाचे पाणी
असे का शुची- अशुची ?
आपले आपण जाणलेल्यांचे कुळ असे एक..."

या वचनाचे तात्पर्य डॉ.बाबासाहेबांच्या पाहण्यात आले असते तर त्यांनी म.बसवेश्वरांच्या वचनांचा स्वीकार केला असता. डॉ.बाबासाहेबांची सामाजिक परिवर्तनाची भूमिका सर्वसमावेशक होती. समाजातील परिवर्तनाचा पाया दडपणाऱ्या समुहांना बरोबर घेण्यावर त्यांचा भर होता. डॉ.बाबासाहेबांनी तयार जे लेल्या भारतीय संविधानाचे अनेक पैलू महात्मा बसवेश्वरांच्या स्वातंत्र्य , समता, स्त्री पुरूष समानता, आर्थिक समृध्दता, श्रमप्रतिष्ठा, वैश्विज बंधूता इत्यादी महत्त्वपूर्ज विचारांवर आधारलेले आहेत असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

महात्मा गौतम बुध्द, महात्मा बसवेश्वर, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भौतिक देह जरी ज ालवश होऊन पंचमहाभूतात विलीन झाले असले तरी त्यांचे प्रभावी विचार आचंद्रसूर्य अंधारात चाचपडजाऱ्या जीवां-ना सदैव प्रेरजादायी व जाज़ृत ठेवजारे ठरतील. अशा या महामा-नवां-ना ज ोटी ज ोटी प्रजाम !

त्रिवार वंद-न !!!

समाज परिवर्तनाच्या लढ्यात- लेखक अण्णाभाऊ साठे यांचे योगदान

संशोधक विद्यार्थी

आशा विठ्ठलराव संगेवार

तालुका वसमत जिल्हा हिंगोली

भारतीय समाजात हजारो वर्षापासून सामाजिक व आर्थिक विषमता दिसून येते. या विषमतेमुळे बौद्धिक व मानसिक गुलामी लादून बहुजनांचे नुकसान झाले आहे. अशा या शोषण वादी व्यवस्थेच्या विरोधात अनेकांनी संघर्ष केला. मग हा संघर्ष स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर चालूच दिसत आहे .हा संघर्ष काहींनी शस्त्र द्वारे तर काहींनी लेखणीद्वारे प्रकटला. शस्त्र असो अथवा लेखणी दोन्ही हत्यारे चांगल्या समाजपरिवर्तनास कारणीभूत ठरली आहे. शस्त्र हिंसक मार्गाने तर लेखणी वैचारिक व शांत मार्गाने प्रभावी ठरले आहे. पण शस्त्रापेक्षाही लेखणीद्वारे नेत्यांनी व साहित्यिकांनी अमुलाग्र बदल घडविण्याचे कार्य केले त्यातील अग्रगण्य म्हणजे काल मार्क्स, आंबेडकर, महात्मा फुले, बाबुराव बागूल, शंकरराव खरात त्याचप्रमाणे अण्णाभाऊ साठे म्हणजेच तुकाराम भाऊराव साठे(1920-1969)

अण्णाभाऊ साठेंचे कथासंग्रह, कादंबऱ्या, लोकनाट्य, लावण्या, पोवाडे, प्रवास वर्णन हे शोषित माणसाच्या जगण्यातील दाहकता व संघर्ष घेऊन येणारे साहित्य आहेत.

बालपणापासूनच माणुस आणि त्या माणसाचे जगणे हा त्यांच्या चिंतनाचा विषय होता. अण्णा भाऊंचा जन्म धर्मव्यवस्थेने ,समाजव्यवस्थेने, अस्पृश्य ठरविलेल्या मांग जातीतील. त्यामुळे त्यांचे बालपण विषमतेच्या, दारिद्र्याच्या चटक्यात होरपळून निघाले. गुरुजींनी केलेल्या शिक्षेमुळे कायमची शाळा सोडणार या अण्णांचे औपचारीक शिक्षणापेक्षा अनौपचारिक शिक्षणातूनच व्यक्तिमत्व फुलत गेले. दंतकथा, शौर्यकथा,

वीर कथा, शिकार कथा त्यांनी मोठ्या प्रमाणात ऐकल्या होत्या. त्यातूनच लोक जीवनाच्या सूक्ष्म निरीक्षणातून त्यांना मानवी जीवन समजून घेण्याची दृष्टी मिळाली. अण्णाभाऊंनी अन्नाच्या शोधात आई-वडिलांसोबत मुंबईची वाट धरली तेव्हा पाहुण्यांच्या एका मित्रा द्वारे ते साक्षर झाले त्यांची वाचनाची आवड निर्माण झाली व त्यांना पडलेले प्रश्न ते पुस्तकातून शोधू लागले. तेव्हाच अण्णा भाऊ पोवाडे रचू लागले. डॉक्टर बाबुराव गुरव म्हणतात पोटासाठी वणवण फिरून व पडेल ते काम करून अस्थिर असलेल्या व उपासमारीच्या फटकाऱ्यात अण्णाभाऊंचा जीवन प्रवास सुरू झाला. वेळप्रसंगी हमाल, बूट पॉलिश, पोस्टर रंगविणे, मजूर, कोळसे वाहक अशा कितीतरी भूमिका अण्णा भाऊ च लिखाणाला बळ देतात. समाजातील शोषण अन्याय मानसिक गुलामगिरी आर्थिक विषमता अज्ञान हे त्यांच्या साहित्याचे विषय. समाजात परिवर्तन आवश्यक असल्यास क्रांती घडणे आवश्यक आहे अशा विचाराचे अण्णाभाऊ साठे होते.

खुळवाडी हा अण्णाभाऊंचा पहिला कथासंग्रह. विद्रोही जाणिवा व समाज परिवर्तनाची आवश्यकता या कथासंग्रहातून दिसून येते. अण्णाभाऊंच्या कथेत दुष्काळामुळे अन्न करून मरण्यापेक्षा बंड करून जगणाऱ्या बंडखोर नायक उभारलेला आहे. विष्णुपंत कुलकर्णी, बंडू वाला मधील तात्या मांग दुष्काळामुळे हैराण

झालेल्या दलित माणसांची बाजू मांडणारे विष्णुपंत हे दुष्काळ व साथीच्या रोगाचा बंदोबस्त केला नाही तर कुत्र्यासारखा मरण्यापेक्षा लुटारू होऊन काही दिवस जगावे या विचाराचा होता. इन आमदाराने बळकावलेली जमीन मिळवण्यासाठी पेटून उठलेला तात्या मांग हा खर्डा भाकरी खाऊन मरण्यापेक्षा जमिनीसाठी संघर्ष करून करणे पसंत करतो. रामोशी या कथातून जमीनदार डोंगरे व चव्हाण हे गावातील सामान्य माणसावर कसा अन्याय अत्याचार करतात आणि दोन जमीनदाराच्या भांडणात खंडू सारखा मुलगा गमावणाऱ्या घर कसे उध्वस्त होते आणि यातून नायक कशापद्धतीने संघर्ष करत जीवन जगत असतो हे प्रभावीपणे अण्णाभाऊंच्या कथातून दिसून येते.

कोंबडीचोर मधील रामू जगण्यासाठी कोंबड्या चोरून विकून पोट भरत असे सामाजिक व आर्थिक विषमतेचा बळी ठरलेला रामू केवळ आपल्या बोलण्यातूनच चीड व्यक्त करतो. बरबाद्या कंजारी हा आपली मुलगी निल्लीलीसाठी जात पंचायतीचा नियम मोडून अन्यायाला प्रतिकार करतो बरबाद्या ने पंचायत नियम मोडल्यामुळे कडक शिक्षा करण्याच्या निर्णयाला निर्भयतेने तो विरोध करतो.

मानवी जीवनातील दारिद्र्याची दैण्याचे प्रभावी चित्रण अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यात केले. विषमतावादी व्यवस्था ही सामान्य माणसाच्या गरजा ही पूर्ण होऊ देत नाही याचे चित्र अनेक कथांतून रेखाटले आहे सुलतान हा जन्माने मुसलमान असल्यामुळे कुठेही काम मिळत भाकरीच्या शोधात वणवण फिरतो मरण पत्करणे पण चोरी करणार नाही या विचारात रेल्वे रूळावर जीव द्यायला जाणाऱ्या सुलतान ला तुरुंगातही पोटभर जेवण मिळत नाही अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजा ही स्वातंत्र्यानंतरही पूर्ण होऊ शकल्या नाहीत म्हणून ही माणसे कशी बंड करतात व समाज परिवर्तनाची ज्योत प्रभावीपणे कशी पेटवतात हे अण्णाभाऊ यांच्या साहित्यातून दिसून येते सुलतान कथेमुळे अण्णाभाऊंना जगभर प्रसिद्ध मिळाली. सामाजिक परिवर्तन घडविण्यासाठी समाज बदल, लोक बदल आवश्यक आहे. लोक मनातील अज्ञान, अंधश्रद्धा, भीती नष्ट झाली पाहिजे. हे भुताचा वाडा, सुड, बोलका मुंडकं, तीन भाकरी, चालतं मढ कथातून समाजजीवनातील अंधश्रद्धेवर हल्ला चढविण्याचे काम व विज्ञाननिष्ठ समाज व प्रागतिक विचार रुजू पाहतात.

समाजजीवनातील अनेक प्रश्न त्यांच्या कथालेखनाचा विषय बनले समाजातील काही वर्ग सत्ता संपत्तीच्या लोभात सर्व सामान्यांचे शोषण करतात व त्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देत नाही. असा व्यक्ती जीवन जगण्यासाठी संघर्ष करत धडपडत असतो व समाज परिवर्तन घडविण्याचा विचार करतो. असा संघर्ष करणारा नायक अण्णाभाऊ च्या कथातून समाज परिवर्तन घडविण्याचे प्रयत्न करत असतो.

समाजात निर्माण झालेल्या वर्ण व्यवस्थेमुळे जातीव्यवस्था व अस्पृश्यता निर्माण झाली. त्यामुळे बहुसंख्य समाज उपेक्षित शोषित राहिला त्या समाजातील शूर, लढाऊ नायक नाईकांना न्याय देण्यासाठी कादंबरीद्वारे त्यांनी केलेला संघर्ष, त्यांनी केलेले समाज नियमातील बद्दल अण्णाभाऊंनी समाजासमोर मांडले.

फकीरा हा अपेक्षित होता अन्याय अत्याचाराचा प्रतिकार करणारा नायक होता फकीरा चा मुख्य संघर्ष हा इंग्रजी साम्राज्याविरुद्ध असला तरी सामाजिक विषमता भेदभाव त्याला मान्य नव्हते गावगाड्यातील

जातीय विषमता दलितांवर होणारे अन्याय आहे त्यांना दिवसातून तीन वेळा केलेली हजेरीची सक्ती यादीतून संघर्ष करणारा नायक उभारण्याचे काम अण्णाभाऊंनी केले अण्णाभाऊ नी उभा केलेला हा फकीरा वेळोवेळी संघर्ष करत जीवन जगत असतो

कथा-कादंबरी प्रमाणेच स्टालिनग्राडचा पोवाडा ही प्रसिद्ध पोवाडा ठरला आहे दुसऱ्या महायुद्धात रशिया व नाजी फौज यांच्यात जोरदार झालेला संघर्ष हिटलरच्या नाझी सेना विरोधात कसा लढला अण्णाभाऊंनी वीर रसा द्वारे अत्यंत प्रभावीपणे मांडले शोषक व शोषित यातील लढाई म्हणजे स्टालिनग्राडचा पोवाडा सत्ता संपत्तीच्या बळावर हुकूमशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या हिटलरला रशियाने चांगला धडा शिकवला शोषकाच्या सोशिकपणा ला आळा घातला.

जग बदल घालुनी घाव हे क्रांती गीत ही हृदयाला चटकन भिडते वैदिक धर्म व्यवस्थेमध्ये शूद्रातिशूद्र व महिला यांना त्यांच्या न्याय हक्क अधिकारापासून हजारो वर्ष वंचित ठेवण्यात आले अस्पृश्य हीन कलंकित म्हणून त्यांचा छळ करण्यात आला अशांना अण्णाभाऊ गुलामगिरीच्या अंधारातून चिखलातून बाहेर पडण्याची आवाहन त्यांनी आपल्या शाहिरी काव्यातून केले.

जग बदल घालुनी घाव सांगून गेले मला भीमराव
गुलामगिरीच्या या चिखलात रुतून बसला ऐरावत
अंग झाडुनी निघ बाहेरी घे वरती घाव.....
..... एकजुटीचा या रथा वरती आरूढ होऊनी चल पुढती
नवमहाराष्ट्र निर्मूलन जगती करी प्रकट निज गाव

सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित होण्यासाठी अशा पद्धतीने सर्वांनी एकत्र यायला हवे तरच समाज परिवर्तन समाज बदल घडू शकते. अण्णाभाऊंनी अशा समाजातील लोकांना आपल्या साहित्यातील नायक व नायिका बनवल्या कित्येक दिवसापासून शोषित व उपेक्षित झाले आहे व जीवन बदलण्यासाठी संघर्ष करीत लढताहेत.

माझा रशियन प्रवास या प्रवास वर्णन आतून माणसाचे सन्मानाचे जगणे व त्या जगण्यायामागील तत्त्वज्ञान शोधण्यासाठी प्रवास केल्याचे दिसते. गुलामाला गुलामीची जाणीव करून देऊन त्यांच्याकडून सामाजिक परिवर्तन साधने हा त्यांच्या साहित्याचा हेतू दिसून येतो आणि खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन जर घडायचे असेल तर आपल्यावर होणारे अन्याय अत्याचार याची जाणीव त्यातील आवश्यक प्रयत्न केले पाहिजे.

संदर्भसूची

1. विद्रोही कलावंत अण्णाभाऊ साठे लेखक राजेश्वर दुडूक नाळे. लोकायत प्रकाशन ,सातारा¥
2. अण्णाभाऊ साठे फकीरा श्रमिक प्रतिष्ठान ,कोल्हापूर
3. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे रेखा वडिखाये. लाखे प्रकाशन नागपूर
4. अण्णाभाऊ साठे जीवन व साहित्य, नानासाहेब कठाळे .समता प्रकाशन, नागपूर.
5. स्मशानातील सोनं -अण्णाभाऊ साठे(माध्यम -युट्युब)
6. भारतीय साहित्याचे निर्माते अण्णाभाऊ साठे -बजरंग कोरडे
7. विकिपीडिया

शेतकरी आत्महत्या – एक चिंतन

प्रा. माणिक उत्तमराव बाभुळगावकर

प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, कै.बाबाराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय, वरुड तांडा, ता. कळमनुरी जि. हिंगोली

प्रस्तावना :

भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही अर्थव्यवस्थेला आणि समाजव्यवस्थेला लागलेली एक मोठी किड आहे. किडीकडे भारतीय समाज आणि भारतीय शासनव्यवस्था गांभिर्याने पाहावयास तयार नाही. जगातील इतर देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात हे ऐकिवात नाही. पण मध्यंतरी फ्रान्स देशात तेथील शेतकरी आपल्या समस्या सरकारपुढे मांडण्यासाठी आपली सर्व ट्रक्टर्स रस्त्यावर आणून रस्ता बंद केला होता. म्हणजे युरोपातील फ्रान्ससारखी कृषी आधारित अर्थव्यवस्थासुद्धा २१ व्या शतकात अडचणीत आहे. भारतामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडु, मध्यप्रदेश, तेलंगना इत्यादी राज्यात तर प्रचंड प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होताना दिसून येतात. हा गंभीर प्रश्न आर्थिक, राजकीय व सामाजिक अंगाने अभ्यासणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळेच 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या – एक विश्लेषण' हा संशोधनाचा विषय निवडला आहे.

संशोधनाची गृहीतके :

प्रस्तुत संशोधन लेखासाठी पुढील गृहीतके लक्षात घेतली आहेत –

१. भारतात आणि महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या प्रचंड आहेत.

२. या शेतकऱ्यांच्या आत्महत्येस आर्थिक आणि सामाजिक कारणे कारणीभूत आहेत.

३. आत्महत्या रोखण्यास भारतीय शासनव्यवस्था अपूरी पडत आहेत.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन लेखासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडा वापरला आहे. संशोधनासाठी लागणारे तथ्य संकलन द्वितीय साधन सामुग्रीच्या आधारे केले आहे. वर्तमानपत्रे, मासिके, ग्रंथे, विविध विचारवंताची विचारग्रंथे इत्यादींचा आधार घेऊन विश्लेषण केले आहे.

मराठवाडयातील आठ जिल्हयात जानेवारी ते डिसेंबर २०२१ पर्यंत ८०५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

शेतकरी आत्महत्या – कारण मीमांसा :

शेतकऱ्यांच्या आत्महत्येची समस्या २१ व्या शतकाच्या प्रारंभीपासून दाहकतेने जाणवत आहे. २१ व्या शतकात भारताने स्वीकारलेल्या जागतिकीकरणाचे परिणाम कृषी क्षेत्राला बसू लागले आहेत. कृषी निविष्टांच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली. यामध्ये खते, बियाणे, पेस्टी–साईड यांचा समावेश होतो. परिणामी भारतीय शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात प्रचंड वाढ झाली. कृषी उत्पादनाच्या किंमती जागतिक उत्पादनाच्या तुलनेत महाग झाल्या. कृषी माल निर्यातीला जागतिक बाजरपेठेत खीळ बसली. हे उत्पादन स्थानिक बाजारपेठेतच कमी किंमतीला विकण्याशिवाय भारतीय शेतकऱ्याला पर्याय राहिला नाही. परिणामी भारतीय शेतकऱ्यांच्या मालाला योग्य मोबदला मिळाला नाही. आर्थिक दृष्टचक्रात भारतीय शेतकरी अडकल्यामुळे त्यांना आत्महत्येशिवाय पर्याय राहिला नाही.

शासनाचा जीवनावश्यक कायदा शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरतो आहे. नव्हे तर तो शेतकऱ्यांच्या मुळावर घाव घालणारा आहे. कृषी उत्पादनाची किंमत वाढली की सरकार या कायद्याने तत्काळ कृषी वस्तुंची किंमत कमी करतो. सरकारने या कायद्याने शहरी, मध्यमवर्गीय लोकांचे संरक्षण करण्याचे धोरण स्वीकारले आहे. पण शेतकऱ्यांच्या वस्तुंच्या किंमती घटल्या तर त्याची जबाबदारी शासन स्वीकारत नाही. आताचेच उदाहरण घ्या, सन २०१७ मध्ये जुलौपर्यंत कांद्याच्या किंमती १ रुपया किलोच्यावर गेल्या नाहीत तेव्हा सरकारने बघ्याची भूमिका घेतली पण हा कांदा ऑगस्ट २०१७

ला २०–३० रुपये किलो झाला. सरकारने लगेच कृती केली आणि कांद्याचे दर कमी केले. हा शेतकऱ्यांवरील अन्याय आहे. दैनिक देशोन्नतीमध्ये बातमी आली होती की शेतकऱ्यांच्या आत्महत्या म्हणजे शासनाने केलेले खुन आहेत.

अर्थतज्ज्ञ कार्ल मार्क्स यांनी आर्थिक समतेवर प्रचंड लिखान केले. त्यातूनच त्यांचा 'दास कॅपिटल' हा ग्रंथ जगात नावारूपाला आला. त्यांनी कामगारांच्या शोषणाचा विचार केला. आज जगात कामगारांची आर्थिक स्थिती सुधारली आहे पण शेतकऱ्यांच्या शोषणाचा कुणीही विचार करीत नाही. भारताचे उदाहरण घेऊ या, भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा केवळ १४ टक्के आहे. पण कृषी क्षेत्रावर आधारित लोक म्हणजे कृषीत राबणारे लोक यांचे प्रमाण जवळपास ५०–५५ टक्के आहेत. म्हणजेच केवढी मोठी ही आर्थिक विषमता. का म्हणून शेतकरी आत्महत्या करणार नाहीत. शासनाला वाटते की कृषी क्षेत्रातून महत्तम उत्पादन निघत नाही. परिणामी कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी आहे. पण पूर्णपणे खोटा समज आहे. कारण कृषी मालाला योग्य दर मिळत नसल्यामुळे कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी झाला आहे, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. परिणामी या आर्थिक विषमतेतून शेतकरी वर्ग आर्थिक विवंचनेत अडकला आहे.

नोटा बदली आणि कृषी क्षेत्राचा विचार केला तर असे दिसून यते की नोटा बदलीची सर्वाधिक झळ भारतीय शेतकऱ्यांना बसली. महाराष्ट्रात मागील चार वर्षापासून दुष्काळ होता, शेतकऱ्यांची अवस्था आर्थिकदृष्ट्या दयनीय झाली होती. मान्सून २०१६ मध्ये समाधानकारक पाऊस पडला, कृषी उत्पादन बऱ्यापैकी आले होते पण ऐन हंगामातच मा. पंतप्रधानांनी नोटा बदली लागू केली. त्यातूनच जुन्या नोटा – नव्या नोटा घेण्याच्या विवंचनेतून कृषी व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीत आणले. पण याकडे शासनाने यतकिंचीतही लक्ष दिले नाही. परिणामी अनेक शेतकऱ्यांना आत्महत्येस जवळ करण्याशिवाय पर्याय राहिला नव्हता.

शासनाची उदासिनता ही शेतकरी आत्महत्येस कारणीभूत ठरत आहे. कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा पुरस्कार लोकशाही प्रधान राष्ट्रात शासनानी स्वीकारावा अशी अपेक्षा करणे अयोग्य नाही. पण शासन शेतकरी आत्महत्येसाठी काही उपयोजना करताना दिसत नाही. उपाययोजना केल्या तरी त्या अंमलबजावणीच्या पातळीवर अयशस्वी झाल्या आहेत. विदर्भात काही पॅकेज शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी दिले गेली पण हे पॅकेज मूळ लाभार्थ्यापर्यंत पोहचलेच नाही. परिणामी विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या घटण्याऐवजी प्रचंड वाढत आहेत.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि शेतकरी संपावर जाणे याचा सविस्तर अभ्यास केला तर दिसून येते की जे शेतकरी मानसिकदृष्ट्या हळव्या मनाचे आहेत त्यांनी आत्महत्येचा फास आवळला पण बहुसंख्येने शेतकरी क्रांतीच्या साह्याने आपले आर्थिक जीवन बदलेल अशी अपेक्षा ठेवून आहेत. त्यातूनच महाराष्ट्राचा शेतकरी खरीप हंगाम २०१७ ला संपावर गेला. मोठ्या शहरांना जाणारा भाजीपाला, दूध हे शेतकऱ्यांकडून आडविले गेले. त्याचा परिणाम शहरी लोकांच्या उपभोगावर झाला. तेव्हा सरकारला शेतकऱ्यांच्या संपाची दखल घ्यावी लागली. शेतकऱ्यांचे दीड लाख रुपयाचे अल्प व मध्यम स्वरूपाचे कर्ज माफ करण्याची घोषणा करावी लागली. पण मुळत: शेतकऱ्यांना संपावर जाणे भाग पडणे हीच गोष्ट शासनासाठी लाजीरवाणी आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यांचा पाठपुरावा करावा. नाहीतर भविष्यात शेतकरी क्रांतीची भाषा बोलल्याशिवाय राहणार नाही. त्यापूर्वी शासनाने शेतीला अनुरूप धोरणे राबवावेत. भारतात कृषी अनुदाने उण्यावर गेले आहेत. ही अनुदाने इतर देशांच्या कृषी अनुदानाबरोबर असावीत.

२१ व्या शतकापासून भारतीय कृषीवर हवामान बदलांचा परिणाम जाणवू लागत आहे. हवामानात प्रचंड बदल होत आहेत. तापमानात वाढ झालेली आहे. त्यातच दर चार वर्षांनी दुष्काळाची परिस्थिती निर्माण होताना दिसते. एकदा दुष्काळ पडला तर त्याचे परिणाम शेतकरी आणि कृषी क्षेत्राला जवळपास चार वर्ष भोगावे लागतात. उत्पन्न–खर्चाचा मेळ जुळविण्यासाठी कमीतकमी चार वर्षाचा अवधी लागतो. परिणामी या सतरा वर्षात शेतकऱ्यांवर सावकारी आणि बँकेच्या कर्जाचा बोजा पडला आहे. दरम्यानच्या काळात शासनाने एकदा कृषी कर्ज माफी केली आहे. पण परत परत कर्ज माफी

देणे बँकींग क्षेत्राच्या दृष्टीने योग्य ठरत नाही. त्यासाठी सरकारने हवामान बदलावर आधारित कृषीतंत्रज्ञान शेतकऱ्यांना पुरविण्यासाठी संशोधन आणि विकास यावर भर दिला पाहिजे.

शेतकरी आत्महत्या आणि शेतकरीवर्गाचे समाजजीवन यांचा घनिष्ट संबंध आहे. मुळत: शेती करणारा समाज हा सामाजिकदृष्ट्या निम्न स्तरातील आहे. या समाजातील शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. या समाजात रुढी, परंपरा, अंधश्रद्धा यांचे प्राबल्य अधिक आहे. शेतकरी वर्ग देव–धर्मावर, खोट्या प्रतिष्ठेवर मोठ्या प्रमाणात खर्च करतात. उत्पादक कार्यावर होणाऱ्या खर्चापेक्षा अनुत्पादक कार्यावर होणारा खर्च अधिक होतो. परिणामी अर्थशास्त्रीय गणित चुकल्यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्याशिवाय पर्याय राहत नाही. याबाबतचे पर्याप्त विश्लेषण म. फुलेंनी त्यांच्या 'ब्राह्मणाचे कसब' या ग्रंथात केले आहे. आजसुद्धा शेतकरी समाजाने म. फुलेंचे विचार अंगिकारले नाहीत.

केंद्रीय कृषीमंत्री राधामोहन सिंग यांनी शेतकरी आत्महत्याबाबत स्पष्टीकरण देताना म्हटले की शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रेमप्रकरणातून होतात. मंत्र्याचे हे स्पष्टीकरण लाजीरवाणे आहे. शेतकरी आत्महत्येला एकमेव आर्थिक कारण आहे. त्यांच्या हाता पैसा नसला की त्यातून कुटुंबातील गरजा पूर्ण न झाल्यामुळे कुटुंबात, पती–पत्नीमध्ये कलह निर्माण होऊन त्याची परिणिती शेतकऱ्यांच्या आत्महत्येत होत असते. आता तर शेतकऱ्यांच्या मुली ह्या आई–वडिलांची आर्थिक स्थिती पाहून आपला आई–वडिलावरील भार कमी करण्यासाठी स्वत: आत्महत्या करतात.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीचे उपाय :

१) अर्थव्यवस्थेत कृषीक्षेत्रासाठी डॉ. स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी करावी. उत्पादन खर्चाच्या दुप्पट कृषी उत्पादनाला किंमत द्यायला पाहिजे.

२) महाराष्ट्रात नव्हे तर भारतात जलसिंचनाच्या सुविधा वाढविल्या पाहिजेत त्यासाठी सरकारने भक्कम कार्य केले पाहिजे जसे नदी जोड प्रकल्प, लघु–पाटबंधारे योजना, इत्यादी.

३) पाण्याची बचत होण्यासाठी आणि जमिनीची उत्पादकता टिकवून राहण्यासाठी सूक्ष्म सिंचन योजना सरकारने राबवाव्यात. सरकाने ठिबक सिंचन संच, तुषार सिंचन संच ८० ते ९० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना पुरवावेत.

४) शेतकऱ्यांच्या मुलांना जे प्रत्यक्ष शेतीत राबतात त्यांना कृषी तंत्रज्ञान वेळोवेळी मोफत उपलब्ध करून द्यावे.

५) भारतीय शेतीला अनुरूप कृषीतंत्रज्ञान विकसित करावे की ज्यामुळे त्याचा फायदा शेतकऱ्यांना होऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल.

६) कृषी प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन द्यावे. महाराष्ट्रात केवळ ऊस प्रक्रिया उद्योगालाच संधी निर्माण केली गेली आहे. अशी संधी फळ उत्पादन आणि भाजीपाला उत्पादन क्षेत्रालाही पुरवायला हवी.

संदर्भग्रंथ :

१. अर्थसंवाद – 'पर्यटन विशेषांक', जानेवारी–मार्च २०१७

२. डॉ. प्रवीण बनसोड, 'शेतीचे कंपनीकरण–शेतकऱ्याचे मरण – सत्यशोधक दृष्टीकोन', अक्षरगाथा, वर्ष आठवे, अंक दुसरा, १० जुलै २०१७

३. म. फुले, शेतकऱ्याचा असुड – १८८३

४. टी.व्ही ९ बातमी २२ डिसेंबर २०२२

WRECKEDIDENTITY AND COLONIAL POLITICS IN AMITAV GHOSH'S *SEA OF POPPIES*

Shrinivas V. Pinnalwar
ManishaJr.College Pota Bk Tq. HimayatnagarDist.Nanded.

ABSTRACT:

Amitav Ghosh, a prominent Indian English fiction writer, addresses several pressing socioeconomic issues of the nineteenth century in his novel Sea of Poppies (2008): forced opium production as a commercial crop on the Chinese market in Bihar and Bengal, its disastrous consequences, and transportation via the Ibis ship of the first battle of the Indian diaspora. Ghosh indicates that British colonial power is deteriorating and that the Indian revolution and society, in general, are being destroyed. Sea of Poppies encourages people from all walks of life to share a fate. Ghosh's work is the apex of a literary depiction of the Opium Wars. The stories in the book combine many mythology, beliefs, languages, cultural, and historical factors to provide a more accurate representation of the civilization in question. Ghosh understands that the Indian diaspora is a vital cultural force worldwide, and its influence on the Indian subcontinent is expanding. The Ibis's mix of cultures questions the concept of national identity and reveals a broken sense of home identity. Ghosh describes the Indian Ocean as a palimpsest of power, violence, exchange, resistance, and survival. The author favors natural subjects such as life events or conflicts between country and people. The novel challenges society and historical prejudices by using specific events as rare examples of revolution against the established order. The central issue of the novel is the denial of one's country, one's national and cultural identity, and one's lower class consciousness as a result of immigration.

KEYWORDS: Amitav Ghosh, colonial politics, diaspora, emigration, Sea of Poppies

INTRODUCTION:

Sea of Poppies is a perfect example of a literary depiction of the Opium Wars. History serves as the backdrop against which the miserable lives are vividly shown. A novel portrays characters from various backgrounds drawn to a common destiny. The work depicts the issue of power dynamics, with numerous people becoming targets in the power game. The Ibis ship's image was used as a weapon for colonial policy and the destruction of national identity. The story begins at Deeti, a Ghazipur home some fifty kilometers east of Banaras. The Ibis allows us to critically look at a new culture and colonial politics while dealing with personal issues.

Citizens' political and economic fights for survival flow into a river that represents or pursues unrealistic and difficult-to-achieve ideals over the rocky surface of the vast unknown sea. The main protagonists are an ordinary village lady named Deeti, an American mulattan sailor named Zachary Reid, an Indian rayah/zamindar named Neel Rattan Halder, and an opium missionary named Benjamin Burnham. The work focuses on 19th-century socioeconomic problems such as forced opium cultivation for the Chinese market, its fatal consequences, and the migration of the Indian diaspora in the first load via the Ibis boats in Bihar and Bengal. The concept of Christian self-control in the face of opium trade policies was leveled, and religion was recognized as an essential component of nationalism. Christian self-control training has been matched with opium trade restrictions, and religion has been an element of national culture(Acharjee&Khuraijam 2014).

It is worth noting that Ghosh's victimized characters in Sea of Poppies consistently oppose dominant forces by embracing post-humanist ideals of human dignity, regardless of age, ethnicity, or caste, as well as a reduced emphasis on separate 'I,' which is required for the recognition of additional people(Jain 2011). Ghosh encapsulates his post-humanist views in a fictitious work set over two centuries ago; nonetheless, there are parallels in the real world that make the book relevant. Deeti and her farming community face oppression due to the growing opium. This scenario is the same when opium production is at its peak, despite the foundations for human rights and a high standard of living in Afghanistan and Burma remain the same(Jain 2011). As the author discusses opium warfare, partition, India-Pakistan conflicts, sectarian uprisings, and migration, the 'Sea of Poppies' might be presumed to be politically motivated. Globalization and the post-colonial age have rendered the presumption of fixed identity obsolete and recognized identity as a multi-layered and malleable concept (Acharjee&Khuraijam 2014).

STORIES BEHIND THE *SEA OF POPPIES*:

The book stories weave together various myths, ideologies, languages, cultural and historical strands to depict this civilization's true nature. They concluded the decade by compelling Indian farmers to grow opium cod rather than feed crops and sell opium pickles to the East India Company, which ruled the country and had the opium trade monopoly. The British's opium smuggling past is revealed by exposing their deceptive commercial ties with the Chinese, who were poisoned by opium(Bergstrom &West 2020). A panorama of individuals traveling to a foreign land aboard the Ibis's spacecraft exemplifies the difficulty of global circumstances and an ever-increasing cultural heterogeneity. Ghosh highlights imperialism's historical impacts on migration and displacement with a colonial backdrop. Cut off from past emotional, familiar, and national ties, these refugees construct a new identity marked by sorrow, misery, and conflict(Mahapatra 2019).

Sea of Poppies deconstructs several cultural difficulties, including caste, marriage, and gender. It's worth noting how important the environment and ecology are throughout this time of localized, detail-sensitive history rewriting. The novel employs specific examples as rare instances of rebellion against the current quo to confront society and historical biases.(Alexandru 2017).

FUSION OF DIFFERENT CULTURES DUE TO DIASPORA:

The Ibis's mix of cultures questions the concept of national identity and reveals a broken sense of home identity. The idea of variety and pluralism is formed by looking at characters such as Deeti, Pierre Lambert, Serang Ali, and Zachary Reid as prominent in culture from a post-national perspective. Then the fragmented picture of national identity develops on its own. Ghosh highlights the many aspects of colonialism that impact the Indian people. Because of his thorough studies on the issue before commencing the Ibis Trilogy, Ghosh had a comprehensive grasp of the effects of colonial control in India(Amjad &Baharvand 2019). In today's globalized world, the notion of 'Diaspora' is crucial. This word, which was initially used to characterize Jews forced to live in exile from their homeland of Palestine, may now be used to any group forced to flee their nation and go on perilous voyages(Asthana 2017, 84). It accurately portrays the story and experience of the Indian diaspora's North Indian enslaved workers. The novel's central subject is the rejection of one's country, national and cultural identity, and lower class awareness due to immigration, as symbolized by the slave-ship Ibis (Kalaiyarasan&Vishalakshi 2018).

The tale depicts the savagery of British colonialism of Indians to maximize profit from imperialist operations. It is questionable whether a nation can be home to people like Deeti, a widow

saved from a funeral pyre by a low caste Kalua, or Raja Neel Ratan, a political outsider. Because caste is so firmly ingrained in Indian society, there is a lot of otherness. The narrative centers on individuals and the nationalized nation as they challenge the national worldview. As Amitav Ghosh argues in this novel, the caste system was at the center of Indian society(Singh 2019). Ghosh understands that the Indian diaspora is a vital cultural force worldwide, and its influence on the Indian subcontinent is expanding. He, on the other hand, discourages his interests in India.

THE CONTRAST OF VARIOUS LANGUAGES AND IDIOMS:

The story opens with a thrilling experience for language learners as Ghosh undertakes a cut-and-paste survey of numerous languages and idioms used at a particular time and location on the Ibis, which serves as a case study for globalization in the making. The narrative centers on this ship rebuilt to transport indentured servants known as girmitiyas after Britain abolished slavery (Guilhamon 2011). Ghosh describes the Indian Ocean as a palimpsest of power, violence, exchange, resistance, and survival. The book delves into rebuilding families in both dominant and rebellious situations. The routes span the globe and give an emotional map of the universe of unlikely alliances and advantages that result from Empire intrigues and practices from the ocean's flowing domain. In reaction to Eurocentric history, Ghosh reclaimed the Indian Ocean as a region rich in conflict, conflict resolution, and collaboration(Roy 2016).

"The Ibis was not a ship like any other; in her internal reality, she was a vehicle of change journeying through the mists of illusion towards the elusive, ever-receding landfalls that constituted the truth," said Babes Nob Kissin, a mystery visitor onboard Ibis(Tiwari 2017). Amitav Ghosh's literature demonstrates that migrants, immigrants, and homeless people are fundamentally united on Ibis, transcending their static societies and identities; history gives meaning to modernity by expressing new concepts such as rationality, enlightenment, liberty, individualism, state, civil society, democracy, and the diaspora's survival(Sharma 2019). Ghosh sees the cosmos as historic and constructs discursive domains to explore movement, attempting to elude the sphere of debate being dominated by the Western hegemonic system of knowledge generation and world narration (Huttunen, 2012).

Ghosh likes to write about things that are real, like how people feel when they have to move away from their home country, how nostalgia can help people remember who they were when they were younger, and how adaptability is essential when people move to a new place(Priya 2016). The Ibis brings together people who don't get along very well, like seamen, convicts, and coolies, to be sent to the Islands of Mauritius. This book is a mix of fantasy, study, and scholarship, but it mainly focuses on the ship's crew and how each person ended up on the ship in a different way. Because Ghosh's characters move between places and look back on their pasts while learning about new cultures and trying new languages, his work can be used as an example of this.

CONCLUSION:

Diaspora is a journey between identity and culture that spans time and location. Amitav Ghosh is a contemporary American writer who blends his technical expertise as a social historian with a creative flare to create cultural and historical significance works. As a social historian, he combines literary abilities with an in-depth understanding of culture and history to create works of art that significantly affect society. The novel *Sea of Poppies* is a perfect example of a literary depiction of the Opium Wars. Deeti, a simple village lady, Zachary Reid, an American mulattan sailor, Neel Rattan Halder, and Benjamin Burnham, an Indian rajah/zamindar and opium preacher,

are the central players. The work focuses on a variety of nineteenth-century socioeconomic issues. The novel's tales weave together many myths, ideologies, languages, cultures, and historical eras to demonstrate society's dependability. Numerous cultural intricacies are deconstructed throughout the novel's storyline, including caste, marriage, and gender. The fusion of many cultures in the Ibis casts doubt on the concept of national identity and reveals a broken sense of domestic identity. The novel employs specific examples as rare instances of rebellion against the current quo to subvert society and historical biases. The novel's central topic is the characters' rejection of their homeland, national and cultural identities, andlower class awareness. The tale exposes the atrocities committed by the British colonists against the Indians to maximize profit from colonialist operations.

REFERENCES:

1. Acharjee, S. &Khuraijam G. (2014). Representation of Dismantled Identity and Colonial Politics in Amitav Ghosh's Sea of Poppies. International Journal of English Language, Literature and Humanities, 2(3), 59–67.
2. Alexandru, M. S. D. (2017). Routes Beyond Roots: Alternative Ecological Histories In Amitav Ghosh's Sea Of Poppies. *Indi@logs*, *4*, 37–50. https://doi.org/http://dx.doi.org/10.5565/rev/indialogs.78
3. Amjad, F. A. &Baharvand, P. A. (2019). Detrimental Impacts of Poppy Monoculture on Indigenous Subjects, Plants, and Animals: An Ecocritical Reading of Amitav Ghosh's Sea of Poppies. *Contemporary Literary and Cultural Studies*, *I*(1), 21–37.
4. Asthana, S. R. (2017). Introducing Amitav Ghosh. *Research Journal Of English (RJOE)*, *3*(2), 75–86.
5. Bergstrom, C. T. & West, J. D. (2020). *Calling bullshit : The art of skepticism in a data-driven world*. Random House, New York, 1-370. https://literariness.org/wp-content/uploads/2020/09/Literariness.org-Carl-T.-Bergstrom-Jevin-D.-West-Calling-Bullshit_-The-Art-of-Skepticism-in-a-Data-Driven-World-Random-House-2020.pdf
6. Burton, A. (2012). Amitav Ghosh's World Histories from Below. History of the Present, 2(1), 71–77. https://doi.org/10.5406/historypresent.2.1.0071
7. Ch.Swathi. (2014). Human-History Conflict In Amitav Ghosh's The Shadow Lines And Sea Of Poppies. *Asian Academic Research Journal Of Multidisciplinary-AARJMD*, *1*(18), 676–690.
8. Ghosh, Amitav. 2009. Sea of Poppies. New Delhi: Penguin.
9. Guilhamon, L. (2011). Global Languages in the Time of the Opium Wars: The Lost Idioms of Amitav Ghosh's Sea of Poppies.*Commonwealth Essays and Studies*,*34*(1), 67-76.
10. Huttunen, T. (2012). Amitav Ghosh' s The Circle of Reason — Dismantling the idea of purity. *Nordic Journal of English Studies*, *11*, 126-145.
11. Jain, S. (2011). A Posthumanist Response to Amitav Ghosh's *Sea of Poppies*. *Kontur*, *22*(22), 66–74.
12. Kalaiyarasan, G., &Vishalakshi, R. (2018). Diasporic Consciousness in Amitav Ghosh's Sea Of Poppies. *Research Journal of English Language and Literature (RJELAL)*, *6*(3), 224-227.
13. Latumeten, A. A. T. (2017). Discovering Environmental And Social Justice In Amitav Ghosh's Sea of Poppies. *Sanata Dharma University Yogyakarta, Indonesia*.
14. Mahapatra, N. (2019). Literary Herald Literary Herald. *TLHjournal*, *5*(1), 36–50.
15. Mukherjee, D. (2015). Treatment Of Diaspora In Amitav Ghosh's Fiction : A Reading Of His Select Novels. *International Journal Of English Language, Literature And Translational Studies (IJELR)*, *2*(4), 69–74.
16. Priya.R, D. R. (2016). Diasporic Sensibilities in The Select Novels of Amitav Ghosh. *International Multidisciplinary Innovative Research Journal -An International Refereed e-Journal of Literary Explorations*, *1*(1), 1-9.
17. Roy, B. (2016). Reading affective communities in a transnational space in Amitav Ghosh's Sea of Poppies. *NJES Nordic Journal of English Studies*, *15*(1), 47–70. https://doi.org/10.35360/njes.351
18. Sharma, A. (2019). Amitav Ghosh's Sea Of Poppies: A Transnational Diaspora From Roots To Routes. *Global Research Forum on Diaspora and Transnationalism*, *5*(2), 1–18.
19. Singh, M. (2019). Understanding Caste Based Discrimination And Exploitation In Colonized India: A Study Of Amitav Ghosh "S Sea Of Poppies. *Journal of Interdisciplinary Cycle Research*, *11*(8), 143–149.
20. Tiwari, S. (2017). Constituents And Issues Of Identity Construction Among Diaspora Communities In Amitav Ghosh's Novel Sea Of Poppies. *International Journal of English Language, Literature in Humanities*, *V*(VII), 426–442.

माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा विविध ज्ञा-नशाजामध्ये प्रवेशित होण्यामागील कारणांचा शोध - एक अभ्यास

संशोधज

श्री. मुंढे संतोष त्र्यंबकराव

सहशिजज , स्वामी विवेज ा-नंद माध्यमिज विद्यालय, परतुर जि.जालना

प्रस्तावना :-

विसाव्या शतकार भारतात वैज्ञानिक व तांत्रिक शिक्षण सुरु झाले. अनेक कारखाने सुरु झाले. त्यात ज ाम करण्यासाठी प्रशिक्षक माणसांची गरज निर्माण झाली म्हजु-न मोठया प्रमाणात विज्ञा-न महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु झाली. चांगली नोकरी मिळावी, समाजात प्रतिष्ठा मिळावी या इच्छेने विद्यार्थी वैज्ञानिक शिक्षण घेवु लागले. भारतात उद्योगधंद्याची वाढ झाल्याने व्यापार वाढला आणि नविन अर्थशास्त्र ि-निर्माज झाले त्यांचा अभ्यास करण्यासाठी वाणिज्य शाखा सुरु झाली.

औद्योगित क्षेत्र व बँका सारख्या संस्थामध्ये आर्थिक व्यवहार बघण्यासाठी वाणिज्य शाखेचे ज्ञा-न असलेल्या लोकांची गरज निर्माण झाली. विद्यार्थी व पालकांचा ओढा वाणिज्य शाखेचे शिक्षण घेण्याकडे झाला. मुलांप्रमाजे मुली सुध्दा विज्ञान व वाणिज्य शाखेचे शिक्षण घेवु लागले. दिवसेंदिवस वाणिज्य व विज्ञा-न शाखेकडे विद्यार्थ्यांची संख्या वाढु लागली. विद्यार्थी विज्ञान व वाणिज्य शाखेकडे वळले तर विशेष नवल नाही. ज ारण विद्यार्थ्यांना आपले व्यक्तीमत्व घडवायचे असते. मुलांनी धाडसी कामे करावी असा सामाजिक दंडक आहे. पण आज मुलींसुध्दा धाडसाने काम करु लागल्या आहेत. अभियांत्रीकी महाविद्यालय तर सिव्हील मेॅ ि-नज ल जेत्राज डे मुली वळल्या ज ी ज ौतुज ाची जौष्ट आहे.

संशोधनाची गरज :-

ज ाही वर्षापासु-न विद्यार्थ्यां-ना शिजजाच्या बऱ्याच वेजवेजळया वाटा उपलब्ध झाल्याचे दिसत आहे. पुर्वापार चालत आलेल्या विषयांव्यतीरिक्त इतरही अनेक विषयांमध्ये शिक्षण घेण्याच्या संधी आणि सोयी असलेल्या दिसतात. उदा.वेगवेगळे खेळ, नृत्य, गायन, तंत्रशिक्षण, व्यवसायीक शिक्षण इत्यादी पण तरीही दहावी नंतर कला, विज्ञान व वाणिज्य क्षेत्राकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या निश्चितच जास्त आहे. त्यातही ज ला शाखेत विज्ञान व वाणिज्य शाखा प्राधान्याने निवडली जाते.

संशोधनाचे महत्व :-

प्रस्तुत संशोधनात इयत्ता दहावी उत्तीर्ण झालेली विद्यार्थी इयत्ता अकरावीला प्रवेश घेतांना कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत प्रवेश घेतात. या शाखेमध्ये प्रवेश घेण्यामागे नेमक काय कारण आहे हे सदरील संशोध-नातु-न स्पष्ट होत असल्या-ने भविष्यात माध्यमिज शाळेतील विद्यार्थ्यां-ना शाजा ि-निवडी संदर्भात माध्यमिज शिक्षकांमध्ये असणारा संभ्रम या संशोधनामुळे दुर होणार असुन ते सर्व शिक्षकांना मार्गदर्शक ठरेल अशी संशोधकाची अपेक्षा आहे म्हणुन सदरील समस्येवर संशोधन करण्याचे संशोधकाने ठरविले आहे.

समस्येचे स्पष्टीज रज :-

सदरील संशोधनामध्ये विद्यार्थी इयत्ता दहावी नंतर कोणत्या ज्ञानशाखेत प्रवेश घेतो. कोणत्या शाखेत जास्तीत जास्त प्रवेश होतात. त्यांच्या गुणांचा प्रवेशित शाखेंचा काही संबंध आहे का ? ज्या ज्ञानशाखेत ते प्रवेश घेतात त्यामागील कारणे कोणती आहेत. याचा शोध प्रस्तुत संशोधनातुन घेतला गेला आहे.

संशोधनाची मर्यादा आणि व्याप्ती :-

१. क्षेत्र व्याप्ती :- सदरील संशोधनाची व्याप्ती परतुर शहरापुरतीच मर्यादित आहे.

२. ज ालावधी :- प्रस्तुत संशोधन हे वर्ष २०१९ ते २०२१ हया शैक्षणिक वर्षापुरतेच व्याप्त आहे.

३. आशय व्याप्ती :- माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यावर विद्यार्थी तीन प्रमुख शाखांमध्ये प्रवेशीत होतात यांचा शोध घेणे.

४. आशय व्याप्ती :- माध्यमिज शिजज पुर्ज केल्यावर विद्यार्थी तीन प्रमुख शाखांमध्ये प्रवेशीत होतात यांचा शोध घेणे.

संशोधनाचे नमुना निवड :- प्रस्तुत संशोधनासाठी परतुर शहरातील एकूण जनसंख्येपैकी म्हणजेच उच्च माध्यमिक स्तरावरील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील ४२६ विद्यार्थ्यांपैकी १५० विद्यार्थ्यांची सहेतुक सप्रयोजन न्यादर्श नमुना निवड पध्दतीने न्यादर्शाची निवड करण्यात आली आहे.

संशोध-नाची उद्दिष्टे :-

(१) माध्यमिज शिजज पुर्ज झाल्यानंतर विविध उच्च माध्यमिक शिक्षणाकरीता विविध शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.

(२) विद्यार्थ्यांच्या विशिष्ट शाजेत प्रवेश घेज्यामाजील ज ारजांचा शोध घेजे.

(३) विशिष्ट शाजेत प्रवेश -नाज ारजाऱ्या विद्यार्थ्यांच्या भुमीजे चा (ज ारजांचा) शोध घेजे.

(४) विशिष्ट शाजांमधील प्रवेश जमता, प्रवेश संज्या व सद्य परिस्थिती त्या त्या ज्ञा-नशाजां-ना असजारे महत्व यांची गोळा केलेल्या आधार सामुग्री करुन चिकित्सा करणे.

अभ्यासकाचे गृहितके :-

(१) इयत्ता दहावी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थी वेगवेगळया शाखेत प्रवेश घेतात.

(२) १०+२+३ हया स्तरानुसार दहावी पर्यंतचे शिक्षण सर्वत्र सारखेच असते.

(३) उच्च माध्यमिक शिक्षणात आपल्या आवडीनुसार विद्यार्थी वेगवेगळया शाखेमध्ये प्रवेशीत होतात.

संशोधनाची परिकल्पना संदर्भात ठळक बाबी व चर्चा :-

(१) माध्यमिक शिक्षण पुर्ण केल्यानंतर समाजात ज्या व्यवसायाची प्रतिष्ठा आहे तसेच अभ्याक्रम निवडतात.

(२) ज्या अभ्यासक्रमामुळे उपजिवीका भागविण्यास हातभार लागतो असेच अभ्याक्रम निवडण्यास प्राधान्य दिला जातो.

(३) ज्या अभ्यासक्रमां संबधी पालकांमध्ये अनुभवामुळे माहिती असलेल्या क्षेत्रातच पाल्याच्या प्रवेशास ते प्राधान्य देतात.

(४) समन्वयक व वर्गमित्रांच्या प्रभावातुन / स्पर्धेतुन क्षेत्र निवडत असतात.

(५) विशिष्ट शाजेमध्ये शिजज ाच्या मार्जदर्श-नामुळे प्रभावित होवु-न प्रवेश घेतात.

तक्ता क्र.१

शाखा निवडीचे कारण

अ.क्र	**पर्याय**	**प्रतिसादक विद्यार्थ्यांची संख्या**	**शेकडेवारी**
१	विषयात आवड	७७	५१.००%
२	या शाखेला प्रतिष्ठा आहे	३९	२६.००%
३	व्यावसायिज शिजजाला संधी	३४	२३.००%
	एकुण	**१५०**	**१००.००%**

अर्थनिर्वचन :-

यावरुन असा निष्कर्ष काढला जातो की ५१.००% विद्यार्थ्यांना विषयात आवड असल्याने कला, विज्ञान व वाणिज्य हया शाखेची निवड केली.

निष्कर्ष तथा समारोप :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संबंधित प्रास्ताविक नमुद करुन संशोधन समस्येची गरज व महत्व मांडले आहे. तसेच समस्या विधानातील श्ब्दांना कार्यात्मक व्याख्या दिलेल्या आहेत. संशोधन ज्यासाठी करावयाचे आहे ती उद्दिष्टे संशोध-नज ा-ची स्पष्ट जे ली असु-न त्या दृष्टी-ने संबंधित जृहितजे व परिज ल्प-ना मांडलेल्या आहेत. तसेच समस्येची संबंधीत संशोध-नाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट जे ली आहे. संशोध-नाला जती व दिशा मिळज्यासाठी व अधिक दर्जेदार होण्यासाठी सदरील संशोधन हाती घेण्यात आले आहे.

प्रस्तुत संशोधनाचे मुख्य निष्कार्ष :-

(१) एकुण प्रतिसादकांपैकी ४०.००% विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखा निवडण्यास प्राधान्य दिले आहे.

(२) ५१.००% विद्यार्थ्यांनी विषयात आवड असल्याने कला, विज्ञान व वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला.

(३) ४७.००% पालकांची इच्छा अशी आहे की, आपल्या पाल्याने विज्ञान शाखेत प्रवेश घ्यावा.

(४) ३७.००% विद्यार्थी प्रतिसादकांना इंजिनिअर व्हायचे आहे.

संदर्भ :-

(१) बापट, भ.जो.(१९९५) शैजजिज संशोध-न, -नूत-न प्रज ाश-न, पुजे. पृष्ट ज्र .१०१ ते १०३

(२) भिंताडे, वि.रा.(२००४) शैक्षणिक संशोधन पध्दती, (आ-३) नूतन प्रकाशन पुणे

(३) दांडेकर, वि.ना.(१९९९) शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्र.१७५ ते १७८.

(४) डॉ.अरविंद दु-नाजे (२००८, शालेय व्यवस्थाप-न प्रशास-न संघट-न व -नियोज-न, -नित्य -नूत-न प्रज ाश-न पुजे.)

शेतकऱ्यांच्या समस्या आणि ग्रामीण समाज कार्य : संदर्भ महाराष्ट्र राज्य

राजरत्न निवृती पवार

प्रस्तावना :

भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्वाचा कणा म्हणजेच शेती ही होय आणि शेतीमध्ये प्रत्यक्षात काम हा शेतकरी करत असतो. परंतू शेतकऱ्यांच्या समोर अनेक प्रकारच्या समस्या आहेत. महाराष्ट्रातील आधूनिक शेतीची सुरूवात १८२७ च्या सुमारास मुंबईमध्ये प्रथम व्यापाऱ्यांनी ॲग्रिकल्चरल हॉर्टिकल्चरल सोसायटी स्थापन करून केली. अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडमधील शेतीत मोठी क्रांती झाली होती. पीक काढणी, जनावरांची पैदास या बाबतीत बऱ्याच सुधारणा झाल्या. अशा सुधारणा आपल्या शेतकऱ्यापर्यंत पोचविण्यासाठी या संस्थेची निर्मीती करण्यात आली होती. त्या काळात मुंबई शहराची रस्ते, पूल, शाळा अशा लोकोपयोगी गोष्टींची निर्मिती सरकारवर अवलंबून न राहता जमशेटजी टाटा आणि जगन्नाथ शंकरशेठ यांच्यासारखे आघाडीचे उद्योजक व नेते लोकवर्गणीतून फंड उभारून करीत असत. पैसा गोळा करणे आणि त्याचा योग्य प्रकारे विनियोग होईल अशी डोळ्यांत तेल घालून काळजी घेत होते. त्यामुळे मुंबई शहरात सुधरणोच पेव फुटले.

हिंदुस्थानातील पिकांची बियाणे लागवडीची पध्दत सुधारावी. चहा–कॉफी, उस इत्यादीचे मळे या देशात व्हावेत, तुतीचे पीक घेउन त्यापासून शेतकऱ्यांनी रेशीम तयार करावे, असे प्रयत्न सुरू होते. जगातील पिके येथे रूजवण्याचा प्रयत्न सरकारी मदतीशिवाय केला गेला. आता ही प्रवृत्तीच नष्ट झाली आहे. शेतीसाठी पाणीव्यवस्थापन भूगर्भातील पाण्याचा शोध घेण्याची दोन तंत्रे आहेत. एक मशिनच्या साह्याने व दुसरा पानाड्याच्या सहयाने. मशिनमध्ये विद्यूततंत्राचा वापर करून पाण्याचे क्षेत्र, खडकाचा प्रकार वगैरे समजू शकतो. जगातील बहुतांशी लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे. शेतकऱ्याने उदरनिर्वाहसाठी केव्हा धंदा म्हणून स्वत:च्या शेतावर चाललेला व्यवसाय अश्याी शेतीची व्याख्या केली जाते. शेतीमधून काढावयाचे उत्पादनानुसार शेतीचे विविध प्रकार पडतात त्यामध्ये उसाचा मळा, भात शेती, पशू प्रधान शेती, मत्स शेती. त्याप्रमाणेच पाण्याच्या व सिंचनाच्या उपलब्धतेनुसार बागायती शेती व जिरायती शेती असे देखिल शेतीचे प्रकार पडतात.

भारतामध्ये मुख्य तीन ऋतू आहेत. त्यामुळे हवामानामध्ये होणारे बदल, जमीन आणि भूरचना सतत बदलत असते. एखाद्या भागातील जमिनीमध्ये कुठले पीक घ्यावे हे तेथील हवामान आणि जमिनीवर ठरवले जाते. कमी पावसाच्या भागात जर सिंचनाव्दारे पाण्याची उपलब्ध असेल तर त्या ठिकाणी बागायत, कापूस आणि उसासारखी दीर्घ मुदतीचे पिके उत्तम रित्या येवू शकतात. भात शेती आणि उष्ण कटिबंधातील फळबागांची शेतीसाठी कोकण विभाग महत्वाचा ठरतो. कारण कोकणातील हवामान हे भात, आंबे, नारळ – सुपारी काजू आणि मसाल्यांच्या पिकांसाठी पोषक असते. डोंगराळ भागात आणि पुरेशा पर्जन्यमान असलेल्या प्रदेशात गवताळ राने, कुरण, वनशेती, गवत शेती किंवा पशूधन प्रधान शेती करणे फायदेशीर ठरू शकते. शेतीचे प्रकार जिरायती शेती, बागायती शेती, फळबाग शेती, भाजपाल्याची शेती, फुलशेती,दुग्धव्यवसाय प्रधान शेती, रासायनिक शेती, सेंद्रीय शेती, मत्स शेती, हरीत शेती असे अनेक प्रकार आहेत.

शेतकऱ्यांच्या विविध समस्या :

१. बियाण्यांची समस्या :

आज घडीला शेतकऱ्या समोरील प्रमूख समस्या म्हणजे बियाण्यांची समस्या होय. कारण आजचा शेतकरी हा सर्व बियाणे बाजारातूनच विकत घेत असतो आणि व्यापारी लोक हे पेरणीच्या काळामध्ये बियाण्यांचे भाव वाढवत असतात यामुळे शेतकऱ्यांना बियाणे घेते वेळेस अनेक अडचणींचा सामन कराव लागत असतो.

२. कमी शेतीचे प्रमाण :

महाराष्ट्र राज्यातील अनेक शेतीकरी हे असे आहेत की त्यांच्याकडे खूप कमी शेती आहेत म्हणजे एक एकर पासून ते तीन एकर शेती असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण हे महाराष्ट्रामध्ये अधिक असल्यामूळे त्यांना विविध समस्या निर्माण होत आहेत.

३. सिंचनाची समस्या :

महाराष्ट्राती अनेक जिल्हे असे आहेत की त्या जिल्हामधील शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामूळेच या शेतकऱ्यांना जास्त समस्यांचा सामना करावा लागत आहे.

४. खतांची, औषधे विषयक समस्या :

महाराष्ट्रातील अनेक शेतकरी हे सद्या रासायनिक खतांचा आणि विविध औषधांचा वापर हा आपल्या शेतीमध्ये करत आहेत. त्यांचे जास्त प्रमाण झाल्यास नापिकी समस्या उद्‌भवत आहे.

५. साठवणूक विषयक समस्या :

महाराष्ट्रातील शेतकऱ्यां समोरील सर्वात महत्वाची जर कोणती समस्या असेल तर ती म्हणजे साठवणूक विषयक समस्या होय. कारण जेव्हा शेतकऱ्यांचे पीक हे काढणीला येते त्यावेळेस व्यापारी वर्ग हा भाव हा कमी करतात त्यामुळे शेतकऱ्याला अपले उत्पादने हे कमी किंमतीमध्ये विकावे लागत आहेत.

संशोधनाचे उद्देश :

१. शेतकऱ्यांच्या विविध समस्यांचे अध्ययन करणे.
२. शेतकरी व व्यापारी यांच्यातील संबंधाचे अध्ययन करणे.
३. शेतकरी व शासनाच्या विविध योजना यांचे अध्ययन करणे
४. शेतकरी आणि प्रशासकिय अधिकारी यांच्या संबंधाचे अध्ययन करणे
५. शेतकरी आणी ग्रामिण समाज कार्य याचे अध्ययन करणे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हामधून ५०० शेतकऱ्यांची निवड ही स्नो बॉल निवड तंत्राव्दारे करण्यात आली आहे. तसेच तथ्य संकलनासाठी ग्रूप डिक्शन तंत्राचा वापर केलेला आहे.

ग्रामिण समाज कार्य :

ग्रामीण समाज कार्य म्हणजे यामध्ये गावातील जे विविध घटक आहेत जसे शेतकरी, महिला, बालक आणि वृध्द यांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठीची केलेली मदत म्हणजेच ग्रामिण समाज कार्य होय. गावातील लोक हे काही प्रमाणात नविन माहिती पासून वंचीत असतात तसेच ते आपल्या रूढी परंपरेला चिकटून असतात. तेव्हा त्यांना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठीची केलेली मदत म्हणजेच ग्रामिण समाज कार्य होय.

सारांश :

सारांश स्वरूपात सांगावयाचे झाल्यास या संशोधन पेपर मध्ये शेतकऱ्यांच्या ज्या विविध समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी ग्रामीण समाज कार्य कशा प्रकारे मदत करत असते यावर प्रकाश टाकलेला आहे. जसे ग्रामीण

भागातील शेतकऱ्यांना बायाणे, खेते, औषधे, बाजार भाव इत्यादी व अशा अनेक समस्या आहेत या समस्या सोडविण्यासाठी ग्रामीण समाज कार्य म्हणजे समाज कार्यातील विविध विद्यार्थी, विविध गैर शासकीय संस्था तसेच विविध शासन संस्था ह्या त्यांना विविध प्रकारे मदत करत असतात. तसेच शासन आणि अनेक गैर शासकीय संस्था ह्या ग्रामीण समाज कार्य करीत आहेत.

संदर्भग्रंथ सुची :

१. डोईफोडे ज्याती (२००५), मुलभूत सामाजिक विचार, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

२. डोंगरे भगवान भाउराव (२०११), जालना जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या.

३. गोरे अशोक (२०१४), ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.

४. नलवाडे पंडित (२०१५), भारतापुढील आव्हाने आणि सद्यस्थिती, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

५. Butler S.S. (2004), Gerontological Social Work in Small Town, New York, Haworth.

६. Fiske H. (2003), Reflection on Rural Social Work, Social Work today.

७. www.agri.dep.gov.in

८. www.mahaagri.dep.gov.in

९. www.wikipidea.com

१०. www.vikaspidia. com

आदिवासी जमातींच्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीत झालेल्या बदलाचे अध्ययन : संदर्भ – महाराष्ट्र राज्य

आनंद दिलीप कदम

प्रस्तावना :

आदिवासी समाज हा प्राचीन आणि मुळ भारतीय समाज आहे. त्या काळामध्ये भारतीय वनस्पतींचा मालक असणारा हा समाज इंग्रजांच्या केल्यामुळे आर्थिकदृष्ट्या कमकुवत झाला. आदिवासी म्हणजे आदिकाळापासून वास्तवास असलेला समाज होय. आदिवसी समाज हा निसर्गपुजक समाज आहे. ते इतर समाजापेक्षा वेगळा समाज आहे. त्यांचे देव, भाषा आणि चालीरिती अन्य ग्रामिण आणि शहरी लोकांपेक्षा भिन्न असतात. भारतामध्ये ९ ऑगस्ट हा दिवस दरवर्षी आदिवासी दिवस म्हणून साजरा केला जात असतो. आदिवासी म्हणजे असली कुटूंबे होत की जी सामाजिक, आर्थिक, धार्मिक तसेच त्यांची संस्कृती ही एकच असते आणि ते त्या संस्कृतीचे तंतोतंत पालन करीत असतात. त्यांनाच आदिवासी असे म्हणतात. भारतीय संविधानामध्ये अनुसूची ५ आंतर्गत आदिवासी जमातीची बदलची माहिती आणि तरतूदी केलेल्या आहेत. भारतामध्ये एकूण ६४५ वेगवेगळ्या आदिवासी जमाती आहेत. त्या राज्यनिहाय्य खालिल प्रमाणे आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये भैना, भूंजिया, धोंडिया, कातकरी,खोंड, रथवा, वारली, धन्का, हालबा, काठोडी, कोळी महादेव, पारधी आणि ठाकुर या जमाती आहेत. भारताच्या २०११ च्या जणगणनेनुसार भारतातील आदिवासी जमातींची एकूण लोकसंख्या ही १०.४३ कोटी ऐवढी आहे, ही देशातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ८.६ एवढी आहे. तर शहरी भागामध्ये त्याचे प्रमाण हे २.८ टक्के एवढे आहे . मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओरीसा, राज्यस्थान, गुजरात, झाारखंड, छत्तीसगढ, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल आणि कर्नाटक या राज्यांमध्ये आदिवासी जमातींची लोकसंख्या हि खूप जास्त प्रमाणात आहे. देशातील एकूण आदिवासी जमातींच्या लोकंसख्येच्या मानाने या राज्यांमध्ये ८३.२ टक्के ऐवढी आहे. असाम, मेघालय, नागालॅंड, जम्मू काश्मीर, त्रिपुरा, मिझोराम, बिहार, मनीपूर, अरूणाचल प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये भारतातील एकूण आदिवासी जमातींच्या १५.३ टक्के एवढी आहे. भारतामध्ये लोकसभेसाठी ४७ जागा ह्या आदिवासी जमातींसाटी राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. भारतामध्ये १८७१ पासून ते १९४१ पर्यंत झालेल्या प्रत्येक जगणणनेमध्ये आदिवासी जमातींना अन्य लोकांपासून वेगळे ठेवण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्यातील प्रमुख आदिवासी जमातींची संख्या (टक्केववारी मध्ये)

अ.क्र.	आदिवासी जमातीचे नाव	टक्केवारी
१	भिल्ल	२१.२टक्के
२	गोंड	१८.१ टक्के
३	कोळी महादेव	१४.३टक्के
४	वरळी	७.३टक्के
५	कोकणा	६.७टक्के
६	ठाकुर	५.७टक्के

आदिवासी जमातींच्या व्याख्या :

१) बोगार्डस यांच्या मते,''सुरक्षिततेसाठी गरज, रक्तसंबंधाचे बंध समान धर्माची शक्ती यावर आदिवासी समुह अधारलेला होता.''

२) मुजूमदार,''समान नाव असणारा, एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एकाच भाषा बोलणारा व विवाह व्यवसाय इत्यादी बाबत समान विधीनिषेध, नियमांचे पालन करणाराव परस्पर उत्तरदायीत्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पध्दतशीर व्यवस्था स्वीकारणारे कुटूंब समुहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय.''

३) दि इंपिरिकल गॅझिटिअर ऑफ इंडिया, ''समान बोलीभाषा बोलणारे, एकाच भू भागात व एकसमान व्यवसाय करणारे मुलत: अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेला संबंध पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटूंबांचा समुच्चय म्हणजे आदिवीस होत.''

संशोधनाचे उद्देश :

१) आदिवासी जमातींच्या सामाजिक आणि सांस्कृतीक स्थितीचे अध्ययन करणे.

२) आदिवासी जमातींच्या सांस्कृतिक आणि सामाजिक स्थितीमध्ये झालेल्या बदलाचे अध्ययन करणे

३) आदिवासींची सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीस बदलास कारणीभूत असलेल्या घटकाचे अध्ययन करणे.

४) शासनाच्या आदिवासी संबंधीत विविध योजनांचे अध्ययन करणे.

संशोधन पध्दती :

सदर संशोधनाच्या नमुना निवडीसाठी लॉटरी या नमुना निवड पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला असून, महाराष्ट्र राज्यातील एकूण ४५० आदिवासी जमातीतील लोकांची नमुना म्हणून निवड करण्यात आलेली आहे. तसेच तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची या तंत्राचा वापर केलेला आहे.

आदिवासी जमातींच्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीत झालेल्या बदलाचे :

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जमातींच्या सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीत झालेले बदल हे खालिल प्रमाणे आहेत. तसेच राज्यातले आदिवासी हे महाराष्ट्राच्या जनतेचा अविभाज्य भाग आहेत. त्यांची वेगळी भाषा आहे, स्वत:ची अशी संस्कृती आहे. ती मान्य करून, महाराष्ट्राच्या विकासात त्यांना सहभागी करून हे सर्व जनेतेचे कर्तव्य आहे. महाराष्ट्रात आदिवासींच्या एकुण ४७ जमाती आहेत.

१) आदिवासी जमातीतील लोक हे प्राचीन काळापासून ते आपल्या संस्कृतीचे पालन करत होते त्यामुळे ते अन्य समाजापासून वेगळे समजले जात होते आणि त्यांना वेगळी वागणूक दिली जात होती. परंतू आता आदिवासी हे समाजातील अन्य लोकांसोबत वावरत असल्यामुळे त्यांच्या सामाजिक व सांस्कुतिक स्थितीत परीवर्तन झाले आहे

२) आदिवासी लोक हे अगोदर जंगलामध्ये राहत होते. व पारंपारीक देवांची पूजा अर्चना करत होते त्या स्थितीत आता बदल होवून ते आता अन्य समाजातील लोकांच्या सण–उत्सवात सहभागी होत आहेत.

३) प्राचीन काळी आदिवासी समाजातची वेशभूषा, केशभूषा, खाणपाण पध्दती ही वेगळी असायची परंतू आता त्यात बदल होवून ते सर्व सामान्य लोकांसारखी वेगभूषा, केशभूषा, खाणपाण पध्दत यात बदल घडून आला आहे.

४) प्राचीन काळी ते आरोग्य विषयक बाबीसाठी महाराजांकडे जात होते परंतू आता त्यात बदल होवून ते दवाखाण्यात सुध्दा आपला उपचार करत आहेत.

५) सर्वात मोठा बदल जर कोणता असेल तर तो रोटी–बेटी व्यवहारात झाला आहे.

शिफारशी :

१) आदिवासी जामतीतील लोकांसोबत इतर लोकांनी सौहार्दपूर्ण वागावे.

२) आदिवासींना शिक्षण, आरोग्य आणि शासनाच्या विविध सुविधा देवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणने.

३) आदिवासींना त्यांची सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीत बदल घडवण्यासाठी प्रोत्साहीत करणे.

४) शासनाकडून त्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून द्यावा जेणे करून ते मुख्य प्रवाहात येतील.

